CMYK
सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर मंगळवार, १७ मार्च २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक १०८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

# महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक सर्व धर्मांसाठी : मुख्यमंत्री

**मुंबई, दि.१६ मार्च-**

महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ आपण आणले आहे. यापूर्वी देशाच्या १२ राज्यांनी असे विधेयक आणले आहे. आणि हे विधेयक आणत असताना याच्या पाठीमागे हे कुठल्या धर्मासाठी किंवा धर्माच्या विरोधात नाही. हे सगळ्या धर्मासाठी आहे. राज्यात अनेकवेळा धर्मांतरांच्या घटनांमुळे कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होते. यावर कारवाई करणे आता आपल्याकडे जे काही कायदे आहेत, त्या कायद्यांमध्ये सुस्पष्ट तरतुदी नाहीत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



फडणवीस म्हणाले, या गोष्टी होऊ नयेत आणि सुस्पष्टता आणण्यासाठी हे विधेयक आणले आहे. आर्टिकल २५ ने धर्म स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. पण हे करत असताना माननीय सर्वोच्च न्यायालयाने एक गोष्ट सांगितली आहे की, प्रत्येकाला आपल्या धर्माचा अवलंब करण्याचा अधिकार असला तरी हा अधिकार काही रेस्ट्रिक्शनला त्या ठिकाणी अनुलक्षून देण्यात आले आहे. आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाने जो काही निर्णय दिला आहे, त्यात जबरदस्तीने धर्मांतराला विरोध केला आहे. वेगवेगळ्या राज्यांनी १९६८ पासून हे कायदे केले आहेत. जसे मी सांगितले की स्पष्टपणे या ठिकाणी सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की एखादा कायदा हा जबरदस्तीच्या विरोधात असेल तर तो संवैधानिक आहे. या अधिकारात बळजबरी, फसवणूक, बेकायदेशीर धर्मांतरपासून संरक्षण करण्यासाठी हे विधेयक आहे. नागरिकांच्या रक्षणासाठी हे विधेयक आहे. आणि धर्म स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी हे विधेयक आहे. प्रतिबंधित काय आहे तर ज्यात आमिष असेल, फसवणूक असेल, लबाडी असेल, अल्पवयीन असेल, गैरवाजवी प्रभाव असेल, अशा पद्धतीने बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. अनेकवेळा बेकायदेशीर धर्मांतर होऊन लग्न होते, त्यानंतर विच्छेद होतो. अशावेळी काय करायचे असा प्रश्न निर्माण होतो. अशावेळी केवळ बेकायदेशीर धर्मांतरांच्या प्रयोजनासाठी केलेला कुठलाही विवाह न्यायालयाद्वारे शून्यवत व निरर्थक घोषित करण्यात येईल. बेकायदेशीर धर्मांतरामुळे एखादा बालक जन्माला आला असेल तर त्या बालकाला कुठल्या जातीचे धर्माचे मानण्यात यावे, तर आईचा जो पूर्वाश्रमीचा धर्म होता तोच त्या मुलाचा धर्म मानण्यात येईल. तथापि आई आणि वडिलांच्या मालमत्तेत उत्तराधिकार त्या बालकाचा कायम असेल. यासोबत आईकडे बाळाची कस्टडी असणार आहे.

### धर्मांतर करण्यासाठी देखील विधेयकात तरतूद

धर्मांतर कोणाला करायचे असेल तर सर्वोच्च न्यायालयाने संगीतल्याप्रमाणे त्याची तरतूद आपल्या विधेयकात केलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या न्याय निर्णयात सांगितले आहे की अशा पद्धतीचा कुठलाही कायदा करत असताना एक विहित पद्धत धर्मांतरासाठी असली पाहिजे. त्या संदर्भात धर्मांतर करण्याचा इरादा असणारी जी कोणी व्यक्ती असेल त्या व्यक्तीने नोटीस द्यायची आहे आणि सक्षम प्राधिकरणाने ही खात्री करायची आहे की हे स्वेच्छेने धर्मांतरण होत आहे. त्यानंतर धर्मांतर करण्याचा त्या व्यक्तीला अधिकार असेल.


## साहित्य अकादमी पुरस्काराची घोषणा

**मराठी भाषेतून लेखक-चित्रकार राजू बाविस्कर यांच्या 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मचरित्राची निवड**

**मुंबई, दि.१६ मार्च-**

साहित्य क्षेत्रातील अत्यंत मानाच्या अशा साहित्य अकादमी पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. मराठी भाषेतून साहित्यिक राजू बाविस्कर यांच्या काळ्यानिळ्या रेषा या आत्मचरित्राची साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

मराठी भाषेतून शिफारस करण्यात आलेल्या एकूण ११ पुस्तकांमधून बाविस्कर यांच्या साहित्य कृतीची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.




राजू बाविस्कर हे एक प्रसिद्ध मराठी चित्रकार आणि लेखक आहेत. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना अत्यंत प्रतिष्ठेचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांना सन्मानचिन्ह , शाल आणि १ लाख रुपये रोख रक्कम पुरस्काराच्या स्वरुपात दिली जाईल. ३१ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित एका समारंभात हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

## ऑस्कर अवॉर्ड-२०२६ जाहीर

**नवी दिल्ली** : ९८ वी ऑस्कर अवॉर्ड सेरेमनी लॉस एंजिल्स येथील डॉल्बी थिएटरमध्ये पार पडली. लियोनार्डो डिकॅप्रियोचा 'वन बॅटल आफ्टर अनदर' हा चित्रपट सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला. याशिवाय, चित्रपटाने सर्वाधिक ६ पुरस्कार पटकावले आहेत. १६ नामांकने मिळवून विक्रम करणाऱ्या 'सिनर्स' चित्रपटाला केवळ ४ पुरस्कार जिंकता आले. भारतीय वंशाच्या चित्रपट निर्मात्या गीता गंदभीर यांच्या २ माहितीपटांना ऑस्करमध्ये नामांकन मिळाले, मात्र त्या दोन्ही माहितीपटांना पुरस्कार जिंकता आले नाहीत. प्रियांका चोप्रा २०१६ नंतर पुन्हा एकदा ऑस्कर अवॉर्ड सादरकर्त्या बनल्या आहेत.








CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# १० संचालक पदांसाठी आज ५५ मतदान केंद्रांवर मतदान

## सोलापूर जनता बँकेची रणधुमाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

जिल्ह्यातील सर्वात मोठी बँक म्हणून ओळख असलेल्या सोलापूर जनता सहकारी बँकेच्या १० जागांसाठी उद्या (मंगळवारी) सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत सोलापूर शहर जिल्हा, राज्यभरासह कर्नाटकातील विजयपूर येथील एकूण ५५ केंद्रांवर मतदान पार पडणार आहे. यासाठी ५१ हजार ४९४ मतदार मतदान करणार आहेत. यात ५१ हजार ४४८ व्यक्तिगत तर ४६ संस्था मतदारांचा समावेश आहे.

जनता बँकेच्या या निवडणुकीसाठी जवळपास २४० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद तर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड हे काम पाहत आहेत.



सोलापूर शहरातील डफरीन चौकातील नूमवी शाळेत २३, त्या शेजारील एसपीएम इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ५ असे एकूण २८ मतदान केंद्रे आहेत. याशिवाय जिल्ह्यात बार्शी, माढा, पंढरपूर, सांगोला, अक्कलकोट, मोहोळ, माळशिरस, कसबे तडवळे, धाराशिव, उमरगा, कळंब, लातूर, उदगीर, पुणे, मुंबई, छत्रपती संभाजी नगर, नाशिक, नांदेड, कोल्हापूर, बीड आणि कर्नाटकातील विजयपूर येथे मतदान केंद्रे आहेत.

### शुक्रवारी मतमोजणी

सोलापूर जनता बँकेच्या संचालक मंडळाच्या दहा जागांसाठी मतदान पार पडल्यानंतर सर्व मतपेट्या सोलापुरात आणण्यात येणार आहेत. याची मतमोजणी शुक्रवार, २० मार्च रोजी सकाळी आठ वाजल्यापासून डफरीन चौकातील नूमवि शाळेत केली जाणार आहे, अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी दिली.

जनता बँकेच्या संचालकांच्या १७ जागांपैकी ७ जागा बिनविरोध झाल्या आहेत. त्यामध्ये २५ किलोमीटर बाहेरील मतदारसंघात हर्षल डंबळ, मिलिंद कुलकर्णी, अमित आपटे, चरणसिंग चौहान, महिला प्रवर्गातून चंद्रिका चौहान, गौरी आमडेकर तर अनुसूचित जाती जमाती मतदारसंघात रवींद्र साळे यांचा समावेश आहे. उर्वरित २५ किलोमीटर आतील मतदारसंघातील दहा जागांसाठी मतदान होत आहे. या दहा जागांसाठी विद्यमान सत्ताधारी परिवार पॅनलकडून दहा तर त्यांच्याविरोधात केवळ दोन उमेदवार रिंगणात आहेत.

सत्ताधारी परिवार पॅनलकडून विद्यमान अध्यक्ष सुनील पेंडसे, पुरुषोत्तम उडता, राजेश पवार, गिरीश बोरगावकर, विष्णू मोंढे, आनंद करवंदे, महादेव न्हावकर, ॲड. मल्लिनाथ शहाबादे, सुरेश चिक्कळी, प्रमोद भुतडा हे उमेदवार निवडणूक लढवित आहेत. त्यांचे चिन्ह किटली आहे. विरोधी भारत तांबोळकर यांचे चिन्ह नारळ असून विश्वनाथ निरंजन यांचे छत्री हे चिन्ह आहे.

# शहरातील उडाणपुलासाठी राज्य शासनाच्या जागेची हस्तांतरण प्रक्रिया सुरु

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

शहरातील उडाणपुलासाठी राज्य शासनाच्या मालकीच्या जागेचे हस्तातंरण राज्य शासनाच्या आदेशानुसार सुरु करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या चार विभागाकडूनही यासाठी लवकरच हस्तातंरण प्रक्रिया सुरु करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि.१६) माध्यमांशी बोलताना दिली.

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शहरात २ उड्डाणपूल करण्यात येणार आहेत. उड्डाणपुलासाठी मोठी रक्कम लागणार आहे. राज्याऐवजी केंद्राकडून निधी मिळवण्यासाठी शहरातील राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपूल तयार करण्यात येणार आहे. त्यास राज्य शासनाने पूर्वीच मंजुरी दिली होती. यानंतर खाजगी जागांची भूसंपादन प्रक्रियाही पार पडली आहे. आता राज्य शासनाच्या मालकीच्या जागेचे हस्तातंरण राज्य शासनाच्या



आदेशानुसार सुरु करण्यात आले आहे.

सोलापूर शहरातील उड्डाणपुलाच्या सुधारित प्रस्तावासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाकडून मंजुरी देण्यात आली आहे. या उड्डाणपुलामुळे शहरातील वाहतूक कोंडीला आळा बसणार आहे. सोलापूर शहरात दोन मुख्य उड्डाणपूल प्रस्तावित आहेत. यामध्ये जुना पुणे नाका ते पत्रकार भवन (७.७० किमी) आणि जुना बोरामणी नाका ते जुळे सोलापूर मोरारका बंगला (४.९२ किमी) असे उड्डाणपुल होणार आहेत.

या प्रकल्पांसाठी महापालिकेकडून बाधित इमारती आणि मिळकतदारांची यादी तयार करण्यात आली आहे. आता सोलापूर शहरातील उडाणपुलासाठी राज्य शासनाच्या मालकीच्या जागेचे हस्तातंरण राज्य शासनाच्या आदेशानुसार सुरु करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या चार विभागाकडूनही यासाठी लवकरच हस्तातंरण प्रक्रिया सुरु करण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितल्याने आता उड्डाणपुलाच्या कामाला गती येण्याची शक्यता आहे.

### आयटी पार्कसाठी जागा लवकरच हस्तांतरित होणार

होटगी रोड येथील ५० एकर जागा जलसंपदा विभागाकडून एमआयडीसीकडे लवकरच हस्तांतरित होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही जागा मोफत देण्याचे निर्देश दिले असून त्यासाठी विशेष मंजुरी मिळणार आहे. कृष्णा खोरे महामंडळाच्या नियामक मंडळाची तीन महिन्यांतून एकदा बैठक होत असते. या बैठकीत जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी जागा हस्तांतरणाबाबत अंतिम निर्णय घेणार आहेत.

# बार्शी तालुक्यातील खामगाव येथे हिंसक प्राण्याचा शेळ्यांवर हल्ला

## हल्ल्यात ८ शेळ्या ठार, ११ गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १६ मार्च -**

तालुक्यातील खामगांव येथे एका शेतकऱ्याच्या शेळीपालन व्यवसायावर हिंसक प्राण्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात तब्बल ८ शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला असून शेतकऱ्याचे सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खामगांव येथील शेतकरी शिवाजी कात्रे यांनी आपल्या शेतामध्ये शेळीपालन व्यवसाय सुरु केला आहे. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात हिंसक प्राणी शेळ्यांच्या गोठ्यात घुसला आणि शेळ्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात ८ शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच तहसीलदार एफ. आर. शेख यांनी तातडीने बार्शी वन विभाग अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली व घटनेचा पंचनामा करण्यास सांगितले. वनपाल आरजू पिरजादे यांनी या घटनेचा पंचनामा केल्यानंतर हा हिंसक प्राणी तरस असण्याची शक्यता वर्तवली आहे. तरस या प्राण्याच्या पायांचे ठसे व नख्यांच्या रस्त्यांवरुन त्यांनी याची ओळख पटवली असल्याचे सांगितले. शेळ्यांवर हल्ला करण्याची पद्धत पाहता या प्राण्याने शेळ्यांच्या पाठीमागे, पायाला, पोटाला व नरड्याला जखमा केलेल्या दिसून येत आहेत.वन विभागाच्यावतीने मृत शेळ्यांचा कायदेशीर पंचनामा करण्यात आला असून, आत्तापर्यंत १९ पैकी ८ शेळ्या मृत पावल्या असून, उर्वरित ११ शेळ्या गंभीर जखमी असून भविष्यात त्या मृत पावण्याची शक्यता आहे.

# महिलेला सात लाखांची नुकसानभरपाई देण्याचा न्यायालयाचा महावितरणला आदेश

## शेतकरी महिलेच्या तब्बल १६ वर्षांच्या लढ्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ मार्च-**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे जळालेल्या पिकाच्या नुकसान भरपाईसाठी तब्बल १६ वर्षे न्यायालयीन लढा देणाऱ्या शेतकरी महिलेला अखेर न्याय मिळाला आहे. बार्शी येथील अतिरिक्त जिल्हा न्यायालयाने शेतकरी महिला अरुणा नवनाथ चौधरी (रा. बोरगाव, ता. करमाळा) यांना ७ लाख रुपये नुकसान भरपाई तसेच दावा दाखल केल्याच्या तारखेपासून वार्षिक ७ टक्के व्याज देण्याचा आदेश महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला दिला आहे.

हा निकाल बार्शी अतिरिक्त जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश विक्रमादित्य मांडे यांनी दिला असून यामध्ये ॲड. प्रशांत शेटे (बार्शी) यांच्या प्रभावी युक्तिवादाला न्यायालयाने ग्राह्य धरले. याबाबतची हकीकत अशी की, अरुणा चौधरी यांच्या मालकीची मौजे बोरगाव, ता. करमाळा येथे गट क्रमांक १२८/२ मधील सुमारे १ हेक्टर ६५ आर जमीन आहे. जमीन खरेदी केल्यानंतर त्यांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन मोठ्या प्रमाणावर जमिनीची सुधारणा केली होती.



त्या शेतात आडसाली फुले को-२६५ जातीचा ऊस तसेच २०० नारळाची झाडे लावण्यात आली होती. ऊस पीक पूर्णपणे तयार होऊन गाळपासाठी पाठविण्याच्या स्थितीत होते.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून त्या क्षेत्रात ११ के.व्ही. वीजवाहिनीचे खांब व तारा टाकण्याचे काम सुरु करण्यात आले होते. या कामाला चौधरी यांनी हरकत घेतली होती. तरीदेखील कंपनीकडून काम सुरु ठेवण्यात आले. कंपनीच्या निष्काळजीपणामुळे तारा योग्यरीत्या न ओढल्याने २१ सप्टेंबर २०१० रोजी शॉर्ट सर्किट होऊन शेतातील उभा ऊस व सुमारे १०० नारळाची झाडे जळून राख झाली. यामुळे चौधरी यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. या घटनेनंतर त्यांनी तहसीलदार व करमाळा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती आणि अकस्मात जळीतची नोंद करण्यात आली होती. मात्र त्यांना कोणतीही नुकसान भरपाई मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी ॲड. प्रशांत शेटे (बार्शी) व ॲड. हिरडे (करमाळा) यांच्यामार्फत २०११ मध्ये बार्शी येथील वरिष्ठ स्तर न्यायालयात स्पेशल मुकदमा क्रमांक ९८/२०११ दाखल केला.

### अपीलमध्ये मिळाला न्याय

प्रारंभी वरिष्ठ न्यायालयाने दावा फेटाळण्याचा आदेश दिला होता. त्यानंतर अरुणा चौधरी यांनी बार्शी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने अपील अंशतः मंजूर करत महावितरण कंपनीला ७ लाख रुपये नुकसान भरपाई व ७ टक्के वार्षिक व्याज देण्याचा आदेश दिला.

### साक्षी आणि पुरावे

या प्रकरणात वादी अरुणा चौधरी यांच्यासह पंच विष्णू मस्के, विद्युत निरीक्षक कार्यालयातील शाखा अभियंता भारती चव्हाण, सर्कल ऑफिसर सादिक काझी, कृषी सहाय्यक गिरीश मुळे यांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. विद्युत कंपनीतर्फे स्वप्नील लोंढे यांची साक्ष घेण्यात आली. विद्युत निरीक्षकांच्या अहवालातही सदर दुर्घटना वीज कंपनीच्या पोल, तारा आणि शॉर्ट सर्किटमुळेच झाल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.




# मेहता शाळेत ‘चैत्रपालवी’ कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता माध्यमिक शाळेत चैत्रपालवी-हा चंद्र जागलेला हा सुरेल गायनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सोमेश्वर पाटील (माहिती व प्रसारण अधिकारी, आकाशवाणी सोलापूर), नियामक मंडळ सदस्य सुरेश मंकणी व त्यांच्या सुविद्य पत्नी नीता मंकणी तसेच शाळा समितीचे माजी अध्यक्ष राजेश पटवर्धन व त्यांच्या सुविद्य पत्नी सुमेधा पटवर्धन यांची उपस्थिती लाभली.

यावेळी सोमेश्वर पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमात भाग घेतलेल्या सर्व बालकलाकारांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमधील कला जोपासण्यासाठी आकाशवाणीचा मंच उपलब्ध करून देण्याची तयारी त्यांनी दर्शवली व भविष्यात विद्यार्थ्यांनी आकाशवाणीवर कार्यक्रम सादर करावा असे आवाहन केले. कार्यक्रमात प्रशालेचे विद्यार्थी तसेच संगीत शिक्षिका रमा कुलकर्णी व धनश्री विधाते यांनी चंद्रचूड, हसले मनी चांदणे, रात का समा, ये रात भीगी, हे चांदणे फुलांनी, वो चाँद खिला, चंदा चमके चमचम आदी गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. प्रास्ताविक, प्रमुख पाहुण्यांची ओळख व सत्कार मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेच्या पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर यांनी केले. कार्यक्रमास प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकार, शिशु शाळेच्या मुख्याध्यापिका उमा घोळे उपस्थित होते.

# डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल प्रकरणात पुन्हा एक गुन्हा दाखल

## सीसीटीव्ही फुटेज नष्ट केल्याचा आरोप

## वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामचंद्र जगतापसह प्रशासनावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १६ मार्च-**

येथील डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटलमधील एका रुग्णाच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात तपासात अडथळा निर्माण केल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, महत्त्वाचे सीसीटीव्ही फुटेज नष्ट झाल्याप्रकरणी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामचंद्र जगताप तसेच इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे बार्शी तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवगंगा शिवाजी मुंडे (रा. गोविंदपूर, ता. कळंब) यांना ४ मार्च रोजी छातीत व पोटात दुखत असल्याने बार्शी येथील डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सुरुवातीला रुग्णाची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत होते. मात्र, ६ मार्च रोजी अचानक रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्याची माहिती नातेवाईकांना देण्यात आली. नातेवाईकांनी रुग्णाला भेटण्याचा प्रयत्न केला असता त्यांना संबंधित कक्षात प्रवेश देण्यात आला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, रुग्णाच्या उपचारादरम्यान कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला होता. या पार्श्वभूमीवर बार्शी शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करुन तपास सुरु केला.

तपासाच्या अनुषंगाने पोलिसांनी ८ मार्च रोजी हॉस्पिटल प्रशासनाला नोटीस बजावून त्या कालावधीतील सीसीटीव्ही फुटेज तसेच संबंधित वैद्यकीय कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, हॉस्पिटल प्रशासनाकडून वारंवार ‘वैद्यकीय अधीक्षक सुट्टीवर आहेत’ किंवा ‘सीसीटीव्हीचा पासवर्ड त्यांच्या ताब्यात आहे’ अशी कारणे देत माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

१३ मार्च रोजी पोलिसांनी प्रत्यक्ष हॉस्पिटलमध्ये जाऊन तपासणी केली असता, हॉस्पिटलमधील सीसीटीव्ही प्रणालीचा बॅकअप कालावधी केवळ सहा दिवसांचा असल्याचे समोर आले. पोलिसांनी वेळेत फुटेज उपलब्ध करुन देण्याची मागणी करुनही ते न दिल्याने संबंधित कालावधीतील फुटेज ‘ऑटो डिलीट’ होऊन नष्ट झाल्याचे उघड झाले. त्यामुळे तपासासाठी महत्त्वाचा ठरणारा पुरावा नष्ट झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

सरकारी आदेशाची अवज्ञा करणे तसेच गुन्ह्याचा पुरावा नष्ट होण्यास कारणीभूत ठरणे या आरोपांवरून पोलीस निरीक्षक प्रदीप झालटे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यानुसार डॉ. रामचंद्र जगताप व इतर संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणांमध्ये मयत रुग्णाचा उपचार डॉ. आदित्य साखरे यांच्या देखरेखी खाली सुरु होता. परंतु डॉ. आदित्य साखरे यांनी संबंधित रुग्णाच्या बाबत अक्षम्य हलगर्जीपणा व दुर्लक्ष केल्यामुळेच रुग्णाचा मृत्यू झाल्याचा दावा रुग्णांचे नातेवाईक करत आहेत. या प्रकरणांमध्ये रुग्णालयाचे मेडिकल सुपेरिन्टेंडंट डॉ. रामचंद्र जगताप व इतर प्रशासन अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला असला तरी डॉ. आदित्य साखरे हे देखील संबंधित रुग्णाच्या मृत्यूसाठी त्याच प्रमाणात जबाबदार असल्याचे नाकारता येत नाही. त्यामुळे डॉ. आदित्य साखरे यांच्यावर देखील गुन्हा दाखल व्हावा, अशी प्रतिक्रिया रुग्णाच्या नातेवाईकांनी दिली आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे वैद्यकीय क्षेत्रात तसेच बार्शी तालुक्यात मोठी चर्चा रंगली असून, संबंधित रुग्णालयाच्या कामकाजाच्या पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पुढील तपास बार्शी शहर पोलीस करत आहेत.

## महत्वाचे...

### १९ मार्चला सकाळी ६.५४ नंतर गुढी उभी करावी

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

नवीन शके १९४८ या संवत्सराचे नाव पराभव संवत्सर असे आहे. १९ मार्चला गुढीपाडव्याच्या दिवशी आपल्या नवीन वर्षाची सुरुवात होते. या दिवशी सकाळी घरोघरी गुढया उभ्या करुन, तोरणे लावून नवीन वर्षाचे स्वागत केले जाते. आपली कालगणना हजारो वर्षे जुनी आहे. ती ग्रहांवर आधारित कालगणना पंचांगाच्या माध्यमातून आपल्याला कळते म्हणून संवत्सरारंभाच्या दिवशी गुढीबरोबर पंचांगावरील गणपतीचे पूजन करावयास सांगितले आहे. हा उत्सव घरोघरी करावयाचा असल्यामुळे आपण स्वतंत्रपणे राहात असल्यास आपल्या घरी ही पूजा करुन सकाळी ६.५४ नंतर गुढी उभी करावी, गुढीपूजनाकरिता वेगळा असा विधी नाही. गुढी उभी करणे हे मांगल्याचे



प्रतीक आहे. त्यामुळे मंगलमय वातावरण तयार व्हावे याकरिता जे काही करता येण्यासारखे असेल तर सर्व करता येते. गुढी उभी करण्यासाठी आपण जी काठी वापरणार आहोत ती स्वच्छ धुवून, पुसून घ्यावी. त्याला रेशमी वस्त्र बांधून त्यावर एखादे चांदीचे भांडे किंवा घरातील कोणतेही स्वच्छ भांडे ठेवावे. गुढीला कडुनिंबाची पाने, आंब्याच्या डहाळ्या बांधाव्यात, साखरेची माळ घालावी. जिथे गुढी उभी करावयाची आहे ती जागा स्वच्छ करुन रांगोळी काढावी. अंघोळ करुन त्या जागी गुढी बांधावी व हळद, कुंकू, फुले वाहून तिची पूजा करावी. ब्रह्मदेवाने या सृष्टीला चालना दिलेली असल्याने या गुढीलाच ब्रह्मध्वज असेही म्हटले जाते. म्हणून ब्रह्मध्वजाची पुढील मंत्राने प्रार्थना करावी. ब्रह्मध्वज नमस्तेऽस्तु सर्वाभिष्ट फलप्रद । प्राप्तेऽस्मिन्वत्सरे नित्यं मद्गृहे मंगलं कुरु ।। ही प्रार्थना झाल्यावर पंचांगाचे पूजन करुन नवीन वर्षाचे पहिल्या दिवसाचे पंचांग वाचावे. त्यानंतर कडुनिंब, गूळ, जिरे आदी घालून केलेले कडुनिंबाचे पाणी घ्यावे. त्यानंतर वर्षभरातील महत्वाच्या घटना पिक-पाणी यांची माहिती करुन घ्यावी. सकाळी लवकर गुढी उभी करावी आणि सूर्यास्ताचे सुमारास नमस्कार करून ती पुन्हा उतरवून ठेवावी.




### नू.म.वि. शिशु शाळेत मुलांचा निरोप समारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

नू.म.वि. शिशु शाळेत मोठ्या गटातील मुलांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम व क्रीडा स्पर्धेतील विशेष कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ आणि मुलांचे वाढदिवस असा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती माननीय मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांचे होती. दीपप्रज्वलानंतर, प्रास्ताविकेमध्ये माननीय मुख्याध्यापिका अर्चनाताई यांनी मुलांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मोठ्या गटातील मुलांनी आपले शाळेबद्दल मनोगत, आठवणी व्यक्त केल्या. त्यानंतर बक्षीस वितरण समारंभ मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या हस्ते पार पडला. मुलांचे वाढदिवसही उत्साहात साजरे झाले. त्यानंतर संगीत शिक्षका अलका ओक यांनी या लाडक्या मुलांनो तुम्ही मला आधार हे गीत मुलांसाठी गायले. सूत्रसंचालन सविता कुलकर्णी यांनी केले होते.

### खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला २४ तासाच्या आत केले जेरबंद; सोलापूर ग्रामीण पोलिसांची कामगिरी

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

गुन्हा घडल्याचा २४ तासाच्या आत खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला सोलापूर ग्रामीण पोलिसांनी जेरबंद केले आहे. मौजे नातेपुते येथे दि. १४ मार्च २०२६ रोजी रात्री ११.०० वा. चे सुमारास पर्वतेश्वर माळ नातेपुते ता. माळशिरस येथील विजय डोंग्या भोसले (वय ३५) यास त्याची पत्नी कांती विजय भोसले व मेहुणा यया बिऱ्या काळे (रा. बारामती) यांनी बारामती येथे रहायला चल, असे म्हणुन विजय भोसले याचे सोबत भांडणे करुन यया बिऱ्या काळे याने मयत विजय डोंग्या भोसले याच्या डोक्यात दगड घालुन व कांती विजय भोसले हीने सुरीने विजय भोसले याच्या कानावर मारुन जखमी केले. लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन विजय डोंग्या भोसले यास जीवे ठार मारले. गुन्ह्यातील महीला आरोपी कांती विजय भोसले हिला ताब्यात घेतले व गुन्ह्यातील मुख्य आरोपी यया बिऱ्या भोसले हा फरार झाला होता. कांती भोसले कडे चौकशी केली असता सदरच गुन्हा मी व यया बिऱ्या भोसले असे दोघांनी मिळून केले बाबत कबुली दिली. मुख्य आरोपी यया बिऱ्या भोसले याला (रा. रहीमतपुर जि. सातारा ) येथे मिळुन आल्याने सापळा रचुन त्याचा पाठलाग करुन त्याला ताब्यात घेऊन गुन्हा घडल्यापासुन २४ तासाच्या आत जेरबंद केले. ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके, पोलीस निरिक्षक संजय जगताप स्था.गु.शा. सोलापुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि विशाल वायकर व नातेपुते पोलीस ठाणेते आरोपी शोध पथकातील मपोसई सोनल मोरे, सफौं. सतीश पाटकुलकर, देविदास धोत्रे, रविंद्र गायकवाड, पोहेकॉ धनाजी शेळके, पोना राकेश लोहार, सुरेश एकतपुरे, पोकों रणजित मदने, अस्लम शेख, मपोकों सीमा सोनवणे, चापोकों संतोष वारे, चापोकॉ नवनाथ चव्हाण, सायबर शाखेचे पोलीस अंमलदार प्रविण मेटकरी यांचे विशेष पथकाने पार पाडलेली आहे.

## निधन वृत्त...

### अंबुबाई चिप्पा



**सोलापूर, दि. १६ मार्च -**

अंबुबाई चिप्पा यांचे अल्पशा आजाराने निधन झाले ( राहणार न्यू पाच्छा पेठ, वय: ७५) त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, जावई, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, १७ मार्च २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



आत्मज्ञान ही संजीवनी आहे. मरणासन्न समाजाला त्याच्या भूतकाळातील वैभवाचे स्मरण करून, कर्तृत्व आणि धैर्य इत्यादी सुप्त गुणांना जागृत करून त्याचे पुनरुज्जीवन करता येते. इतिहासाचे अभ्यासक या वस्तुस्थितीपासून अनभिज्ञ नाहीत.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

### महत्त्वाचे

**युद्धनौका तैनातीसाठी अमेरिकेशी चर्चा नाही**

**नवी दिल्ली :** होर्मुझ सामुद्रधुनीतून व्यापारी जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीची खात्री करण्यासाठी नौदलाची जहाजे तैनात करण्याबाबत भारताने अमेरिकेसोबत कोणताही द्विपक्षीय चर्चा केलेली नाही, असे परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी स्पष्ट केले. या तणावाच्या पृष्ठभूमीवर हा सामरिक जलमार्ग खुला ठेवण्याच्या विविध देशांनी युद्धनौका पाठवाव्यात, असे आवाहन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केले होते. चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, युनायटेड किंगडम आणि इतर देशांनी हा जलमार्ग सुरक्षित आणि खुला ठेवण्यासाठी त्या भागात आपल्या युद्धनौका पाठवाव्यात, अशी अपेक्षा ट्रम्प यांनी व्यक्त केली होती.

# सेवानिवृत्त एस.टी. कर्मचाऱ्यांना पत्नीसह वर्षभर मोफत प्रवास

## परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांचे निर्देश



**◆ मुंबई, १६ मार्च**
एस.टी. कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री तथा एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधानभवन येथे महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एस.टी.च्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाने चालक-वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकीय प्रक्रियांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा हीच महामंडळाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




मंत्री सरनाईक यांनी एकाच ठिकाणी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा बजावणाऱ्या पर्यवेक्षक व अधिकाऱ्यांची इतर ठिकाणी बदली करण्याचे निर्देश एस.टी. प्रशासनाला दिले. या संदर्भात कर्मचारी संघटनांच्या भावना तीव्र असून, या प्रक्रियेची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. ◂(तभा वृत्तसेवा)

# नागपूर कन्व्हेन्शन सेंटरमध्ये बाबासाहेबांचा भव्य पुतळा

**◆ मुंबई, १६ मार्च**
नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर परिसरात लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा पुढील २ महिन्यात उभारण्यात येणार असल्याची घोषणा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानसभेत केली. याचबरोबर येथील विद्यार्थ्यांसाठी एआय-आधारित डिजिटल संशोधन सुविधा सुरू करण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगितले. या संदर्भात आमदार नितीन राऊत यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता , त्यावर उत्तर देताना मंत्री शिरसाट यांनी कन्व्हेन्शन सेंटरमधील विविध सुविधांची माहिती दिली. सुमारे १४० कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या या संकुलात ऑडिटोरियम, बँक्वेट हॉल, प्रशिक्षण हॉल, डॉरमेटरी, मिनी कॉन्फरन्स हॉल आणि गेस्ट रूम आदी सुविधा उपलब्ध आहेत व त्या सध्या पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे यावेळी सांगितले. भविष्यातील शिक्षण एआय व डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित असणार असल्याने विद्यार्थ्यांसाठी आधुनिक एआय-आधारित सुविधा उभारण्याचा निर्णय घेतल्याचेही मंत्री शिरसाट यांनी सांगितले.नागपूर शहराच्या प्रतिष्ठेला साजेसा उपयोग या संकुलाचा व्हावा यासाठी लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा विचार करून आवश्यक निर्णय घेतले जातील, असेही त्यांनी नमूद केले. ◂(तभा वृत्तसेवा)



## आरोग्य योजनांत गैरप्रकार करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई

राज्यातील ज्या रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू आहे. परंतु तरीही रुग्णांकडून अतिरिक्त पैसे वसूल करणाऱ्या रुग्णालयावर शासनाने कठोर कारवाई सुरू केली असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. त्याच बरोबर आतापर्यंत अशा ३३८ प्रकरणांमध्ये सुमारे ६०.४७ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आल्याचेही यावेळी सांगितले. या संदर्भात आमदार नाना पटोले यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. अकोला जिल्हा येथील एका खासगी रुग्णालयाविरुद्ध तपासण्या व शस्त्रक्रियांसाठी रुग्णांकडून पैसे घेतल्याच्या १२ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या चौकशीत एका रुग्णास घेतलेले पैसे परत करण्यात आले असून संबंधित रुग्णालयावर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. उर्वरित ११ तक्रारींवर नोटिसा बजावून चौकशी सुरू असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले. ■

# होमिओपॅथी डॉक्टरांच्या ॲलोपॅथी उपचार परवानगीचा प्रश्न न्यायालयात

**◆ मुंबई, १६ मार्च**
ग्रामीण आणि दुर्गम भागात वैद्यकीय सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी संदर्भातील प्रकरण सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत या कोर्सचे प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार नसल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य डॉ. तुषार राठोड यांनी या विषयावर लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की, राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात डॉक्टरांची कमतरता भासत असल्यामुळे हा कोर्स सुरू करण्यात आला होता.

होमिओपॅथी उपचार करणाऱ्या डॉक्टरांना गरजेच्या परिस्थितीत काही प्रमाणात ॲलोपॅथी औषधोपचार करता यावेत, यासाठी हा अभ्यासक्रम राबवण्यात आला. राज्यात आतापर्यंत सुमारे ८ हजार डॉक्टरांनी हा कोर्स पूर्ण केला असून ३३ प्रशिक्षण संस्थांमार्फत त्याचे शिक्षण दिले जात असल्याची माहितीही त्यांनी सभागृहात दिली. ◂(तभा वृत्तसेवा)

## गॅसचा काळा बाजार करणाऱ्यांविरुद्ध कारवाई

**◆ मुंबई, १६ मार्च**
मध्य-पूर्व आशियातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्याबाबत देशभरात चर्चा सुरू असताना महाराष्ट्रात एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत असल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. गॅस सिलिंडरचा काळाबाजार थांबवण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून जिल्हास्तरावर दक्षता पथके सक्रिय करण्यात आली आहेत, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत दिली. गॅस सिलिंडरच्या अवैध विक्रीला आळा घालण्यासाठी राज्यभरात मोठ्या प्रमाणावर तपासण्या करण्यात येत आहेत. जानेवारी २०२६ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत २,१२९ ठिकाणी तपासणी मोहीम राबवण्यात आली. या कारवाईत १,२०८ अवैध सिलिंडर जप्त केल्याचे भूजबळ यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)



# युद्ध संपून शांतता निर्माण व्हावी : हर्षवर्धन सपकाळ

**◆ मुंबई, १६ मार्च**
अमेरिका -इस्त्रायल -इराण यांच्यातील युद्ध लवकर संपून आशियात शांतता निर्माण व्हावी, अशी सदिच्छा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली आहे.

सपकाळ यांनी आज इराणच्या कॉन्सुलेटला भेट देऊन मुंबईतील इराणचे जनरल सईद रझा मोसायब मोतलाघ यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी त्यांच्यासोबत प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस धनंजय शिंदे आणि सामाजिक कार्यकर्ते फिरोज मिठीबोरवाला उपस्थित होते.

या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, निमंत्रणाच्या अनुषंगाने झालेल्या या भेटीदरम्यान इराणचे सर्वोच्च नेते दिवंगत अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनाबद्दल तसेच हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या सैनिक व नागरिक, विशेषता १६५ शाळकरी मुली आणि १४ शिक्षकांबद्दल आणि दोन्ही बाजूच्या मृत्युमुखी पडलेल्यांप्रती शोक संवेदना व्यक्त केल्या.



तासाभराच्या भेटीत भारत आणि इराण यांच्यातील प्राचीन सभ्यतागत संबंधांबद्दलही उल्लेख केला आणि या संबंधांचा भारतीय समाजावर तसेच मराठी भाषा, साहित्य आणि आपसी देवाणघेवाणीवर व संस्कृतीवर झालेल्या प्रभावाबद्दलही चर्चा झाली. खंडित झालेली इंधन पुरवठा साखळी लवकर सामान्य पातळीवर यावी, अशी अपेक्षा देखील व्यक्त केली. मोतलघ यांनी सध्याच्या युद्धपरिस्थितीबद्दल तसेच त्यामागील घटनाक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच त्यांनी सध्याच्या परिस्थितीबाबत माहिती देत इराणी जनतेने दाखविलेल्या धैर्य आणि चिकाटीबद्दलही भाष्य केले. भारत बुद्धांची व गांधींची भूमी असल्याने जगात शांतता नांदावी अशी भूमिका मांडल्याचे सपकाळ यांनी सांगितले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोतलाघ यांना महात्मा गांधी यांचे आत्मचरित्र भेट दिले. ◂(तभा वृत्तसेवा)

## मशिदीत नमाज पठन करणाऱ्यांच्या संख्येवर मर्यादा

**संभल :** उत्तर प्रदेशातील संभलमध्ये मशिदीत नमाज पठन करणाऱ्यांची संख्या २० पर्यंत मर्यादित ठेवण्याचा जिल्हा प्रशासनाचा आदेश अलाहाबाद उच्च न्यायालयाने सोमवारी रद्द केला. न्यायालयाने नमाज पठनाच्या वेळी सुरक्षा सुनिश्चित करण्याचे निर्देशही उत्तर प्रदेश सरकारला दिले. न्यायमूर्ती अतुल श्रीधर आणि सिद्धार्थ रंजन यांच्या न्यायासनाने मुनाझीर खान यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना हा निर्णय दिला. याचिकेत तक्रार करण्यात आली होती की, संभल येथील प्रशासन नमाज पठन करणाऱ्यांची संख्या फक्त २० पर्यंत मर्यादित ठेवत आहे. सुनावणीदरम्यान, दोन्ही न्यायाधीशांनी जिल्हा प्रशासनाच्या निर्बंधांवर आक्षेप घेत संभल प्रशासनाला फटकारले.

# भाजपाचे १४४ उमेदवार जाहीर

## सुवेंदू, दिलीप घोष, अशोक दिंडांना संधी

**◆ कोलकाता, १६ मार्च**
पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने निवडणूक तयारी तीव्र केली आहे. पक्षाने अनेक प्रमुख मतदारसंघांसाठी १४४ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. या यादीत राज्यातील सर्वात जास्त चर्चेत असलेल्या मतदारसंघांपैकी एक भवानीपूर मतदारसंघातून भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांचा समावेश आहे. उमेदवारांच्या निवडीत भाजपाने नवीन चेहरे आणि अनुभवी नेत्यांना संधी दिली आहे.

यादीत भाजपाने सुवेंदू अधिकारी आणि दिलीप घोष यांना तिकीट दिले आहे. भाजपने सुवेंदू अधिकारी यांना नंदीग्राम आणि भवानीपूर या दोन मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी गतवेळी भवानीपूर मतदारसंघातून विजयी झाल्या होत्या. तर २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत सुवेंदू अधिकारी यांनी नंदीग्राम मतदारसंघातून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा सुमारे २००० मतांनी पराभव केला होता. ◂(वृत्तसंस्था)

### केरळसाठी ४७ उमेदवारांची घोषणा

तिरुवनंतपुरम. भाजपाने केरळ विधानसभा निवडणुकीसाठी सोमवारी ४७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. यात केरळ भाजपचे प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर यांचा समावेश आहे. त्यांना निमोना विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपापूर्वी, सत्ताधारी एलडीएफ सरकारचा दुसरा सर्वात मोठा मित्र असलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (सीपीआय) रविवारी केरळ विधानसभा निवडणुकीसाठी २५ मतदारसंघांसाठी आपले उमेदवार जाहीर केले. भाजपाच्या पहिल्या यादीत सुरेंद्रन मंजेश्वरममधून निवडणूक लढवतील. प्रफुल्ल कृष्णन हे कोयिलंदीमधूनही निवडणूक लढवतील. काँग्रेस पक्ष सोडलेले सी. रघुनाथ कन्नूरमधून निवडणूक लढवतील. ■

## चौफेर खरेदीने सेन्सेक्स वधारला


**◆ मुंबई, १६ मार्च**
सलग तीन दिवसांच्या घसरणीनंतर भारतीय शेअर बाजाराने सोमवारी जोरदार पुनरागमन केले. अत्यंत अस्थिर सत्रत ऑटो, बँकिंग आणि एफएमसीजी क्षेत्रातील समभागांमध्ये झालेल्या खरेदीमुळे निफ्टी ५० ने २३,४०० चा टप्पा यशस्वीरीत्या पार केला.

# ओडिशाच्या सरकारी रुग्णालयाला आग

**१० जणांचा मृत्यू**

**◆ कटक, १६ मार्च**
ओडिशातील कटकमध्ये सोमवारी पहाटे सरकारी रुग्णालयाला आग लागली. ही आग एससीबी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागाला लागली. या घटनेत दहा रुग्णांचा मृत्यू झाला. ही आग पहाटे २:३० ते ३:०० च्या दरम्यान लागली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

रुग्णालयाच्या ट्रॉमा केअर विभागाच्या अति दक्षता विभागामध्ये आग लागली आणि ती वेगाने वाढत गेली. गंभीर स्थितीत असलेल्या रुग्णांवर तेथे उपचार सुरू होते. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाची पथके तातडीने रुग्णालयात दाखल झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी कारवाई सुरू केली आणि आग आटोक्यात आणली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. रुग्णांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याच्या प्रयत्नात रुग्णालयातील अकरा कर्मचारीही भाजले. एकूण २३ रुग्णांना तातडीने इतर विभाग आणि वॉर्डमध्ये हलवण्यात आले. रुग्णालयातील कर्मचारी, पोलिस आणि रुग्णांसोबत असलेल्या लोकांनीही या बचाव कार्यात मदत केली.



आग लागल्यानंतर अतिदक्षता विभागाची झालेली अवस्था

### मृतांच्या कुटुंबीयांना २५ लाख

**जखमी रुग्णांच्या उपचारांमध्ये कोणतीही कमतरता भासू नये यासाठी मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांबद्दल त्यांनी शोक व्यक्त केला. सरकारने प्रत्येक मृतांच्या कुटुंबियांना २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या, रुग्णालयातील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत आणि सखोल चौकशी सुरू आहे.** ■

घटनेची माहिती मिळताच, मुख्यमंत्री मोहन चरण माझी आणि आरोग्यमंत्री मुकेश महालिंग यांनी रुग्णालयात धाव घेतली. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला आणि रुग्णांची भेट घेतली. आगीचे मुख्य कारण शॉर्ट सर्किट असावे. आगीने ट्रॉमा केअर आयसीयू तसेच जवळच्या अनेक वॉर्डांना वेढले.

हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान सात गंभीर आजारी रुग्णांचा मृत्यू झाला. यानंतर उपचारादरम्यान आणखी तीन रुग्णांचा मृत्यू झाला, असे माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

## बेकायदेशीर कॉल सेंटरवर ईडीचे छापे

कोलकाता : सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) पश्चिम बंगालमध्ये मोठी कारवाई केली. तपास पथकांनी राज्यातील विविध भागात छापे टाकले. ही कारवाई बेकायदेशीर कॉल सेंटर्स आणि व्यक्तींच्या फसवणुकीशी संबंधित आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सिलीगुडी, हावडा, विधाननगर आणि दुर्गापूर येथे सुमारे १० ठिकाणी छापे टाकण्यात आले. या प्रकरणात सुरश्री कर, सम्राट घोष आणि सुभाजित चक्रवर्ती हे प्रमुख संशयित म्हणून समोर आले आहेत. ईडी संबंधित व्यक्ती आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात महत्वाचे पुरावे शोधत आहे. त्यांच्यावर कॉल सेंटरद्वारे असंख्य निष्पाप लोकांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. तपास संस्था सर्व कोनातून या प्रकरणाची चौकशी करत आहे.




# इराणविरोधात साथ द्या, अन्यथा परिणाम भोगा!

## ट्रम्प यांनी नाटो देशांवर टाकला दबाव

**◆ वॉशिंग्टन, १६ मार्च**
अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षामुळे जागतिक राजकारणात तणाव अधिक तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नाटो देशांना स्पष्ट इशारा देत होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा जहाज वाहतुकीसाठी खुली करण्यासाठी अमेरिकेला मदत करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी म्हटले आहे की इराणविरुद्धच्या कारवाईत अमेरिकेसोबत उभे राहिले नाहीत, तर त्याचे परिणाम नाटो देशांना भोगावे लागू शकतात. इराणने अलीकडेच अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देताना होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी सागरी वाहतूक मोठ्या प्रमाणावर रोखली आहे. त्याचा परिणाम इंधन आणि वायू पुरवठ्यावर झाला आहे.

होमुर्झ मार्गातून जगातील मोठ्या प्रमाणात तेल आणि वायूची निर्यात होत असल्याने या निर्णयाचा परिणाम आंतरराष्ट्रीय ऊर्जा पुरवठ्यावर झाला आहे. त्यामुळे अनेक देशांमध्ये इंधन पुरवठा आणि किमतींबाबत चिंता वाढली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर मदतीची मागणी सुरू केली आहे. एका आंतरराष्ट्रीय आर्थिक वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी सांगितले की अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांनी या संकटात सहकार्य केले नाही, तर नाटोचे भविष्य धोक्यात येऊ शकते. इराणशी संबंधित तणावामुळे त्यांनी या महिन्याच्या अखेरीस चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत होणाऱ्या नियोजित बैठकीबाबतही अनिश्चितता व्यक्त केली आहे. ट्रम्प यांनी चीनवरही या प्रश्नात सहकार्य करण्यासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते चीनला लागणाऱ्या तेलापैकी मोठा हिस्सा याच सागरी मार्गातून जातो. त्यामुळे या मार्गाची सुरक्षितता राखणे चीनसाठीही तितकेच महत्त्वाचे आहे. बीजिंगची भूमिका स्पष्ट झाल्यानंतरच पुढील दौऱ्याबाबत निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी संकेत दिले. ◂(वृत्तसंस्था)

### सुरक्षेची जबाबदारी सर्वांचीच

अमेरिकेच्या अध्यक्षांनी असेही स्पष्ट केले की या सागरी मार्गाचा फायदा घेणाऱ्या सर्व देशांची जबाबदारी आहे की त्यांनी त्याची सुरक्षितता सुनिश्चित करावी. यापूर्वी त्यांनी चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया आणि ब्रिटन या देशांना त्यांच्या युद्धनौका पाठवून या मार्गाची सुरक्षा करण्याचे आवाहन केले होते. ट्रम्प यांनी सातत्याने असा दावा केला आहे की होर्मुझ सामुद्रधुनी कोणत्याही परिस्थितीत इराणच्या नियंत्रणाखाली राहू नये आणि ती पूर्णपणे सुरक्षित ठेवली पाहिजे. ■

### जहाज वाहतूक विस्कळीत

दरम्यान, इराणमध्ये सुरू असलेल्या संघर्षानंतर या सामुद्रधुनीतून होणारी जहाज वाहतूक जवळजवळ ठप्प झाली आहे. इराण, संयुक्त अरब अमिराती आणि ओमान यांच्या दरम्यान असलेला हा सुमारे चौपन्न किलोमीटर रुंदीचा सागरी मार्ग जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे या भागातील तणावामुळे अनेक देशांमध्ये ऊर्जा संकटाची भीती व्यक्त केली जात आहे. ■

# बेकायदेशीर कॉल सेंटरवर ईडीचे छापे

**◆ कोलकाता, १६ मार्च**
सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) सोमवारी पश्चिम बंगालमध्ये मोठी कारवाई केली. तपास पथकांनी राज्यातील विविध भागात छापे टाकले. ही कारवाई बेकायदेशीर कॉल सेंटर्स आणि व्यक्तींच्या फसवणुकीशी संबंधित आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सिलीगुडी, हावडा, विधाननगर आणि दुर्गापूर येथे सुमारे १० ठिकाणी छापे टाकण्यात आले. या प्रकरणात सुरश्री कर, सम्राट घोष आणि सुभाजित चक्रवर्ती हे प्रमुख संशयित म्हणून समोर आले आहेत.

ईडी संबंधित व्यक्ती आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात महत्वाचे पुरावे शोधत आहे. त्यांच्यावर कॉल सेंटरद्वारे असंख्य निष्पाप लोकांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. तपास संस्था सर्व कोनातून या प्रकरणाची चौकशी करत आहे. ■

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर **तरुण भारत**
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# आयुधांचा अनाठायी आधार!

संसदेच्या सभागृहाचा कारभार नियमांनुसार चालतो. सत्ताधारी किंवा विरोधकांतील कोणीही पक्ष किंवा सदस्य कितीही ज्येष्ठ असला, त्याच्या पाठीशी कितीही संख्याबळ असले किंवा त्यास कितीही मोठा जनाधार लाभलेला असला, तरी संसदीय कामकाजाच्या नियमांकडे पाठ फिरवून मनमानीपणे त्यास कामकाजात सहभागी होता येत नाही. तथापि, सध्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्राच्या कामकाजात जे काही सुरू आहे, ते पाहता, संसदीय कामकाजाच्या शिस्त, संकेत व नियमांचे भान विरोधी पक्षांस आहे किंवा नाही याची शंका येणे साहजिक आहे. सत्ताधाऱ्यांस अडचणीत आणण्यासाठी किंवा धारेवर धरण्यासाठी संसदीय नियमांच्या चौकटीत राहून आक्रमकपणाने कामकाजात सहभागी होणे हे विरोधकांचे कामच असते. मात्र, कामकाजाच्या नियमांचा आधार घेऊन एखादे वैधानिक आयुध उपसायचे आणि ज्या कारणासाठी त्याचा वापर करण्यास संमती मिळालेली असेल त्यापासून भरकटत जाऊन भलतीकडेच ते आयुध चालवायचे असेच काहीसे विरोधी बाकांवरून सुरू असल्याचा जो आरोप होत आहे, ते पाहता, विरोधकांना देशाच्या आणि जनतेच्या हितासाठी संसदेच्या कामकाजाचा मंच वापरावयाचा आहे की केवळ सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमाहननाचा जुना एककलमी कार्यक्रम राबविण्यासाठी संसदेचा वापर करावयाचा याबाबत शंका यावी अशी स्थिती दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सत्ताधारी रालोआ यांचे पूर्ण प्रतिमाहनन करणे आणि जनमानसातील त्यांचे स्थान डळमळीत करणे हा विरोधकांचा, विशेषतः काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचा एकमेव कार्यक्रम असल्याची बाब आता लपून राहिलेली नाही.

येत्या महिनाभरात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. त्याआधी प्रतिमाहननाचा हा कार्यक्रम नेटाने राबविण्याच्या मोहिमेचाच एक भाग म्हणून, देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोगाचा प्रस्ताव विरोधकांकडून दाखल करण्यात येत आहे. येत्या ९ एप्रिलपासून ४ मेपर्यंतच्या काळात देशातील केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम या चार राज्यांच्या आणि पुड्डुचेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर आता मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील महाभियोगाच्या विरोधकांच्या कृतीस राजकीय महत्त्व प्राप्त झाले असून कोणत्याही प्रकारे सरकारचे व सरकारी वा स्वायत्त यंत्रणांचे प्रतिमाहनन करण्याच्या सातत्यपूर्ण कार्यक्रमाचाच हा एक भाग ठरेल. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यातील मतदारयाद्यांच्या (एसआयआर) सखोल फेरतपासणी मोहिमेच्या विरोधात मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध थेट संघर्ष पुकारला असून त्याआडून केंद्र सरकारवर प्रतिमाहननाचे हत्यार चालविण्याचा त्यांचा राजकीय हेतू लपून राहिलेला नाही. मुख्य निवडणूक आयुक्त हे एसआयआरचे निमित्त साधून भाजपाच्या फायद्यासाठी काम करत आहेत, असा त्यांचा आरोप असल्याने, गेल्या १५ वर्षांची सत्ता शाबूत ठेवण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी प्रतिमाहननाचे हे नवे हत्यार उपसून निवडणुका गाजविण्याचे ठरविलेले दिसते. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याच्या जेमतेम दोन दिवस अगोदर विरोधकांनी संसदेत मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोग चालविण्याची मागणी करणारा प्रस्ताव सादर केला आहे. देशाच्या इतिहासात बहुधा प्रथमच, मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात दाखल होणाऱ्या महाभियोग प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने पुन्हा एकदा संसदेच्या मंचावर सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमहननाची मोहीम तीव्र करण्याचा विरोधकांचा हेतू आहे का, हे काळाच्या ओघात पुन्हा स्पष्ट होणारच आहे. पण त्याचा आगामी निवडणुकांमध्ये राजकीय लाभ उठविण्याच्या त्यांचा प्रयत्न असेल हे मात्र आता स्पष्ट झाले आहे.

या चारही राज्यांतील राजकारण हे केवळ विचारधारांवर नाही, तर तेथील खोलवर रुजलेल्या जातीय आणि धार्मिक समीकरणांवरही आधारित आहे. प्रत्येक राज्याची सामाजिक संरचना वेगळी असल्याने त्यांचा निवडणुकीवरील प्रभावही भिन्न असतो. तामिळनाडूचे राजकारण तर देशातील अन्य राज्यांपेक्षा वेगळे आहे. येथे द्रविडी चळवळीतून सत्ताकारणाचा पाया रचला गेला आहे. द्रविडी अस्मिता आणि ओबीसी राजकारण ही या राज्याच्या सत्तेची सूत्रे आहेत. त्यातूनच ब्राह्मण व ब्राह्मणेतर अशा जातीय संघर्षास खतपाणी घातले गेले. लोकसंख्येच्या प्रमाणात जातीय प्रभाव असलेला ओबीसी समुदाय, वन्नियार समुदाय, थेवर, गोंडर आदी समुदायांची ताकद पाठीशी उभी करण्यासाठी या संघर्षाचा वापर केला जातो. दलित समुदायाची मतेही प्रभावी असल्याने, आरक्षण हादेखील येथील कळीचा मुद्दा राहिला आहे. जो पक्ष या समुदायांस गोंजारतो, तो सत्तेच्या जवळ जातो हा या राज्याच्या सत्ताकारणाचा इतिहास राहिला आहे. केरळच्या राजकारणासही जातींच्या राजकारणाचे कंगोरे आहेत. सुमारे ४५ टक्के अल्पसंख्यक समुदायाचे पाठबळ मिळविणे आणि हिंदू समुदायांतील प्रभावी गटांना गोंजारणे ही येथील निवडणुकीची राजनीती असते, तर आसाममध्ये स्थानिक व उपरे यावर प्रादेशिक व वांशिक अस्मिता जोपासली जाते. त्यामुळे धार्मिक, जातीय ध्रुवीकरण हा या राज्यांच्या सत्ताकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. पश्चिम बंगालमध्ये डाव्यांच्या दीर्घ सत्ताकाळात लपून राहिलेली जातीय समीकरणे ममता सरकारच्या सत्ताकारणात फोफावली आणि एसआयआरच्या निमित्ताने आता या समीकरणांची मोडतोड होण्याची भीती निर्माण झाल्याने, महाभियोगाच्या प्रस्तावाचे हत्यार निवडणुकीत वापरले जाईल. कारण या पाच राज्यांपैकी पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये विरोधकांची मजबूत सत्ताकेंद्रे प्रस्थापित झालेली आहेत. आसामवर गेल्या १० वर्षांपासून भाजपाचा झेंडा आहे आणि या राज्याची सत्ता कायम राखण्यासाठी भाजपची मजबूत मोर्चेबांधणी सुरू राहणार आहे. बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या तृणमूल सरकारला सत्तेवरून खेचण्यासाठी भाजपने सारी ताकद पणाला लावली आहे, तर केरळ आणि तामिळनाडूमध्ये ताकद वाढविण्यावर भाजपाचा भर राहणार आहे. २०१९ मध्ये भाजपची पश्चिम बंगालमधील स्थिती सुधारली होती. मात्र तृणमूल काँग्रेसच्या आक्रमक राजकारणाने भाजपची वाटचाल खडतर राहिली. आता सलग चौथ्यांदा राज्याची सत्ता हस्तगत करण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी सुरू केलेल्या प्रयत्नांना मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्धचा महाभियोग प्रस्ताव आणि मतदारयाद्या अद्ययावतीकरणातून वगळलेल्या नावांचे राजकारण साथ देणार का, हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. कोलकाता येथे घडलेले आरजी कार इस्पितळ बलात्कार प्रकरण हे ममता सरकारसमोरील आव्हान ठरणार आहे. मात्र, या राज्यातील जवळपास २७ टक्के मुस्लिम समुदायाच्या मनात असुरक्षिततेची भावना पेरण्याच्या राजकारणातून भाजपाविरोधाची हवा तापविण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार हे स्पष्ट आहे.

मतदारयाद्यांच्या सखोल तपासणी मोहिमेमुळे एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही आणि एकाही अपात्र व्यक्तीस मतदान करता येणार नाही अशी कठोर भूमिका निवडणूक आयोगाने घेतल्याने पश्चिम बंगालमधील मतदारयाद्यांमधून जवळपास ६३ लाख नावे वगळली गेली आहेत. आणखी सुमारे ६० लाख नावांचे भवितव्य पणाला लागलेले आहे. हा ममता बॅनर्जी यांच्या प्रस्थापित राजकारणास मोठा धक्का मानला जातो. त्यामुळेच, महाभियोग प्रस्ताव आणि एसआयआरद्वारे सुरू झालेली मतदार छाननी या दोन बाबी निवडणूक प्रचारातील भाजपच्या प्रतिमाहननाच्या मोहिमेत केंद्रस्थानी राहाव्यात असा प्रयत्न राहील. याआधीच्या निवडणुकांत मतदान यंत्रांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्हे उमटविण्याचा प्रयत्न झाला होता. मतदारयाद्यांतील घोळाचे भांडवल करून सत्ताधारी भाजपा व निवडणूक आयोगास घेरण्याचा प्रयत्न झाला होता. आता महाभियोगाचे आयुध उगारून नव्या प्रयत्नासाठी सज्ज होण्याचा प्रयत्न विरोधकांच्या तंबूत सुरू झाला आहे. अशा राजकारणात, लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या संसदेच्या कामकाजास वेठीस धरले जाऊ नये ही सामान्य नागरिकांची अपेक्षा उपेक्षित राहता नये!

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# जगावर दीर्घकालीन युद्धाची सावली

इराण आणि अमेरिका यांच्यात वाढत चाललेला संघर्ष केवळ दोन राष्ट्रांमधील लष्करी चकमकींपुरता मर्यादित नाही. या संघर्षात दोन्ही बाजूंनी लढाई दीर्घकाळ सुरू ठेवण्याचा व्यक्त केलेला निर्धार, त्यामागील सामरिक गणित, भूतकाळातील अनुभव आणि जागतिक परिणाम यांचा विचार केल्यास हा प्रश्न केवळ प्रादेशिक राहात नाही, तर संपूर्ण जगाच्या स्थैर्यावर परिणाम करणारा ठरतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या देशाकडे प्रचंड शस्त्रसाठा असल्याचा दावा करत युद्ध दीर्घकाळ चालवण्याची क्षमता असल्याचे संकेत दिले आहेत. दुसरीकडे, इराणनेही किमान सहा महिने युद्ध सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. या दोन घोषणांमधून स्पष्ट होते की संघर्ष तात्पुरता किंवा मर्यादित राहील, अशी अपेक्षा करणे अवास्तव ठरू शकते. आधुनिक युद्धात निर्णायक विजय पटकन मिळत नाही; उलट दीर्घकालीन संघर्ष हीच अधिक सामान्य बाब बनली आहे. लष्करी शक्तीच्या दृष्टीने पाहता अमेरिका जगातील सर्वांत सामर्थ्यशाली राष्ट्र मानले जाते. तिच्याकडे अत्याधुनिक हवाई दल, नौदल, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान आणि जगभर पसरलेले लष्करी तळांचे जाळे आहे. याउलट इराणकडे अमेरिकेसारखी प्रचंड पारंपरिक लष्करी क्षमता नसली, तरी त्याने असीमित युद्धतंत्र विकसित केले आहे. बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, ड्रोन तंत्रज्ञान, प्रादेशिक मित्रगट आणि समुद्री मार्गांवर प्रभाव टाकण्याची क्षमता या माध्यमातून तो आपल्या तुलनेने कमी साधनसामग्रीतून मोठ्या शक्तीला आव्हान देऊ शकतो.

अमेरिकेच्या लष्करी इतिहासाकडे पाहिले असता एक महत्त्वाची बाब लक्षात येते. प्रचंड शक्ती असूनही तिला काही वेळा तुलनेने लहान किंवा कमी शक्तिशाली राष्ट्रांविरोधात अपेक्षित यश मिळालेले नाही. याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे व्हिएतनाम युद्ध. तांत्रिक आणि लष्करी वर्चस्व असूनही अमेरिकेला दीर्घकाळ चाललेल्या संघर्षानंतर माघार घ्यावी लागली. त्याचप्रमाणे अफगाणिस्तानमध्ये दोन दशके ठाण मांडूनही शेवटी अमेरिकेवर माघारीची नामुष्की ओढवली. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष दीर्घकाळ चालल्यास दोन्ही देशांना किंमत चुकवावी लागेल. अमेरिकेसाठी सर्वांत मोठा प्रश्न आर्थिक आणि सामरिक संसाधनांचा असेल. जगभर अनेक लष्करी जबाबदाऱ्या सांभाळताना आणखी एक मोठा संघर्ष टिकवून ठेवणे हे तिच्यासाठी आव्हानात्मक ठरू शकते. इराणसाठीही परिस्थिती सोपी नाही. आंतरराष्ट्रीय निर्बंध, मर्यादित आर्थिक साधने आणि आधीच दबावाखाली असलेली अर्थव्यवस्था यामुळे दीर्घ युद्ध देशांतर्गत संकटे वाढवू शकते. म्हणजेच, या संघर्षात जिंकणारा कोणी असला, तरी तो पूर्णपणे निष्कलंक राहणार नाही. दोन्ही बाजूंना मोठी मानवी, आर्थिक आणि राजकीय किंमत मोजावी लागेल. या संघर्षाचा परिणाम केवळ मध्यपूर्वेपुरता मर्यादित राहणार नाही. विशेषतः ऊर्जा बाजारपेठेवर त्याचा मोठा प्रभाव पडू शकतो.



मध्यपूर्व हा तेलपुरवठा करणारा जगातील सर्वांत महत्त्वाचा प्रदेश आहे. येथे अस्थिरता वाढल्यास जागतिक तेलदर वाढण्याची शक्यता असते. याचा थेट परिणाम जगातील अर्थव्यवस्थांवर होतो. याशिवाय जागतिक राजकारणातही नव्या समीकरणांची निर्मिती होऊ शकते. रशिया आणि चीन यासारखी राष्ट्रे या संघर्षाचा फायदा घेऊन आपले सामरिक हितसंबंध मजबूत करण्याचा प्रयत्न करू शकतात. युक्रेन दीर्घकाळापासून रशियाच्या तुलनेत कमी शस्त्रे आणि कमी सैनिक असूनही कडवी लढत देत आहे. तरीदेखील शस्त्रांचा साठा आणि पुरवठा युद्धात महत्त्वाची भूमिका बजावतात. इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील या संघर्षाच्या सुरुवातीलाच हल्ल्यांची गती अत्यंत वेगवान राहिली आहे. दोन्ही बाजू ज्या वेगाने शस्त्रांचा वापर करत आहेत, त्या वेगाने त्यांचे उत्पादन होत नाही. 'इन्स्टिट्यूट फॉर नॅशनल सेक्युरिटी स्टडीज' (आयएनएसएस) च्या अंदाजानुसार, अमेरिका आणि इस्रायल यांनी आतापर्यंत दोन हजारपेक्षा अधिक हल्ले केले आहेत. त्यात विविध प्रकारची शस्त्रे वापरण्यात आली आहेत. 'आयएनएसएस'च्या मते, इराणने आतापर्यंत ५७१ क्षेपणास्त्रे आणि १,३९१ ड्रोन डागले आहेत. त्यापैकी अनेक हवेतच पाडण्यात आले; मात्र या पातळीवरील लढाई दीर्घकाळ चालू ठेवणे दोन्ही बाजूंसाठी कठीण ठरणार आहे. इराणचे शाहीद १३६ ड्रोन कमी उंचीवर उडतात आणि ते रडारवर ओळखणे कठीण असते. हे ड्रोन सुमारे २५०० किलोमीटर अंतरावर लक्ष्य भेदू शकतात.

पाश्चिमात्य देशांच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, की इराणकडून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या संख्येत आधीच घट दिसू लागली आहे. युद्धाच्या पहिल्या दिवशी शेकडो क्षेपणास्त्रे डागली गेली होती. ती आता कमी झाली आहेत. युद्धापूर्वी असा अंदाज व्यक्त केला जात होता, की इराणकडे दोन हजारांपेक्षा अधिक कमी पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा आहे. कोणताही देश आपल्या शस्त्रसाठ्याची अचूक संख्या सार्वजनिक करत नाही. कारण त्यामुळे शत्रूला माहिती मिळू शकते. अमेरिकेचे वरिष्ठ लष्करी अधिकारी डॅन केन यांनी सांगितले की युद्धाच्या पहिल्या दिवसाच्या तुलनेत इराणकडून होणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रक्षेपणात ८६ टक्के घट झाली आहे. 'युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांड' (सेंटकॉम) च्या मते, केवळ मागील २४ तासांमध्येच त्यात २३ टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे. युद्धापूर्वी असेही मानले जात होते, की इराणने हजारो 'वन-वे अॅटॅक' प्रकारचे ड्रोन तयार करून ठेवले आहेत. त्याने रशियालाही हे तंत्रज्ञान दिले असून ते युक्रेनमध्ये त्याचा वापर करत आहेत. अमेरिकेनेही या डिझाईनची नक्कल केली आहे; मात्र जनरल केन यांच्या मते, संघर्षाच्या पहिल्या दिवसानंतर इराणच्या ड्रोन हल्ल्यांमध्ये ७३ टक्क्यांची घट झाली आहे. यावरून असे दिसते, की इराणला मोठ्या वेगाने हल्ले सुरू ठेवण्यात अडचणी येत आहेत. तथापि असेही शक्य आहे की इराण आपला शस्त्रसाठा वाचवण्यासाठी जाणीवपूर्वक हल्ले कमी करत असावा; पण उत्पादन सुरू ठेवणे आता अधिक कठीण होऊ शकते, कारण अमेरिका आणि इस्रायलची लढाऊ विमाने आता इराणवर हवाई वर्चस्व प्रस्थापित करत आहेत.

इराणची बहुतेक हवाई संरक्षण व्यवस्था नष्ट झाली असून त्याची वायुसेना प्रभावी राहिलेली नाही. 'सेंटकॉम'च्या मते, युद्धाचा पुढील टप्पा आता इराणचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन लाँचर, शस्त्रसाठे, शस्त्र उत्पादन कारखान्यांना लक्ष्य करण्यावर केंद्रित असेल. यामुळे अमेरिका आणि इस्रायलसाठी इराणची लढण्याची क्षमता कमकुवत करणे सोपे होऊ शकते; मात्र त्याचा संपूर्ण शस्त्रसाठा नष्ट करणे कठीण असेल. इराणचे क्षेत्रफळ फ्रान्सच्या तुलनेत जवळजवळ तीनपट मोठे आहे. त्यामुळे शस्त्रे जमिनीखाली लपवणे शक्य आहे. अलिकडील इतिहासाकडे पाहिले, तर केवळ हवाई हल्ल्यांद्वारे युद्ध पूर्णपणे जिंकणे शक्य होत नाही, असे दिसते. तीन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या तीव्र बॉम्बहल्ल्यांनंतरही इस्रायलला गाझा पट्टीत 'हमास'ला पूर्णपणे नष्ट करता आलेले नाही. त्याचप्रमाणे येमेनमध्ये हुती बंडखोरही एका वर्षाच्या अमेरिकी बॉम्बहल्ल्यांनंतर टिकून राहिले. अमेरिकेकडे जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्य आहे. तिच्याकडे इतर कोणत्याही देशापेक्षा पारंपरिक शस्त्रांचा मोठा साठा आहे; मात्र अमेरिकी सैन्य प्रामुख्याने महाग आणि अत्यंत अचूक मार्गदर्शित शस्त्रांवर अवलंबून असते. त्यांचे उत्पादन मर्यादित प्रमाणात होते. ट्रम्प यांनी संरक्षण कंपन्यांची बैठक बोलावली आहे. अमेरिकेच्या संसाधनांवरही काही प्रमाणात दबाव असल्याचे संकेत मिळतात. अमेरिका महागड्या आणि लांब पल्ल्याच्या 'टॉमहॉक क्रूज मिसाईल' ऐवजी तुलनेने स्वस्त शस्त्रांचा वापर करत आहे. अमेरिकी वायुसेना आता 'जेडीएएम' बॉम्बचा वापर करत आहे. अमेरिका दरवर्षी सुमारे ७०० क्षेपणास्त्रे तयार करते. इराण सतत बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागत राहिला, तर हा मर्यादित साठा वेगाने कमी होऊ शकतो. अमेरिकेकडे सुमारे १६०० पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा असू शकतो; परंतु अलिकडील काळात तो कमी झाला असावा. ट्रम्प यांनी पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा कमी करण्याचा धोका स्वीकारल्यास अमेरिका इराणविरुद्धच्या युद्धात अधिक काळ टिकू शकते; मात्र त्यामुळे प्रशांत महासागर क्षेत्रातील संभाव्य संघर्षाचा धोका वाढू शकतो.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# महिलांनी घडवलेली तेलंगणातील 'वनक्रांती'!

तेलंगणा सरकारच्या महिलांना वन विभाग आणि वन-क्षेत्रात अधिकारी पदावर नेमण्याच्या भूमिकेला आज परिणामकारक फळे आलेली दिसतात. याचा मुख्य परिणाम म्हणजे, तेलंगणामधील महिला वन अधिकारी आज अत्यंत मर्यादित संसाधने व साधनसामग्रीसह वन-क्षेत्राशी संबंधित व अत्यंत जिव्हाळ्याच्या अशा वन-अतिक्रमण, अवैध कब्जा, वनसंपत्तीतील महत्त्वाच्या अशा लाकडाची तस्करी, अवैध वाळू व्यवसाय, वाहतूक व वनसंवर्धनाच्या जोडीलाच वन-संरक्षण व वन्यजीवांच्या मानवीय वस्तीतील होणाऱ्या उपद्रवावर नियंत्रण ठेवण्याचे काम प्रकर्षाने करीत आहेत. मुख्य म्हणजे, हे काम या महिला परंपरागत नक्षलप्रभावित भागांमध्ये करीत असल्याने त्यांचे यश अधिक प्रकर्षाने जाणवते.

तेलंगण राज्य वन अकादमीच्या संचालिका एस. जे. आशा यांच्यानुसार, राज्यातील महिला वन कर्मचारी व अधिकाऱ्यांनी मिळविलेले यश हे त्यांचे निर्धारपूर्वक केलेले प्रयत्न आणि त्यांना देण्यात येणारे विशेष प्रशिक्षण यांचा संयुक्त सफल परिणाम म्हणावा लागेल. त्यांच्या मते, वन अकादमीतर्फे राज्यातील महिला प्रशिक्षणार्थींना वन-क्षेत्रातील अत्यंत प्रतिकूल स्थितीत राहणे, त्यादरम्यान आत्मसंरक्षणाशिवाय जंगल क्षेत्रातील रहिवाशांना संरक्षणासाठी सिद्ध करणे, सर्पदंशासारख्या वारंवार होणाऱ्या घटनांवर तातडीने उपाययोजना करणे, पोलिस खात्याशी समन्वय राखणे आदी अनेक बाबींचा समावेश असतो. विशेषतः महिला वनअधिकाऱ्यांच्या या प्रयत्न आणि पुढाकाराला वन-क्षेत्रातील वनवासी महिलांसह सर्वसाधारणपणे सर्वच नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असला, तरी त्यासाठी या महिला वन अधिकाऱ्यांना मोठ्या अग्निदिव्यातून जावे लागते, हेदेखील तेवढेच खरे. पुढील प्रमुख घटना व अनुभवातून हीच बाब सिद्ध होते.

वन अधिकारी अप्सरामुनीसा यांच्या मते, त्यांच्या कार्यक्षेत्रातील भूपतपूर परिसरात वन्यप्राण्यांची शिकार करून त्यांची तस्करी करून, त्याद्वारे पैसा मिळविण्याचे प्रकार सर्रासपणे होत असत. यामध्ये शिकारी-तस्करांनी स्थानिक ग्रामीण-वनवासींना पैशाच्या लोभातून सहभागी करून घेतले होते. त्यांनी स्थानिक वनवासींना विश्वासात घेतले. त्यांना वन आणि वनसंपत्तीच्या संरक्षणासाठी वन-वनवासींच्या जोडीलाच वन्यजीवांचे महत्त्व समजून सांगितले. या प्रकरणी तस्कर-मंडळी वनवासींच्या भोळेभाबडेपणाचा फायदा घेऊन अल्प रक्कम देऊन सर्वांचेच शोषण कसे करतात, ते नीट समजावून सांगितले. ही मात्रा लागू पडली व भूपतपूर वन-क्षेत्र परिसरातील अवैध शिकारी व तस्करीला कायमचा आळा बसला. एवढेच नव्हे, तर अप्सरामुनीसा व त्यांच्या सहकारी वनकर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांच्या परिणामी वेगवेगळ्या ठिकाणी पकडून जप्त केलेल्या लाकूड व तत्सम वनसंपत्तीच्या सरकारी लिलावातून शासकीय तिजोरीत सुमारे ४.५ कोटी राशींची भर पडली. तेलंगणा शासनाच्या वनसेवा विभागात महिलांची संख्या लक्षणीय स्वरूपात आहे. वनसंरक्षण विभागाच्या संदर्भातच सांगायचे म्हणजे, या विभागातील कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्या व टक्केवारीच्या तुलनेत महिलांची संख्या ४३ टक्के आहे. त्यातही प्रत्यक्ष वन-क्षेत्रात आघाडीवर व जोखीम-जबाबदारीसह काम करणाऱ्यांची संख्या ३१ टक्के आहे. वन-क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण आणि टक्केवारी यांचे विविध संदर्भात सकारात्मक परिणाम पण दिसू लागले आहेत. तेलंगणाच्या सर्वाधिक वन व हरित क्षेत्रफळासाठी प्रसिद्ध असणाऱ्या मुलुगू या जिल्ह्यात सुमारे ६८ टक्के जमीन ही वन-क्षेत्र वा हरितपट्टा या क्षेत्रामध्ये मोडते. महिला वन अधिकारी व कर्मचारी यांचे प्रयत्न सक्रिय सहभागाद्वारे गेल्यावर्षी अतिवृष्टी व नैसर्गिक प्रकोपामुळे मोठे नुकसान झालेल्या ३०२ हेक्टर परिसरातील वन आणि वनसंपत्तीचे विक्रमी वेळात पुनर्रोपण करण्याचा प्रयोग नुकताच यशस्वी करण्यात आला. वन-क्षेत्र व वन विभागात अकल्पित व अकस्मातपणे मोठी आपत्ती निर्माण होते व गरजेनुरूप त्यावर तोडगा काढावा लागतो. मोठी जोखीम घेऊन जीवाची बाजी लावावी लागते. यामध्ये आपत्कालीन तातडीच्या उपायांपासून सार्वत्रिक संतुलन साधणे, पुढाकार घेऊन परिस्थिती हाताळणे व त्यावर तोडगा काढणे इथपासून प्रसंगी शारीरिक सिद्धतेसह केलेली कारवाई व त्याच्याच जोडीला वेळेत व आवश्यक अशी प्रशासनिक-वैधानिक वा न्यायालयीन कारवाई करावी लागते. ही सारी आवश्यक कौशल्ये तेलंगणामधील महिला वनअधिकाऱ्यांनी पुरेशा व पुरतेपणी आत्मसात केली आहेत, हे विशेष.

राज्यस्तरावरील पृष्ठभूमी नमूद करताना, तेलंगणा राज्याचे वन विभागप्रमुख एस. चंद्रप्पागिरी नमूद करतात की, राज्यात वनसंरक्षण व वन्य व्यवस्थापन हे क्षेत्र परंपरागतरीत्या पुरुषप्रधान व पुरुषांच्याच प्रभावळीतील होते. मात्र, गेल्या दशकात राज्य सरकारने नियोजनपूर्वक पद्धतीने या क्षेत्रात महिलांचा केवळ विचारच केला असे नव्हे, तर त्यांचा प्राधान्याने विचार केला. या संदर्भात विशेष धोरण अंगीकारण्याचा पुढाकार तेलंगणानेच घेतला. परिणामी, वन विभागात महिला कर्मचारी-अधिकाऱ्यांची नेमणूक वाढत्या प्रमाणात होऊ लागली. त्या अग्रक्रमाने व प्रसंगी आव्हानपर कामे यशस्वीपणे करू लागल्याचे आश्वासक चित्र निर्माण झाले, हे विशेष. या महिला वनअधिकाऱ्यांना मोठ्या जोखमीची कामे नेहमीच करावी लागतात. या संदर्भातील वनअधिकारी एम. रेणुका यांच्या अनुभवानुसार वन-क्षेत्रात अवैध तस्करीतून अवैध वनकटाई-तस्करी यांसारख्या अनधिकृत कृत्यांवर नेहमीच कारवाई करावी लागते व त्यासाठी त्यांना प्रसंगी सशस्त्र व शारीरिक विरोधाची पण तयारी करावी लागते. पसरा वन-क्षेत्राच्या अधिकारी माधवी जे. एस. यांच्यानुसार त्यांच्या वन-क्षेत्रात सुमारे २० हजार हेक्टर्सचे घनदाट जंगल असून, त्यांचा लाकडासह विविध उत्पादनांच्या तस्करीचा मुकाबला सर्वशक्तीसह व नेहमीच करावा लागतो. या पृष्ठभूमीवर तेलंगणाचे मुख्य संरक्षक एस. चंद्रप्पागिरी नमूद करतात की, राज्यात शासकीय विभागांतर्गत महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेच्या संदर्भात महिलांनी आघाडी घेतली असून, ही बाब त्यांच्यासह राज्याच्या एकूणच प्रशासन व प्रशासकच नव्हे, तर महिलांसह जनसामान्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वेध

**नितीन शिरसाट**

# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प जलसंजीवनी

भारतासारख्या कृषिप्रधान देशात अन्नधान्याची उत्पादकता सिंचन सुविधेवर अवलंबून आहे. तसेच महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या अग्रेसर राज्य असून अस्तित्वातील व नव्याने प्रस्तावित उद्योगासाठी पाण्याची मागणीही मोठ्या प्रमाणात आहे. महाराष्ट्रात दरवर्षी लाखो लिटर पाणी वाहून समुद्रात जाते तर दुष्काळामुळे मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र होरपळून निघतो. पाणीटंचाईमुळे कृषी उत्पादनावर वाईट परिणाम होत असतो. नागरी क्षेत्रांमध्ये पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवतो. पाण्याच्या अल्प पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना व शेतीला मोठ्या प्रमाणावर संकटांचा सामना करावा लागतो. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी नदीजोड प्रकल्प एक महत्त्वपूर्ण उपाय आहे. या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे पाणीटंचाई असलेल्या भागांमध्ये पाणीपुरवठा सुधारणे, त्याद्वारे एक नदी दुसऱ्या नदीला जोडली जाऊन पाण्याचे वितरण अधिक सुलभ होईल. प्रकल्पाच्या माध्यमातून विविध भागांमध्ये सिंचनाची व्यवस्था सुधारणे, विशेषतः जिथे पाण्याची कमतरता आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक पाणी मिळेल आणि शेती व्यवसायाला अधिक चालना मिळेल. नदीजोड प्रकल्पामुळे जलसंचय करण्याची क्षमता वाढवता येईल, ज्यामुळे पाऊस कमी पडला तरी पाणी उपलब्ध राहील. हे कृषी उत्पादनावर सकारात्मक प्रभाव पाडू शकते. दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे पर्जन्याचे प्रमाण विषम स्वरूपाचे झाले असून, काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. हे चित्र बदलण्यासाठी नदीजोड प्रकल्प महत्त्वाचा आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार, तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने या नदीजोड प्रकल्पाला गती देण्यासाठी, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी जलसंजीवनी ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा प्रकल्पासाठी ९४ हजार ९६८ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील शेतकऱ्यांची शेती सिंचनाखाली येणार आहे. राज्य सरकारने या नदीजोड प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात केलेल्या आर्थिक तरतुदीचे स्वागत केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे. भारत सरकारच्या जलसंधारण नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालय यांच्या राष्ट्रीय जलविकास अभिकरणाला जलसंपदा विभागाने वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला हिरवी झेंडी दिली. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालयाकडून आवश्यक त्या परवानगी देत सर्वेक्षण करण्यात आले आहे. जवळपास ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टरवर हा भव्य नदी जोड प्रकल्प उभारण्यात येणार आहे. देशातील जवळपास १४६ जलाशये ही महत्त्वाची आहेत. देशातील शेतकऱ्यांना पाणीटंचाईच्या समस्येपासून दूर ठेवायचे असल्यास नदीजोड योजना अमलात आणण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने देशात नदीजोड प्रकल्प सर्वेक्षण सुरू आहे. यामध्ये राज्यातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होणार असून हा प्रकल्प शेतकऱ्यांना नवसंजीवनी देणारा ठरणार आहे. विदर्भाला सुजलाम सुफलाम करणाऱ्या वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला केंद्र सरकारने मान्यता प्रदान केली असून या प्रकल्पाचे सर्वेक्षणाचे काम झाले आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे बहुतांश भाग पाण्याखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे नद्यांना येणाऱ्या पुरांच्या पाण्याचे नियोजन होऊन त्याचा फायदा शेतकरी, उद्योगधंद्याला होणार आहे. केंद्र सरकारने या नदीजोड प्रकल्पाला मान्यता दिली आहे. ६० टक्के निधी केंद्र सरकारचा, तर ४० टक्के निधी हा राज्य सरकारचा राहणार आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला मंत्रिमंडळाने अंर्थसकल्पात मान्यता दिली आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या वाट्याला तब्बल १४० दलघमी म्हणजेच पाच टीएमसी पाणी येणार आहे. या पाण्यातून नळगंगा धरण भरून घेण्यासोबतच खामगाव तालुक्यातील कोलोरी व सेलोडी येथे प्रकल्प उभारून नदीजोड प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. प्रकल्पाचा गेल्या ४० वर्षांचा अभ्यास केल्यानंतर प्रकल्पाची जवळपास ३७.५८ दलघमी पाण्याची तूट निघत असल्याचे स्पष्ट झाले होते. परिणामी गोदावरी, प्राणहिता आणि वैनगंगा नदी परिसरातील अतिरिक्त ९६ टीएमसी पाण्याचे नियोजन करून ते नळगंगा प्रकल्पात आणण्याचे नियोजन झाले. १९८० च्या राज्यातील अवर्षणप्रवण तालुक्यांच्या यादीत मोताळा तालुक्याचा समावेश आहे. सिंचनाचा टक्का वाढण्यास मदत होणार आहे. वैनगंगा-नळगंगा प्रकल्प जलतज्ज्ञांनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून पत्रकार परिषदेच्या माध्यमातून नदीजोड प्रकल्पाच्या समस्या दूर करून प्रकल्प मंजुरीसाठी प्रयत्न केले आहेत. या निर्णयामुळे विदर्भातील अनेक जिल्ह्यांतील सिंचन क्षमतेमध्ये वाढ होऊन लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ होऊन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

९८८१७१७८२८

## आपलं गावच गड्या बरं...

आपला भारत देश हा विविधतेने आणि समृद्धीने नटलेला असा संपन्न देश आहे. सर्व जाती-धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने कितीतरी वर्षांपासून सोबत राहत आलेली आहेत. आजही जगामध्ये भारताकडे एका आदर्शव्रत नजरेने पाहिले जाते. भारताला या स्थितीपर्यंत आणण्यासाठी आपल्या महापुरुषांनी मोठा त्याग केला आणि त्याचे फलित म्हणून आज भारत हा जगामध्ये आपल्या विविधतेमुळे ओळखला जातो. अशा या आदर्श भारताचा कणा हा आजही गावांमध्येच आहे. समृद्धीच्या वाटा गावातूनच वाहतात. समाधान म्हणजे काय असते हे जर शोधायचे असेल तर गावाकडेच जावे लागते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी गावाकडे चला असा मूलमंत्र दिला होता. जगाने कोरोनासारखी महामारी अनुभवली. संपूर्ण जग बंद पडलेले असताना, नोकरदार वर्गाला शहराने तर दूर लोटले; मात्र गावांनीच त्यांना आपल्या जवळ केले. आज जगामध्ये आखाती देश युद्धाच्या सावटाखाली आहेत. त्याचा परिणाम इतर देशावर होत असून मोठ्या प्रमाणात इंधन तुटवडा जाणवत आहे. काही दिवसापूर्वी डिझेल आणि पेट्रोलचा भारता जवळचा साठा संपला अशी अफवा पसरली आणि एकच खळबळ देशामध्ये उडाली. मात्र सरकारने या स्थितीला योग्यरीत्या हाताळणी आणि परिस्थिती आटोक्यात आणली.

पेट्रोल डिझेल नंतर आता एलपीजी घरगुती गॅसचा तुटवडा देशात मोठ्या प्रमाणात पडल्याची स्थिती आहे. एलपीजी मिळविण्यासाठी ग्राहकांच्या प्रचंड रांगा एजन्सी पुढे लागत आहेत. यामुळे अवैध साठवणूक करून त्याची जादा दराने विक्री करणाऱ्यांचे चांगभले होत आहे. अनेक ठिकाणी तर खेड्याप्रमाणे चुली व शेगड्या अडगळीत पडलेल्या ठिकाणाहून बाहेर आलेल्या आहेत. आणि त्यांनी गॅसची जागा घेतली. पुन्हा एकदा कोविडप्रमाणे आपले गावच बरे होते इकडे असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आलेली आहे. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शेवटी गावाकडेच सर्व समस्यांची उपाय आहे हे पुन्हा एकदा दिसून आले.

**मोहन कळमकर**/उमरखेड/७३८५८६१४४६

## वाचक पत्रे

### सर्व विषयांना स्पर्श करावा

पुण्यातील महिला शिक्षण, उद्योग आणि सामाजिक कार्यात आघाडीवर आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेणारे विशेष सदर असावे. महिला सुरक्षेचे प्रश्न, आरोग्य आणि कायदेशीर हक्क यावर मार्गदर्शनपर लेख प्रसिद्ध करावेत. सकारात्मक उदाहरणे समाजात आत्मविश्वास निर्माण करतात.

**प्रीती सोमण**/पुणे

••••

### गुढीपाडवाः विजयाचा सण

हिंदू पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला 'गुढीपाडवा' साजरा केला जातो. हा दिवस केवळ नवीन वर्षाची सुरुवात नसून, तो निसर्गातील बदल आणि ऐतिहासिक विजयाचे प्रतीक मानला जातो. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे या दिवशी कोणत्याही नवीन कार्याची सुरुवात करणे अत्यंत शुभ मानले जाते. गुढीपाडव्याशी अनेक पौराणिक कथा जोडल्या गेल्या आहेत.१४ वर्षांचा वनवास संपवून आणि रावणाचा वध करून प्रभू श्रीराम जेव्हा अयोध्येत परतले, तेव्हा प्रजेने आनंदोत्सवाचे प्रतीक म्हणून 'गुढ्या' उभारल्या होत्या. याच दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली; याला ब्रह्मध्वज असेही म्हणतात. गुढीपाडव्याच्या दिवशी घराची स्वच्छता करून दारासमोर रांगोळी काढली जाते. या सणाचे मुख्य आकर्षण 'गुढी'. एका उंच काठीला (बांबूच्या) रेशमी वस्त्र, कडुलिंबाची डहाळी, गाठी (साखरेची माळ) आणि फुलांचा हार बांधला जातो. त्यावर तांब्याचा किंवा चांदीचा गडवा (कलश) उपडा ठेवून ती गुढी घराच्या दारात किंवा खिडकीत उंच ठिकाणी उभारली जाते. या दिवशी सकाळी कडुलिंबाची पाने, जिरे, हिंग आणि गूळ यांचे मिश्रण प्रसाद म्हणून खाल्ला जाते. हे आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी असून रोगप्रतिकारक शक्ती वाढविते.

**वर्षा आवदे**/नागपूर

### हुरडा पार्टीचा तरुणाईला विसर

पूर्वीच्या काळी ग्रामीण भागात शेतात होणारी हुरडा पार्टी आता क्वचितच कुठेतरी एखाद्या ठिकाणी होत आहे. शहरी भागात याला व्यावसायिक रूप आले आहे. शेतांत हरभरा जोमदार आला की हुरडा पार्टी सुरू व्हायची. छानशी शेकोटी करून त्यात हरभरे भाजून खाणे म्हणजेच हुरडा पार्टी. ही हुरडा पार्टी अनेकांना आपापसातले मतभेद विसरायला लावते व दोन घटका माणसांमध्ये रमवायला राजी करते. मात्र आता काळ बदलला आहे. काळ बदलला तसे हुरडा पार्टीचे स्वरूप बदलले. हुरडा पार्टीचे अप्रूप जुन्याजाणत्या पिढीपासून आताच्या तरुणांसहित सर्वांनाच वाटते. महागड्या हॉटेल्समध्ये हुरडा पार्टी रंगू लागली आहे. पैसे खर्च करूनही शेतात होणाऱ्या हुरडा पार्टीची जी मजा असते ती येथे मिळत नाही. कालाय तस्मै नमः या उक्तीप्रमाणे ग्रामीण ढंगाची हुरडा पार्टी आता शहरी झाल्याने ग्रामीण भागातील वृद्ध आता या हुरडा पार्टीच्या आठवणीने खंतावत आहे.

**जयदीप सुधीर हिरवे**/९०९६२७६४८३

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मार्च-**
आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्ध आणि त्याचे देशांमध्ये होणारे परिणाम यापार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात संताप व्यक्त करत वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे मारून निषेध नोंदवताना पोलिस आणि कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली. यावेळी सरकारविरोधी घोषणा देत विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. सरकारच्या काही निर्णयांमुळे सामान्य नागरिकांवर अन्याय होत असून त्या विरोधात हे आंदोलन करण्यात आले आहे.

सरकारने तात्काळ याकडे लक्ष देऊन संबंधित प्रश्न सोडवावेत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निमर्ाण झाले होते. या आंदोलनात पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी होते.



## श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळा शुक्रवारी

**सोलापूर :** उद्धव नगर भाग-दोन परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षी २० मार्च रोजी श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळ्याचे आयोजन प्रभाकर वाघमारे व महानंदा वाघमारे यांनी केले आहे. या कार्यक्रम सोहळ्यात सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत श्रीस्वामीच्या मूर्ती व पादुका अभिषेक,९ ते १२ वाजेपर्यंत हालचिंचोली व दिंडूर भजनी मंडळ यांचे कीर्तन, भारूड कार्यक्रम १२ ते १२.३० पर्यंत स्वामींची महाआरती सोहळा व १ ते ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाचे नियोजन श्रीशैल कोरे, सुमित डिगे, नामदेव कोरे, तुकाराम कोरे, वैष्णवी वाघमारे, मिनाक्षी कोरे, पूजा डिगे यांनी केले.

## नावात बदल

माझे मुलीचे जन्म दाखल्यावर नाव **तबस्सुम फहीम अहमद शेख** असे आहे. तरी माझे पुर्ण नाव **तबस्सुम परवीन फहीम अहमद शेख** असे आहे. सदर दोन्ही नावाची एकच व्यक्ती आहे.

## Classifieds

### विकणे आहे

**चौपाड दर्शन हाईट्स येथील बिल्डींग नं. 2, RCC, I.R.K. सर्व सोईनेयुक्त 1 फ्लोर विकणे आहे. 9960383792**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः ता. बार्शी पैकी मौजे उंडेगांव येथील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे उंडेगांव येथील शेतजमीन ग.नं.१७० पैकी पुर्वदक्षिण कोपऱ्यातील १ हे.४० आर आकार रु. २.०१ पैसे या जमिनीपैकी पश्चिमेकडील ० हे.६० आर आकार ०.८६ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - सदर गटापैकी चंद्रकांत बसवंत यांची जमीन, दक्षिणेस- शिवरस्ता, पश्चिमेस - ग.नं. १७० पैकी शशिकांत कुलकर्णी यांची जमीन, उत्तरेस - ग.नं.१७० पैकी शामल सलगर यांची जमीन अशा वर्णनाची जमिन आतील तदंगभूत वस्तुसह.

सदर मिळकत ही कुमार महादेव शेरखाने, रा. राळेरास, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे मालकी कब्जेवहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नमूद अशी मिळकत असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेसाठी विक्रीस काढून ती आमचे खरेदीदार अशिलास कायम खुष खरेदी देणेचे ठरवले व उभयतांनी सदर मिळकतीची बाजारभावाने किंमत ठरवून व ती मान्य केली व सदर व्यवहाराचा भाग म्हणून आमचे अशिलाकडून इसाराची रक्कम स्विकारलेली आहे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालकानी आमचे अशिलास दिलेला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, याउपरही वर नमूद मिळकत संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, टाच, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, बँक लोन वा तत्सम स्वरुपाचे कोणतेही हस्तांतर वा कर्जबोजाचे हक्क वा वहिवाटीचे हक्क अगर तत्सम कोणत्याही स्वरुपाचे हक्क अधिकार असतील तर संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ०८ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत आली नाही तर सदर मिळकत ही खरेदी योग्य आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. १६/०३/२०२६

सही/-
**ॲड. श्री. रोहीत राजेंद्र घोडके**
बी.एससी., एल.एल.बी
नगरपंचायतजवळ, वैराग, ता. बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)
मो.नं. ९८८१८४१५९५

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः ता. बार्शी पैकी मौजे उंडेगांव येथील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे उंडेगांव येथील शेतजमीन ग.नं. १७० पैकी पुर्वदक्षिण कोपऱ्यातील १ हे.४० आर आकार रु.२.०१ पैसे या जमिनीपैकी पुर्वेकडील बाजुची ० हे.८० आर आकार १.१५ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - भागवत सलगर यांची जमीन, दक्षिणेस - शिवरस्ता, पश्चिमेस - ग.नं. १७० पैकी कुमार शेरखाने यांना खरेदी दिलेली जमीन, उत्तरेस - ग.नं.१७ पैकी योगेश ताटे यांची जमीन अशा वर्णनाची जमिन आतील तदंगभूत वस्तुसह.

सदर मिळकत ही चंद्रकांत बाबा बसवंत रा. घारी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे मालकी कब्जेवहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नमूद अशी मिळकत असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेसाठी विक्रीस काढून ती आमचे खरेदीदार अशिलास कायम खुषखरेदी देणेचे ठरवले व उभयतांनी सदर मिळकतीची बाजारभावाने किंमत ठरवून व ती मान्य केली व सदर व्यवहाराचा भाग म्हणून आमचे अशिलाकडून इसाराची रक्कम स्विकारलेली आहे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालकानी आमचे अशिलास दिलेला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, याउपरही वर नमूद मिळकत संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, टाच, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, बैंक लोन वा तत्सम स्वरुपाचे कोणतेही हस्तांतर वा कर्जबोजाचे हक्क वा वहिवाटीचे हक्क अगर तत्सम कोणत्याही स्वरुपाचे हक्क अधिकार असतील तर संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ०८ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत आली नाही तर सदर मिळकत ही खरेदी योग्य आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहू कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. १६/०३/२०२६

सही/-
**ॲड. श्री. रोहीत राजेंद्र घोडके**
बी.एससी., एल.एल.बी
नगरपंचायतजवळ, वैराग, ता. बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)
मो.नं. ९८८१८४१५९५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी येथील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी येथील जमीन ग.नं. २५४ क्षेत्र हे. ०२-०० आर + पो.ख ०० हे. ०८ असे एकूण ०२ हे ०८ आर, अशी जमीन आमचे अशिल भगवान गोरख बसाटे रा. नागोबाचीवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे व त्यांचे पूर्वजांचे कब्जेवहिवाटीची सुमारे ७० ते ८० वर्षापूर्वीपासून आहे. सदरील मिळकतीचे ७/१२ सदरी शरद रंगनाथ पवार, वगैरे रा. बार्शी यांचे नावे वारसाने ७/१२ सदरी पोकळ स्वरुपात आहे. सदरील जमीनीबाबत आमचे अशिल भगवान गोरख बसाटे यांनी बार्शी येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. ४६/२०२६ चा दावा दाखल केला असून त्याचे कामकाज चालू आहे.

सदरील जमीनीबाबत अग्रहक्काने आमचे अशिल मालक झालेले आहेत. सध्या शरद रंगनाथ पवार व त्यांचे नातेवाईक मिळून ७/१२ सदरी त्यांची नावे असलेचा गैरफायदा घेऊन सदरील मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसा त्यांना विक्री करण्याचा अधिकार नाही. सदरील मिळकतीबाबत दिवाणी वाद चालू आहे.

सबब शरद रंगनाथ पवार, वगैरे रा. बार्शी यांनी सदरील मिळकत विक्रीस काढलेस त्याचेबरोबर कोणीही गहाण, दान, लिज, हस्तांतरण, बोजा अशा स्वरूपाचा कुठलाही दस्त करू नये. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली. ता. १६/०३/२०२६

सही/-
**ॲड. एस. एस. ठोंबरे,**
बी.कॉम. (ऑनर्स), एल.एल.बी.
सुयश निवास, फुले प्लॉट, बार्शी
मो.नं. ९३७११६२४२५
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## प्रबोधन विचार मंचतर्फे खा. डॉ. ज्योती वाघमारे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**
राज्यसभा खासदारपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांचा प्रबोधन विचार मंच व सम्राट मित्र परिवार यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रबोधन विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष विश्वास गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मित्र परिवार उपस्थित होता.

## ६० लाख घेऊन ये म्हणून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि.१६ मार्च-**
लग्नात सामान दिले नाही, मानपान केला नाही, सोने दिले नाही असे म्हणून दि. १ मे २०२२ ते ३० डिसेंबर २०२५ रोजी नागेश पती, विमल सासू, किसन सासरे रा. योगायोग नगर, शेळगी, सोलापूर यांनी मिळून कीर्तीकी नागेश पंतगे वय ३३, रा. १३७ इंदिरा नगर, सोलापूर हिचा छळ केला. तसेच तुझी पगार दे, किरकोळ कारणावरून घालून पाडून बोलून अपमानित करून तुझी लायकी नसताना तुला या घरात सून म्हणून आणले आहे. बिअर शॉपी टाकण्यासाठी माहेरून ६० लाख रुपये घेऊनये म्हणून हाताने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. शारीरिक, मानसिक त्रास दिला, असे फिर्यादीत नमूद आहे.

## अडीच वर्षाच्या मुलाला दुचाकीची धडक

**सोलापूर, दि.१६ मार्च-**
मुलगा नंदन वय अडीच वर्षे हा घरासमोर खेळत असताना दि. १२ मार्च रोजी पुरुषोत्तम मधुकर मादास रा. ३७ नवनाथ नगर, सोलापूर त्याला दुचाकी क्रमांक एम एच १३ सी झेड ७५६४ च्या अज्ञात महिला चालकाने ताब्यातील वाहन हयगायीने चालवून, मुलगा नंदन याला धडक देऊन उजव्या पायाच्या मांडीचे हाड फ्रॅक्चर करून त्यास गंभीर दुखापत केली. याबाबत अज्ञात चालकाविरोधात एम आयडीसी पोलीस ठाण्यात दि. १५ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास कांबळे करत आहेत.

## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

**९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर**

**नमुना झेड**
**नियम १०७ पोटनियम (११) (ड-१) पहा**

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्याअर्थी खाली सही करणार विशेष वसुली अधिकारी, लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सोलापूर ९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर यांनी सदर पतसंस्थेच्या खालील दर्शविलेल्या थकबाकीदार कर्जदार व त्यांचे जामीनदार यांचेविरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत संस्थेने प्राप्त केलेल्या वसुली दाखल्यास अनुसरून कलम १५६ व नियम १०७ मधील तरतुदीस अनुसरून थकबीदार कर्जदारांना प्रथम मागणी नोटीस देऊन त्यांचाकडील थकवाकीची रक्कम भरण्याबाबत कळविलेले होते परंतु थकबाकीदार कर्जदारांने रक्कम भरण्यास कसूर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या उपरी ऋणकोने त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला या नोटीसीव्दारे त्यांच्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेतल्याबाबत कळविण्यात येत आहे. तसेच सर्व नागरिकांना देखील सूचित करण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या थकबाकीदार, कर्जदार यांच्या मालमत्तेवर ताबा नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) नुसार विशेष वसुली व विकी अधिकारी यांनी घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे. सदर ताबा घेतलेल्या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार केल्यास लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या , सोलापुर या संस्थेच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज याला संबंधितांना अधीन रहावे लागेल.

**स्थावर मिळकतीचे वर्णन.**

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन | क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी. | जप्ती आदेश दिनांक | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिवाजी ईरप्पा सुतार | बामणी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील मालमत्ता क्रमांक ३०७ घर नं. ३९० | ६५० चौ.मी. त्यातील ६२५ चौ.फूट बांधकामाच्या इमारतीसह | १९/०५/२०२५ | ३०/१२/२०२५ |
| २ | शिवाजी ईरप्पा सुतार | बामणी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील गट नं. ११९/१ | ०.१६ आर | १९/०५/२०२५ | ३०/१२/२०२५ |

(सदरची ताबा नोटीस आज दिनांक १६/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने देण्यात आली आहे.)

**स्थळ : सांगोला**
**दि. १७/०३/२०२६**

शिक्का

सही/-
**श्री. संतोष कोंडीबा काळे**
**विशेष वसुती व विक्री अधिकारी**
**लोकंमगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्व्यये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसितील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

**ताबा सूचना**
**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१**
**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) प्रतिक महेंद्र वाकोडे<br>२) सहकर्जदार : केतन महेंद्र वाकोडे<br>दोघे रा. फ्लॅट नं. ७०२, ऋषी अव्हेन्यू, एकता नगर, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००६<br>३) महेंद्र मारुती वाकोडे<br>रा. फ्लॅट नं. ७०२, ऋषी अव्हेन्यू, एकता नगर, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००६<br>४) गणेश अशोक भट<br>रा. फ्लॅट नं. १०१, ऋषी अव्हेन्यू, एकता नगर, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००६ |
| | कर्ज खाते क्र. | ००३००३२१५००००००९ |
| | थकीत कर्ज रक्कम दि. ३१/०७/२०२५ अखेर | एकूण रक्कम रुपये १६,६०,८४७/- (रु. सोळा लाख साठ हजार आठशे सत्तेचाळीस) अधिक दि. ०१/०८/२०२५ पासून १२% प्रमाणे होणारे व्याज+दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | ०१/०८/२०२५ |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १६/०३/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यु पाच्छा पेठ येथील म्युन्सिपल मिळकत नं. ७२९२, यांसी सि. स. नं. १०३८७, टि.पी. नं. १ फा. प्लॉट नं. ३३/१/अ/२ याचे एकूण क्षेत्र ६१२.०२ चौ.मी. या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ऋषी अव्हेन्यू या अपार्टमेंट मधील सातव्या मजल्यावरील फ्लॅट नं. ७०२ याचे क्षेत्र ५९.६९ चौ. मी. असून या मिळकतीचे चतुःसिमा असे :- पूर्वेस-ओपन स्पेस, पश्चिमेस- स्टेअरकेस, उत्तरेस- फ्लॅट नं. ७०१, दक्षिणेस - ओपन स्पेस |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पुवग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंवा विक्रीच्या मार्गान, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : १६/०३/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

सील

सही/-
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

## The Pandharpur Marchant Co-Op.Bank Ltd.,

Laxmi Path, Pandharpur. Dist. Solapur Phone No. 02186-223106/227682

### Form Z Notice (Possession Notice)

This is notify the Public that according to dundersigned Recovery Officer Shri. S.M. Hiremath (Name of the applicant) under Maharashtra Co-Op.Society Act 1961 and as per given below mentioned dates recovery amount was demanded by issuing "Demand Notice' to the diffolters and symbolic possession notice Act 107 (11-D-1)

| Sr. No. | Name of Diffolters | Demand Notice Date | Appendix Notice Date | Property possession | Hyp. Amount | Property attached given below No. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Onkar Tradelines Prop. Pramod Vishvnath Gurav** At. Post. Near S.T. Stand, Pandharpur Road, Kurdawadi, Tal. Madha, Dist. Solapur. | 06/11/2025 | 18/11/2025 | 12/03/2026 | 2,74,523/- | **Gaon - Kurdawadi, Tal. Madha, Dist. Solapur. Gat.No.255/2 Area-0.0092 R. Pramod yancha Hissa** East - Road West - Gat No. 255/2 Paiki Area Sanjay Dikole. South - G.No.255/2 Paiki Area Baburav Dikole North - Rajabhav Dikole |
| 2 | **Sarthak Jewilers Prop. Balasaheb Jaganath Vedpathak** At.Post. 616/1, Somwar Peth, Tembhurni, Tal. Madha, Dist. Solapur. | 19/01/2026 | 16/02/2026 | 12/03/2026 | 4,84,137/- | **Gaon - Tembhurni, Tal. Madha, Dist. Solapur. C.S.No. 1372 Area -180.50 Sqm. Paiki 15.89 Sqm. Balasaheb yancha Hissa** East - Road West - C.S.No. 1372 Vishnu Bhosale South- C.S.No. 1372 Paiki Baban Khatake North - Motilal R Lakole |

**Place : Pandharpur**
**Date : 16/03/2026**

Seal

**Signature/-**
**Shri. S.M. Hiremath**
**Recover Officer**
**The Pandharpur Merchants Co-Op. Bank Ltd., Pandharpur.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
✻ उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) खालील सूचनेसह कलम १५४ अन्वये निदेश.
✻ एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे विनियम ६.३ तक्ता '६जी' खालील 'टिप (V)' मधील प्रस्तावित फेरबदलाबाबत

## महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई : ४०० ०२१.**
**दिनांकः १० ऑक्टोबर, २०२५**

### सूचना

**क्र. टिपीबी-४३२५/१५५२/प्र.क्र.११२/२०२५/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख ''उक्त नियमावली'' असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/ वियो. व प्रायो. कलम ३७ (१कक) (ग) व कलम २०(४)/नवि-१३. दि. ०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त नियमावली दि. ०३/१२/२०२० पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीचे प्रकरण-६ मध्ये अनुज्ञेय हस्तांतरणीय विकास हक्क (टोडीआर) लोडिंगसह एकूण परवानगीयोग्य चटईक्षेत्र निर्देशांकासंबंधी तरतुदी समाविष्ट आहेतः आणि ज्याअर्थी, विनियम ६.३ मधील तक्ता ६-जी खालील टीप (V) मधील तरतुदीनुसार, स्तंभ क्रमांक ५ किंवा ८ मध्ये नमूद केलेल्या टीडीआरच्या किमान ३०% आणि कमाल ५०% टीडीआर हा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत उत्पन्न झालेला टिडीआर (स्लम टिडीआर), शहरी नुतणीकरण योजनेतील टिडीआर/ विनियम १४.८.८(iv)(C) (i) अंतर्गत URP अधिसूचित क्षेत्रातून उत्पन्न झालेल्या टीडीआर / सुविधा बांधकामाच्या बदल्यातोल टीडीआरमधून (URT निर्मितीपर्यंत) वापरला जाईल. जर असा टीडीआर उपलब्ध नसेल तर इतर टीडीआर वापरता येईल, अशी तरतूद आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त तरतूद'' असा करण्यात आलेला आहे):

आणि ज्याअर्थी, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडील दि. २३/०१/२०२५ रोजीचे पत्र शासन नगर विकास विभागास प्राप्त झाले असून, सदर पत्रात असे नमूद आहे की, विनियम ६.३ मधील टीप (V) ची तरतूद URT च्या वापरासाठी प्राधान्य देते. सदर तरतुदीमुळे स्लम टिडीआर/कन्स्ट्रक्शन टिडीआरचो बाजारातील मागणी कमी होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे विकासक यांचा झोपडपट्टो पुर्विकास योजना / कन्स्ट्रक्शन टिडीआर मधून सुविधांचे बांधकाम करणेकरिता कल कमी होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. तरी झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन व त्यातुन निर्माण होणारा स्लम टिडीआर याकरिता, तसेच Construction Amenity TDR च्या मोबदल्यात सुविधांचे विकसनासाठी विकासक यांचा प्रतिसाद कायम राहणेच्या दृष्टीने विनियम ६.३ तक्ता ६-जी खालील टोप (V) मधील ''till generation of URT" हो नोंद वगळणेबाबत शासन स्तरावर विचार व्हावा, स्लम टिडीआर /कन्स्ट्रक्शन टिडीआर व युआरटी टिडीआर यांना समकक्ष केल्यास कन्स्ट्रक्शन टिडीआरचे माध्यमातून सुविधा विकसीत करणेकरिता विकासक यांचा प्रतिसाद कायम राहोल व आर्थिक बोजा न येता नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होईल, असे उक्त प्राधिकरणाचे पत्रात नमूद केले आहे:

आणि ज्याअर्थी उक्त नमूद विनंती व वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त नियमावलीचे विनियम ६.३ मधील तक्ता ६-जी खालील टीप (V) मध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार फेरबदल करणे सार्वजनिक हिताचे दृष्टीने आवश्यक आहे, असे शासन नगर विकास विभागाचे मत झाले आहे. (यापुढे याचा उल्लेख प्रस्तावित फेरबदल असा करणेत आलेला आहे):

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तीचा वापर करुन, प्रस्तावित फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. प्रस्तावित फेरबदलावरील कोणत्याही सूचना/ हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत. संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना / हरकतीवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे ''अधिकारी'' म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त अधिकारी'' असा करण्यात येत आहे) असे शासनाचे मत झाले आहे:

सदरची सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती / छत्रपती संभाजीनगर विभाग.
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका, (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण,
८. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
१०. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४(१) अन्वये निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासन मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल लगोलग अंमलात येईल.

सदरची सूचना व परिशिष्ट शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

शिक्का

सही/-
**(अमर पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**विमाका/पुणे/जाहि./३६३/२०२५-२६**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### ऑर्लिन्स मास्टर्समध्ये आयुष, तन्वीकडून आशा

**ऑर्लिन्स (फ्रान्स) :** वरिष्ठ बॅडमिंटनपटू एच.एस. प्रणॉयने खांद्याच्या दुखापतीमुळे माघार घेतल्यानंतर मंगळवारपासून येथे सुरू होणाऱ्या २५०,००० डॉलर्सच्या ऑर्लिन्स मास्टर्स सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या युवा खेळाडू आयुष शेट्टी आणि तन्वी शर्मा यांच्याकडून विजेतेपद मिळविण्याची आशा आहे. पहिल्याच फेरीत चीन तैपेईच्या अव्वल मानांकित खेळाडू चोऊ टिएन चेन याचा सामना करणे अपेक्षित असलेल्या प्रणॉयला, गत आठवड्यात बासेल येथे झालेल्या स्विस ओपन स्पर्धेदरम्यान खांद्यात वेदना जाणवू लागल्यामुळे स्पर्धेतून माघार घेणे भाग पडले. स्विस ओपनसाठी प्रवास केल्यानंतर माझ्या खांद्यात वेदना सुरू झाल्या. त्यामुळे मी स्पर्धेतून माघार घेऊन मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला, असे प्रणॉयने सांगितले. मी लवकरच पूर्णपणे तंदुरुस्त होईन अशी आशा त्याने व्यक्त केली. चीनमधील निंगबो येथे ७ ते १२ एप्रिल दरम्यान होणाऱ्या आशियाई बॅडमिंटन स्पर्धेद्वारे पुन्हा कोर्टवर उतरण्याचे त्याचे ध्येय आहे.

### गुडाकेश मोती लखनौ संघात सहभागी होण्याची शक्यता



**लखनौ :** वेस्ट इंडीजचा डावखुरा फिरकी गोलंदाज गुडाकेश मोती इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) हंगामापूर्वी लखनौ सुपर जायण्ट्स (एलएसजी) संघाकडे वळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मध्य-पूर्वेतील संकटामुळे मायदेशी परतण्यास विलंब झाल्याने आलेल्या थकव्याचे कारण देत गुडाकेशने अलीकडेच पीएसएल मधून माघार घेतली. २० विश्वचषकातून बाहेर पडल्यानंतर वेस्ट इंडीजचे खेळाडू भारतातच जवळपास दोन आठवडे अडकून पडले होते. मोतीने माघार घेतल्यामुळे पीएसएलच्या कलंदर्स संघाने त्वरित हालचाल करत, त्याच्या जागी बदली खेळाडू म्हणून दुनिथ वेलालगेला आपल्या संघात सामील करून घेतले. आता २९ वर्षीय गुडाकेश एलएसजी संघात सहभागी होणार असल्याची किंवा त्या संघाच्या चाचण्यांना उपस्थित राहणार असल्याची विश्वसनीय वृत्ते समोर आली आहेत. एलएसजी कडून अद्याप यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली तरी, समाजमाध्यमावर गुडाकेशचे नाव लखनौ संघाशी जोडणाऱ्या चर्चांना उधाण आले आहे. लखनौ संघात दुखापतग्रस्त वानिंदू हसरंगाच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी संघ व्यवस्थापन पर्यायांचा शोध घेत असल्याचे मानले जात आहे. २०२६ च्या लिलावात गुडाकेश मोतीला कोणत्याही संघाने विकत घेतले नव्हते.

### कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा सायप्रसमध्येच कायम

**सायप्रस :** संघर्षग्रस्त आखाती प्रदेशापासून फारसे दूर नसलेल्या सायप्रसमध्ये या महिन्यात प्रतिष्ठेची कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्याबाबत काही चिंता व्यक्त केल्या जात आहेत. मात्र, फिड या बुद्धिबळाची जागतिक नियामक संस्थने स्पर्धेचे ठिकाण बदलण्याची शक्यता फेटाळून लावली आहे. सध्या तिथे युद्धासारखी परिस्थितीही नाही, असे फिडेचे मुख्य कार्यकारी अधिकारी () एमिल सुतोव्स्की यांनी चेसबेसला सांगितले. असा बदल करण्याइतपत 'किंचितही धोकादायक' परिस्थिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. सध्या भारताचा डी. गुकेश (पुरुष) आणि चीनची जू वेनजुन (महिला) यांच्याकडे असलेल्या जागतिक विजेतेपदाच्या मुकुटांसाठीचे आव्हानवीर निश्चित करणारी ही कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा २८ मार्च रोजी सुरू होणार आहे. सुरक्षा चिंतेमुळे भारताची कोनेरू हम्पी या स्पर्धेतून माघार घेण्याचा विचार करत असल्याचे वृत्त आहे.

### मुंबई इंडियन्सचा आयपीएलसाठी सराव सुरू

**मुंबई :** पाच वेळा विजेते ठरलेल्या मुंबई इंडियन्स संघाने सोमवारी इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी हंगामासाठी सरावाला सुरुवात केली. हा हंगाम २८ मार्च रोजी सुरू होणार आहे. शार्दुल ठाकूर, मयंक मार्कंडे, अल्लाह गझनफर, नमन धीर, राजा अंगद बावा, रॉबिन मिन्झ, रघु शर्मा, मयंक रावत, दानिश मालेवार, मोहम्मद इझहार आणि अश्विनी कुमार हे खेळाडूंचा पहिला गट होता. हा गट सरावासाठी शिबिरात दाखल झाला. संघातील उर्वरित खेळाडूंमध्ये रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि कर्णधार हार्दिक पांड्या यांसारख्या दिग्गजांचा समावेश आहे, ते आगामी काही दिवसांत शिबिरात सहभागी होण्याची अपेक्षा आहे. स्पर्धेपूर्वी सरावाची तीव्रता व तयारीचा वेग वाढत असताना हे खेळाडू संघात दाखल होतील. हंगामापूर्व सरावाच्या पहिल्या दिवसात नेहमीच काहीतरी विशेष असते. खेळाडू शिबिरात दाखल होताना पाहणे, वाढणारा उत्साह आणि जोरदार सुरुवात करण्याचे उद्दिष्ट हे सर्व अनुभवता येते. आमच्या संघात असे खेळाडू आहेत ज्यांना या फ्रॅन्चायझीची इत्थंभूत माहिती आहे, त्याच वेळी काही गुणवान चेहरेही संघात दाखल होत आहेत, असे मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने यांनी सांगितले.

# कसोटी खेळण्याची इच्छा, पण टी-२० मध्ये माझा 'हातखंड'

## कर्णधार सूर्यकुमार यादवचे प्रतिपादन



**♦ नवी दिल्ली, १६ मार्च**

मला कसोटी क्रिकेट खेळण्याची तीव्र इच्छा आहे, एकदिवसीय क्रिकेट मात्र आपल्या स्वभावाला साजेसे नाही असे मला वाटते. परंतु, शेवटी टी-२० क्रिकेट हेच माझे मुख्य बलस्थान आहे, कारण त्यात माझा आता 'हातखंड' आहे, असे टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला.

पॉडकास्टवर तासभर चाललेल्या मुलाखतीदरम्यान सूर्यकुमार पूर्णपणे निवांत व प्रसन्न दिसत होता. भारताला विश्वचषकात प्रचंड यश मिळवून दिल्यानंतर तो स्पष्टपणे आनंदाच्या शिखरावर होता; याच वेळी त्याने फारसे कसोटी क्रिकेट खेळायला न मिळाल्याबद्दलची आपली खंतही मनमोकळेपणाने व्यक्त केली. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक कसोटी सामना खेळला होता. 'केवळ एकच डाव!' असे म्हणत त्याने हसत हसत सांगितले.

तुमच्या नशिबात जे लिहिलेले असते, तेच तुम्हाला मिळते. मी माझ्या कारकिर्दीची सुरुवात लाल चेंडूच्या क्रिकेटनेच केली होती. मी १०-१२ वर्षे रणजी करंडक स्पर्धा खेळलो आहे. मी मुंबईमध्ये असताना लाल चेंडूने खूप क्रिकेट खेळलो, जर तुम्ही मुंबईत लहानाचे मोठे झाला असाल, तर तुमची सुरुवात लाल चेंडूनेच होते, असे तो म्हणाला.

पण हळूहळू, जेव्हा आम्ही पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटला सुरुवात केली, तेव्हा माझा कल थोडा त्या दिशेने झुकला व त्यानंतर मी या टी-२० प्रकाराकडे वळलो. वन-डे क्रिकेटमध्येही चांगली कामगिरी करण्यासाठी मी खूप प्रयत्न केले, पण यात मला म्हणावे तसे यश मिळाले नाही, असे त्याने सांगितले.

टी-२० मध्ये ज्या प्रकारे माझी कामगिरी होत होती, ते पाहता मला त्यात पूर्ण प्रभुत्व मिळाले आहे असे म्हणता येईल, असे तो म्हणाला.

जर मला संधी मिळाली, तर कसोटी क्रिकेट खेळायला नक्कीच आवडेल. तसेही मी २०१०-११ पासून २०२० पर्यंत लाल चेंडूचे क्रिकेट खेळलो आहे. मला कसोटी क्रिकेट मनापासून आवडते. पण हो, साहजिकच, जर संधी मिळाली, तर कसोटी क्रिकेट खेळायला कोणाला आवडणार नाही? असेही तो म्हणाला.

तरीही, वयाच्या ३५ व्या वर्षी सूर्यकुमारला कसोटी संघात स्थान मिळणे जवळजवळ अशक्यच आहे. कसोटी क्रिकेटमधील त्याचा एकमेव अनुभव २०२३ मध्ये नागपूर येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धचा होता, जिथे त्याने एका डावात ८ धावा केल्या होत्या. त्याच वर्षी तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय विश्वचषक अंतिम सामन्यातही खेळला होता व त्याने २८ चेंडूंत १८ धावा केल्या होत्या. भारताने तो अंतिम सामना गमावला आणि त्यानंतर सूर्यकुमारने या प्रकारात (फॉर्मेटमध्ये) पुन्हा कधीच खेळ केला नाही. ◂(वृत्तसंस्था)

# १९ वर्षांखालील विश्वचषक अंतिम सामन्यातील खेळी खास होती : सूर्यवंशी

**♦ जयपूर, १६ मार्च**

१९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात इंग्लंडविरुद्ध केलेली शतकी खेळी ही माझ्या कारकिर्दीतील सर्वात 'खास' खेळींपैकी एक होती, असे भारताचा किशोरवयीन क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी सोमवारी म्हणाला.

भारताला विश्वचषकाचे विजेतेपद मिळवून देण्यात सूर्यवंशीच्या अविस्मरणीय खेळीने निर्णायक भूमिका बजावली होती. सूर्यवंशीने अवघ्या ८० चेंडूंमध्ये १७५ धावांची धडाकेबाज खेळी करत भारताला १९ वर्षांखालील विश्वचषकाचे विक्रमी सहावे विजेतेपद मिळवून दिले. आपल्या आक्रमक आणि जोरदार फटकेबाजीमुळे या १४ वर्षीय खेळाडूने प्रसारमाध्यमांचे लक्ष मोठ्या प्रमाणावर वेधून घेतले आहे.

माझी वैयक्तिकरीत्या सर्वात आवडती खेळी म्हणजे हरारे येथे झालेल्या १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील खेळी आहे.. मला या विश्वचषकात खेळण्याची केवळ एकच संधी मिळाली. अंतिम सामन्यात शतक झळकावणे हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण होता. मी संघासाठी जे योगदान दिले, ते खरोखरच विशेष होते, असे तो म्हणाला.

राजस्थान रॉयल्स संघाची नवीन जर्सी प्रदर्शित करण्याच्या व आगामी हंगामासाठी लक्ष्मी सिमेंटला संघाचे मुख्य प्रायोजक म्हणून घोषित करण्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने तो पत्रकारांशी बोलत होता.

मी केवळ आपल्या प्रक्रियेवर व विजयावर लक्ष केंद्रित करण्याचे ध्येय उराशी ठेवले आहे. इतर गोष्टींचा विचार करत नाहीये, असे सूर्यवंशी म्हणाला.

तुम्ही चांगली कामगिरी केली, तर तुमचे कौतुक होणे किंवा तुमच्याकडे लक्ष वेचले जाणे स्वाभाविक असते, परंतु मी त्या प्रसिद्धीवर किंवा लक्ष वेधून घेण्यावर लक्ष केंद्रित करत नाहीये, असेही तो म्हणाला. या कार्यक्रमाला रवींद्र जडेजाव यश राज पुंजा यांचीही उपस्थिती होती. रवींद्र जडेजा १७ वर्षांनंतर पुन्हा एकदा राजस्थान रॉयल्स संघात परतला आहे. ◂(वृत्तसंस्था)



# एम.चिन्नास्वामी स्टेडियमवर आयपीएल सामने खेळविण्यासाठी कर्नाटक सरकारची मंजुरी

**बंगळुरू, १६ मार्च**

कर्नाटक सरकारने सोमवारी कर्नाटक राज्य क्रिकेट संघटना व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला एम.चिन्नास्वामी स्टेडियमवर २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीगचे (आयपीएल) सामने आयोजित करण्यासाठी औपचारिक मंजुरी दिली. आरसीबी संघाच्या पहिल्या विजेतेपदानंतर झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेमुळे निर्माण झालेली महिन्याभराची अनिश्चितता यामुळे संपुष्टात आली आहे. जगातील सर्वात मोठ्या टी२० लीगची १९ वी आवृत्ती २८ मार्च रोजी सुरू होत आहे. वेळापत्रकानुसार, या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादशी लढणार आहे.

कर्नाटकचे गृहमंत्री परमेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर ही औपचारिक मंजुरी देण्यात आली. या बैठकीला राज्य सरकारने स्थापन केलेली तज्ज्ञ समिती, तसेच स्पर्धा व्यवस्थापन संस्था (इव्हेंट मॅनेजमेंट फर्म) यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान तज्ज्ञ समितीने आपला अहवाल सादर केला. या अहवालात एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर करण्यात आलेली तयारी आणि सुरक्षा-नियमांचे पालन करण्यासाठी उचललेली पावले यांची सविस्तर माहिती देण्यात आली होती, असे आयपीएलचे अधिकृत प्रवक्ते विनय मृत्युंजय यांनी सांगितले.

तज्ज्ञ समितीच्या शिफारशींवर आधारित आणि स्टेडियमवरील व्यवस्थांची सविस्तर पाहणी केल्यानंतर, माननीय गृहमंत्र्यांनी बंगळुरू येथील प्रतिष्ठित एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर आगामी सामने आयोजित करण्यास औपचारिक मंजुरी दिली आहे.

# एफआयएच हॉकी नेशन्स चषकांत भारतीय महिला हॉकी संघ सहभागी होणार

## ऑकलंडमध्ये १५ जूनपासून

**♦ लॉझान (स्वित्झर्लंड), १६ मार्च**

भारतीय महिला हॉकी संघ आगामी १५ ते २१ जून या कालावधीत न्यूझीलंडमधील ऑकलंड येथे होणाऱ्या एफआयएच हॉकी नेशन्स चषक स्पर्धेत सहभागी होणार आहे.

हॉकी प्रो लीगमध्ये सहभागी नसलेल्या, परंतु जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या संघांना उच्च-स्तरीय स्पर्धेची संधी देण्यासाठी व विजेत्या संघाला पुढील हंगामात प्रो-लीगमध्ये बढती मिळवण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी, हॉकी नेशन्स चषकाची सुरुवात २०२१ मध्ये करण्यात आली होती.

नऊ संघांच्या गुणतालिकेत तळाच्या स्थानी राहिल्यामुळे, भारतीय महिला हॉकी संघाला २०२४-२५ च्या प्रो-लीग स्पर्धेतून रेलिगेट (खालच्या गटात ढकलले) करण्यात आले होते.




या स्पर्धेत भारताशिवाय यजमान न्यूझीलंड, अमेरिका, जपान, कोरिया, चिली, स्कॉटलंड आणि फ्रान्स हे संघ सहभागी होतील. यापैकी स्कॉटलंड आणि फ्रान्स या संघांना हॉकी नेशन्स चषक२ द्वारे या स्पर्धेत बढती मिळाली आहे.

पुरुषांची स्पर्धा केपटाऊन येथे आयोजित केली जाईल. यामध्ये दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, फ्रान्स, कोरिया, जपान, वेल्स आणि मलेशिया या संघांचा समावेश असेल; तसेच हॉकी नेशन्स चषक २ द्वारे बढती मिळालेला स्कॉटलंड आणि हॉकी प्रो-लीगच्या २०२४-२५ हंगामातून रेलिगेट झालेला आयर्लण्ड हे संघही यात सहभागी होतील.

**हॉकी पुरुष नेशन्स चषक ११ जूनपासून**

हॉकी पुरुष नेशन्स चषकाची २०२५-२६ आवृत्ती ११ ते २० जून या कालावधीत पार पडेल. या स्पर्धेच्या माध्यमातून हे सामने पुन्हा एकदा दक्षिण आफ्रिकेत परततील. यापूर्वी २०२२ मध्ये पॉचेफस्ट्रूम येथे झालेल्या पुरुष स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीचे यजमानपदही दक्षिण आफ्रिकेनेच भूषवले होते. ◂(वृत्तसंस्था)




# सोलापूरच्या ११ स्केटिंगपटूंना महाराष्ट्र गौरव सन्मान पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

पुण्याच्या आनंदी फाउंडेशनच्या वतीने येथील ११ स्केटिंगपटूना महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथे पं. जवाहरलाल नेहरू सभागृहात झालेल्या कार्यक्रमात या खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावार उत्तम कामगिरी केल्यामुळे त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, मेडल असे पुरस्काराचे स्वरूप होते. सर्व खेळाडु विनर्स फाउंडेशन स्केटिंग क्लवचे असून त्याना सम्यक मोहोळकर, सागर राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.

**सन्मानित स्केटिंगपटू :** लास्या नरेंद्र शेरला, त्रुपिता संतोष माळवदकर, शर्विल संतोष माळवदकर, सक्षम अनिल हुच्चे, स्वानंदि स्वामिनाथ काळे, स्वराली स्वामिनाथ काळे, विनायक सुनिल हुच्चे, निशा खंडू सरवदे, मोहमदसाद अझरोदीन शेख, आरोहि राहूल गाडे, सोहम राहूल गाडे.

# महापौर चषक क्रीडा स्पर्धा सुरू करा

## नगरसेवक ज्ञानेश्वर म्यॅकल यांची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च -**

२७ एप्रिल ते १ मे दरम्यान होणारी अखिल भारतीय स्तरावरील मानाची महापौर चषक क्रीडा स्पर्धा खंडीत झाली आहे. ती स्पर्धा यंदापासून सुरू करावी, अशी मागणी नगरसेवक ज्ञानेश्वर म्यॅकल यांनी महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडे केली आहे.

त्यांनी याचे निवेदन महपौर कोंडयाल यांना दिले असून त्यांनी आपल्या निवेदनात असे नमूद केले आहे की, या स्पर्धेसाठी महानगरपालिका बजेटमध्ये तरतूद करावी. विविध खेळांची मैदान, इनडोअर मैदान दुरुस्त आणि स्वच्छता करून खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यासाठी रक्कम तरतूद करणे. तसेच सार्वजनिक उद्यानमध्ये वॉकिंग ट्रॅक करणे, योगासाठी मैदान करून देणे आणि लहान मुलांसाठी खेळाचे साहित्य आणि ओपन जिम करून देण्यासाठी रक्कम तरतूद करावी.



# सोलापूरचा पंचाक्षरी लोणार उत्कृष्ट प्रगतिकारक बॉडी बिल्डर

## यूनस शेख ७० किलो गटात पाचवा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

पुणे महापौर राज्य शरीरसौष्ठव स्पर्धेत ७५ किलो गटातील विजेतेपद प्राप्त करत येथील इलिजियम् जिमच्या पंचाक्षरी लोणारने अंतिम फेरीत अटीतटीच्या लढतीत पंचाक्षरीने प्रगतिकारक खेळाडूंचा मान प्राप्त केला. तसेच युनूस शेख याने ७० किलो गटात पाचवा क्रमांक प्राप्त केला. पुण्याच्या प्रथम नागरिक मंजुषाताई नागपुरे यांनी याचे उद्घाटन केले. नगरसेविका धनश्रीताई कोल्हे यांच्या हस्ते लोणारला ट्रॉफी, रोख रक्कम देण्यात आली. या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याचे सरचिटणीस विशाल गायकवाड, संजय हिरेमठ यांची परीक्षक म्हणून निवड झाली होती.

त्यांचे सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनचे अध्यक्ष संतोष पवार यांनी यांनी अभिनंदन केले.



# सिद्धेश्वर वूमेन्स पॉलिटेक्निकची राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेत तीन पदके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

पुणे येथील सणस क्रीडांगणावर झालेल्या महिला गटाच्या IEDSSA राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेत श्री सिद्धेश्वर वूमेन्स पॉलिटेक्निकच्या विद्यार्थिनींनी तीन पदकांची कमाई केली. २०० मीटर धावणेमध्ये प्रथम, १०० मीटर धावणेमध्ये द्वितीय तर चार बाय १०० मीटर रिलेमध्ये द्वितीय स्थान संपादिले. यात श्रेया चव्हाण, वैष्णवी भानुमते, तेजश्री वसेकर, प्रियांका कांबळे व सरस्वती चिकने यांचा समावेश होता. या विद्यार्थिनींना क्रीडा विभाग प्रमुख प्रा. स्वयंप्रकाश व्यास, प्रा. शितल सावळगी, प्रा. संग्राम माने, प्रा. रविकिरण पतंगे, प्रा. वैदेही देशपांडे व ऐश्वर्या व्हनमाने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष धर्मराज काडादी, प्राचार्य गजानन धरणे, गव्हर्निंग बॉडीचे सदस्य आर. एस. पाटील, सी. बी. नाडगौडा, मल्लिनाथ मसरे व काशिनाथ ढोले यांनी अभिनंदन केले.

# हेमंत वाघमारे, अंकित गर्ग व श्रद्धा गुंटूक प्रथम

## तुळजाई रोटरी रन स्पर्धेत कामगिरी : साईश्वर गुंटूक, सुमीत जावीर द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

रोटरी क्लब तुळजापूरतर्फे आयोजित तुळजाई रोटरी रन स्पर्धेत येथील हेमंत वाघमारे, अंकित गर्ग व श्रद्धा गुंटुक यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

ही स्पर्धा तुळजापूर येथील सैनिक स्कूलमध्ये पार पडली पुरुष गटात ५ किलोमीटरमध्ये साईश्वर केशव गुंटूकने द्वितीय व महिला गटात श्रद्धा गुटुंकने प्रथम क्रमांक पटकाविला.

तसेच अल्ट्रा रनरमध्ये अंकित गर्ग याने ५ कि.मी.मध्ये प्रथम क्रमांक तर सुमित जावीर याने १० कि.मी. मध्ये द्वितीय क्रमांक पटकविला. तसेच येथील पोलीस रनर हेमंत वाघमारे याने ५ कि.मी.मध्ये त्यांच्या वयोगटात प्रथम तर सोलापूर आझादी रनचे आयोजक चंद्रकांत गायकवाड यांनी त्यांच्या वैयक्तिक वयोगटात द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच अल्ट्रा रनर, फिटनेस ट्रेनर आतिश शहा यांनीही सहभाग नोंदविला आहे.




सर्व विजेत्यांचे मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत दोन हजार स्पर्धक सहभाग नोंदवले होते. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष तसेच नगरसेवक आनंद जगताप, चिन्मय मगर, उद्योजक व इतर काही मान्यवर उपस्थित होते.

साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह तसेच स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण कोळी यांचे मार्गदर्शन लाभले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# ‘मसाप’च्या अध्यक्षपदी योगेश सोमण; दशकभराने सत्तापालट

## प्रमुख कार्यवाहपदी स्वाती महाळंक तर कोषाध्यक्षपदी प्रदीप निफाडकर

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १६ मार्च-**

आद्य साहित्य संस्था असा लौकिक असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीमध्ये दशकभराने सत्तापालट झाला आहे. पुण्यात होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजन सुरू असतानाच विद्यमान कार्यकारिणीचा समावेश असलेल्या परिवर्तन उत्कर्ष आघाडीला पराभवाचा धक्का बसला आहे. अध्यक्षपदी योगेश सोमण, प्रमुख कार्यवाहपदी स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्षपदी प्रदीप निफाडकर या तीन प्रमुख पदाधिकाऱ्यांसह स्थानिक कार्यवाहपदाच्या सातपैकी चार जागांवर साहित्य संवर्धन आघाडीचे उमेदवार विजयी झाले आहेत.

साहित्य संस्थांची आद्य संस्था असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अटीतटीच्या निवडणुकीत संस्थेच्या अध्यक्षपदी साहित्य संवर्धन आघाडीचे उमेदवार लेखक-नाटककार योगेश सोमण, प्रमुख कार्यवाहपदी पत्रकार स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्षपदी ग़ज़लकार प्रदीप निफाडकर यांनी रविवारी विजय मिळवला. या निवडणुकीत परिषदेचे कार्याध्यक्ष आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार आणि कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांचा पराभव झाला. सोमण हे आता साहित्य महामंडळाचेही अध्यक्ष असतील. त्याचबरोबरीने महाळंक आणि निफाडकर हेदेखील साहित्य महामंडळाचे पदाधिकारी असतील. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप) पंचवार्षिक निवडणुकीचा निकाल मतमोजणी संपल्यानंतर रविवारी रात्री उशिरा जाहीर झाला. निवडणुकीत उत्कर्ष परिवर्तन आणि साहित्य संवर्धन या दोन आघाड्यांमध्ये चुरस होती. स्थानिक कार्यवाह या सात पदांच्या निवडणुकीत सुनील महाजन, सुनेत्रा मंकणी, प्रसाद मिरासदार, डॉ. नितीन संगमनेरकर (साहित्य संवर्धन) तसेच अंजली कुलकर्णी, माधव राजगुरू आणि डॉ. आशुतोष जावडेकर (परिवर्तन उत्कर्ष) यांचा विजय झाला. निवडणूक मंडळाचे अध्यक्ष ड. प्रताप परदेशी यांच्यासह संजीव खडके आणि गिरीश केमकर यांनी रात्री उशिरा निकाल जाहीर केला.महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यक्षेत्र असलेल्या पुण्यासह अकरा जिल्ह्यांतील १६ हजार ६०७ आजीव सभासद या निवडणुकीचे मतदार होते. त्यापैकी १० हजार ९०० सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणीत परिवर्तन उत्कर्ष आणि साहित्य संवर्धन या दोन गटांमध्ये अखेरपर्यंत चुरस पाहायला मिळाली. करोनाचे निमित्त पुढे करून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी २०२१ मध्ये झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडणुकीला सामोरे जाण्याऐवजी पाच वर्षांसाठी मुदतवाढ घेतली. यापूर्वी साहित्य परिषदेची निवडणूक २०१६ मध्ये झाली होती. मुदतवाढीमुळे विद्यमान कार्यकारिणीकडे दहा वर्षे परिषदेच्या कारभाराची सूत्रे होती.

### मतमोजणीसाठी पहिल्यांदाच पोलीस बंदोबस्त

मतमोजणीसाठी सकाळपासूनच पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यात विश्रामबाग पोलीस ठाण्याचे तीन पोलीस आणि चार होमगार्ड यांचा समावेश होता. प्रत्येक फेरीदरम्यान कुणाला किती मते पडली हे शेवटच्या क्षणापर्यंत गुलदस्त्यात ठेवण्यात आले होते. सुरुवातीला पुणे जिल्हा आणि शहर प्रतिनिधी पदासाठीची मतमोजणी घेण्यात आली. मतमोजणीला विलंब लागला. सुरुवातीपासून साहित्य संवर्धन आघडीचे वर्चस्व मतमोजणीत दिसून आले. शेवटच्या काही फेऱ्यांत मताधिक्य कमी झाल्याने उमेदवारांची धडधड वाढली. पण, त्याचा निकालावर परिणाम पडला नाही.

### महाराष्ट्र साहित्य परिषद

एकूण मतदान - १०,९०१
वैध मतदान - १०,७१३
अवैध मतदान - १८८

**अध्यक्ष**
विजयी - योगेश सोमण ५,३६५
पराभूत - मिलिंद जोशी ५,३२०

**प्रमुख कार्यवाह**
विजयी - स्वाती महाळंक ५,४१४
पराभूत - सुनीताराजे पवार ५,२८५

**कोषाध्यक्ष**
विजयी - प्रदीप निफाडकर ५,५३६
पराभूत - विनोद कुलकर्णी ५,१८६

### हा विजय सगळ्यांचा

जवळपास दहा वर्षांनंतर साहित्य संवर्धन आघाडी ही समविचारी साहित्यप्रेमी आणि वाचकांच्या आघाडीला महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये अभूतपूर्व यश मिळाले आहे. आमच्यासाठी काम करणारे हजारो ज्ञात-अज्ञात हात आणि ज्यांना खऱ्या अर्थाने परिवर्तन हवे होते त्यांनी ते घडवून आणले आहे. हा विजय त्या सगळ्यांचा आहे. त्या सर्वांना मी हा विजय समर्पित करतो.
**- योगेश सोमण, अध्यक्ष, मराठी साहित्य परिषद.**





## महत्वाचे...

### सोलापूर विद्यापीठात बुधवारी सेट/नेट परीक्षा कार्यशाळा

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विशेष कक्ष विभागाच्या वतीने पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या तसेच सेट/नेट परीक्षेला बसण्याची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी सेट/नेट परीक्षा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन बुधवार, दि. १८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या सभागृहात केले आहे. इच्छुक उमेदवारांसाठी ही कार्यशाळा विनामूल्य ठेवण्यात आली आहे. या कार्यशाळेत सेट/नेट परीक्षेच्या पेपर क्रमांक १ संदर्भात सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेत माजी प्राचार्य व प्रशिक्षण तज्ज्ञ प्रा. डॉ. हनुमंत जगताप, डॉ. शशिकांत शिंदे, अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सोलापूर तसेच डॉ. कृष्णा पाटील, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. सदरील कार्यशाळेत एकूण तीन सत्र होणार असून सकाळी साडेअकरा ते पाचपर्यंत कार्यशाळा चालणार आहे. या कार्यशाळेत सेट/नेट परीक्षेची तयारी कशी करावी, पेपर क्र. १ मधील विविध घटक, अभ्यासाचे योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन तसेच प्रश्नपत्रिकेचे स्वरूप याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विशेष कक्ष विभागाचे उपकुलसचिव डॉ. यू. व्ही. मेटकरी यांनी केले आहे.

### मोडनिंब येथील उमा विद्यालयात आज माजी विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

**मोडनिंब, दि. १६ मार्च-**

मोडनिंब (ता.माढा) येथील श्रीमंत सौ. उमाबाईसाहेब पटवर्धन स्मारक संस्था, समस्त मोडनिंब व पंचक्रोशीतील ग्रामस्थ यांच्या वतीने आज मंगळवार (दि. १७) रोजी सकाळी ९ वाजता आज उमा संकुलात माजी विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. एमपीएससी मार्फत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाल्याबद्दल पूनम किसन सुर्वे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत व सेवेतून निवृत्त झालेल्या, उमा संकुलातील माजी विद्यार्थ्यांचाही यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.



### हिरजच्या छ. शिवाजी पतसंस्थेची गरुड भरारी; शहरात स्वमालकीच्या वास्तूमध्ये शाखेचा शुभारंभ

**सोलापूर, दि.१६ मार्च -**

हिरज या.उत्तर सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्थेने गरुड भरारी घेत सोलापूर शहरात स्वमालकीची जागा खरेदी केली आहे. या जागेत नूतन शाखेचे उद्घाटन सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी श्री. गायकवाड यांनी संस्थेच्या सोलापूर शाखचा कारभार स्वमालकिच्या वास्तु मध्ये होत असल्याबद्दल आंनद व्यक्त केला तसेच संस्थेच्या प्रगतीचे आणि संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. सदर कार्यक्रमास सहाय्यक निबंधक आबासाहेब गावडे, उत्तर सोलापूरचे सहाय्यक निबंधक दत्तात्रय भवर, पतसंस्थेचे चेअरमन विष्णु नागटिळक,व्हा. चेअमन दत्तात्रय निकम, संचालक विष्णु वाघमारे, हरिदास चोपडे, सचिव पोपट गावडे उपस्थित होते.




### शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये पालक मेळावा

**सांगोला, दि.१६ मार्च-**

सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजचा पालक मेळावा संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड व उपाध्यक्ष महादेव गायकवाड, सचिव अंकुश गायकवाड उपस्थित होते. प्रारंभी पालक प्रतिनिधी विश्वनाथ भोसले यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख यांनी विद्यार्थ्यांसाठी राबविलेले विविध उपक्रम, सराव परीक्षा, रात्र अभ्यासिका, दत्तक पालक योजनेचे कार्य याविषयी माहिती देऊन महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या हिवाळी परीक्षा २०२५ च्या निकालाचे वाचन केले. याप्रसंगी पालक प्रतिनिधी विश्वनाथ भोसले, उमेश देशमुखे यांनी मनोगतात विद्यार्थी या पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये शिकत असताना उत्तम संस्काराची शिदोरी, कठोर मेहनत, शिस्त, प्रयत्नवादी बनून भविष्यासाठी उत्तम नागरिक म्हणून तयार होतात असे सांगितले. बाबुराव गायकवाड यांनी पालकांनी केलेल्या सूचनांची दखल घेऊन त्या पूर्तता करण्याचे आश्वासन दिले. यावेळी उपस्थित पालकांनी पालक मेळाव्यानंतर आपल्या पाल्याच्या दत्तक-पालक शिक्षकाची भेट घेऊन त्यांची प्रगती जाणून घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संदीप बावचे यांनी केले.

### सोलापूर जिल्हा कारागृहात महिला बंदयांसाठी समुपदेशन

**सोलापूर दि. १६ मार्च-**

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे सुहास वारके यांच्या मार्गदर्शनाखाली व विशेष कारागृह महानिरीक्षक (मुख्यालय) योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनिल ढमाळ यांच्या प्रेरणेने सोलापूर जिल्हा कारागृहामध्ये महिला बंदयांच्या कलागुणांना वाव मिळावा व रिकाम्या वेळेचा सदुपयोग व्हावा, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ सोलापूर व इनरवील क्लब, सोलापूर यांच्या संयुक्त विदयमाने महिला बंदयांसाठी एक अत्याधुनिक शिलाई मशीन भेट देण्यात आली. तसेच स्त्रियांचे आजार व त्यावरील उपाय यावर स्त्रीरोग तज्ञ धनश्री केळकर यांनी समुपदेशन व मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाकरीता कारागृह अधीक्षक सुशिल कुंभार, वरिष्ठ तुरूंगाधिकारी बिरू खळवुटे, तुरूंगाधिकारी विठ्ठल शिंदे, शिक्षक अंगद गव्हाणे, सोनिया चंकेश्वरा, ज्योस्त्ना दुरुल, किर्ती गोडवलकर, संध्या इंच्या तसेच महिला बंदी उपस्थित होते.



## कुसमोड येथील जि. प. शाळांना विरबॅक ॲनिमल हेल्थ कंपनीतर्फे शंभर बॅचेस

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. १६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुसमोड, जि प शाळा लक्ष्मीनगर, लेंगरेवस्ती व पवारवस्ती-कुसमोड या चारही शाळांना विरबॅक ॲनिमल हेल्थ प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतर्फे सि एस आर फंडातून शंभर बॅचेस देण्यात आले.

कंपनीचे रिजनल मॅनेजर विजयकुमार कुंभार, जगदीश पाटील, राजु करे, संग्राम वाघ, सत्यवान जाधव यांच्या उपस्थितीत याचे वाटप करण्यात आले. सुरुवातीस मान्यवरांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच तुषार लवटे, माजी सरपंच महावीर धायगुडे, बाळकृष्ण धायगुडे, हनुमंत धायगुडे, अज्ञान धायगुडे, अर्जुन वाघ, विजय धायगुडे, औदुंबर डोंबे, शशिकांत घड्याळे, गणेश लेंगरे, तेजस पवार, विश्वास धायगुडे, सतीश व्होनमाने, अक्षय सातपुते, मेजर संजय धायगुडे, सुभाष जाधव, सुभाष लेंगरे, माऊली वाघ,बंटु कबाडे, नितीन लेंगरे, लक्ष्मीनगर शाळेचे मुख्याध्यापक सुनिल डुरे, लेंगरेवस्ती शाळेचे विजय धायगुडे, कुसमोड शाळेचे गणेश देशमुख व तांबोळी, पवारवस्ती-कुसमोड शाळेचे सचिन गाटे उपस्थित होते.

प्रास्ताविक व सुत्रसंचालन सचिन गाटे यांनी केले. महावीर धायगुडे यांनी मनोगत व्यक्त केले. विरबॅक कंपनीचे रिजनल मॅनेजर विजयकुमार कुंभार यांनी कुसमोड गावातील विद्यार्थ्यांना बॅचेस दिल्यामुळे आनंद झाला असुन भविष्यात सुद्धा आपण मदत करु, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यावेळेस डॉ. सुरेश सातपुते यांनी बॅचेस मिळवुन दिल्याबद्दल तर पत्रकार संजय पाटील यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

## विकासाचे मॉडेल बनविण्यासाठी प्रयत्न करणार

### माढा पं. स. आढावा बैठकीत सभापती देशमुख यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १६ मार्च-**

येथून पुढे माढा पंचायत समितीचा कारभार हा सर्वसामान्य सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून केला जाईल. विकासात्मक दृष्टिकोन ठेवून विविध विकास कामे तालुक्यात केली जातील.याबरोबरच भ्रष्टाचार मुक्त पंचायत समिती करून विकासाचा मॉडेल बनविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन नूतन सभापती पंडित देशमुख यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

रोजगार हमी योजनेच्या विहीरींच्या भ्रष्टाचाराबाबत आ.अभिजीत पाटील यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थीत केला होता. यामुळे पंचायत समितीचा कामाचा दर्जा,अधिका-यांच्या कामात असलेला ढीसाळपणा, बिघडलेली परिस्थीती, गमावलेली प्रतीष्ठा यावर तालुक्यात मागील चार वर्षात अनेक प्रश्न उपस्थीत झाले होते. एकंदरीत चार वर्षात खुळ्यागत झालेल्या पंचायत समितीची गमावलेली प्रतीष्ठा व वैभव पुन्हा निर्माण करण्याचे आव्हाण नूतन सभापती यांच्यापुढे असल्याची जाणीव सभापतींना चागलीच असल्याचे त्यांच्या कार्यभार स्विकारण्याच्या कामकाजावरून दिसुन आले.



माढा पंचायत समितीच्या सर्व विभाग प्रमुखांची ओळख व बैठक सभापती देशमुख यांच्यावतीने कुर्डूवाडी कार्यालयाच्या सभागृहात सोमवारी सकाळी १२ ते ३ वाजण्याच्या सुमारास घेण्यात आली. यावेळी सरपंच हनुमंत गिड्डे, गटनेते डॉ.आशिष रजपूत यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी सभापती देशमुख म्हणाले, कोणाचीही अडवणूक करू नये. पंचायत समिती परिसरातील स्वच्छतेबरोबरच गावोगावच्या स्वच्छतेवर देखील भर द्यावा. याबरोबरच तालुक्यातील रोहयोतील विहिरी यासह इतर विकास कामे, घरकुल योजना, विविध पाणीपुरवठा योजना, शिक्षण विभागातील समस्या, महिला बालकल्याण व बांधकाम विभागातील विविध कामे, आरोग्य विभागातील विविध कामे, विविध विभागातील रिक्त जागा यासह सर्व विभागाच्या कामांचा थोडक्यात आढावा त्यासंबंधी विभागप्रमुखाकडून घेण्यात आला. तब्बल ३-४ वर्षानंतर प्रथमच विभाग प्रमुखांना पहिल्यांदाच सभापतींच्या बैठकीला हजर राहवे लागले असल्याने थोडे अवघडल्यासारखे झाल्याचे दिसून आले.

या बैठकीला बीडिओ महेश सुळे, टीएमओ डॉ.सागर गायकवाड, उपअभियंता अजित पवार, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, सीडीपीओ बालाजी अल्लडवाड, उपअभियंता कमलाकार साळुंखे, कृषी अधिकारी मिरगणे, पशुधन विकास अधिकारी डॉ.विवेक शिंदे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## सराफ व्यापाऱ्याला लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मार्च-**

पंढरपूर शहरातील राराफ व्यावसायिक दिलीप कदन आपल्या घराकडे जात असताना त्यांच्या नोटारसायकलीस कारने धडक देऊन त्यांना खाली पाडले न त्यांच्या ताब्यातील बॅग घेऊन पलायन केले. या प्रकरणातील आरोपी फरार होते; मात्र पोलिसांनी तपास करुन या प्रकरणातील दोन आरोपींना अटक केली आहे. यामुळे सराफ व्यापाऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

पंढरपूर शहरातील स्टेशन रोडवर असलेल्या कदम ज्वेलर्सचे मालक दिलीप कदम हे २२ फेब्रुवारी रोजी नेहमी प्रमाणे आपले दुकान बंद करून रात्री नऊ वाजता आपल्या घराकडे दुचाकीवरून निघाले होते. तेव्हा जुना कराड नाका परिसरात त्यांच्या पाठीमागून एक कार आली. या कारने त्यांना धडक दिली. कार मधील दोघेजण बाहेर आले व त्यांनी कदम यांच्या जवळील बॅंग पळवून नेली. मात्र या बॅगमध्ये किल्ल्यां व्यतिरिक्त काहीही नव्हते. त्यामुळे कोणतेही मोठे नुकसान, झाले नाही. मात्र धडक बसल्यामुळे कदम जखमी झाले होते. त्यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

यानंतर कदम यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात दोन इसमांविरुद्ध फिर्याद दिली होती. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी या गुन्ह्यातील आरोपी जीवन उर्फ करण गोसावी (वय २२.रा. विप्रदत्त घाट, कालिकादेवी चौक) व शुमम जाचव (वय २६, रा.जगदंबा नगर, संत पेठ, पंढरपूर) या दोघांना अटक केली आहे. येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांच्या नार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन जगताप, पोलीस उपनिरीक्षक महादेव मिसाळ, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेश गोसावी, सचिन हेंबाडे, शरद कदम, गोडसे, पाटील, नवले यांनी तपास केला.

### व्यापाऱ्यांमधून समाधान

अज्ञात चोरट्यांनी व्यापाऱ्यास धडक देऊन बॅंग पळवून नेली असल्यामुळे येथील सराफ व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी पेट्रोलिंग करणे गरजेचे आहे. रेकॉंर्डव्यतरिक्त जे गुन्हेगार आहेत त्यांच्यावर करडी नजर ठेवणे देखील आवश्यक आहे. दरम्यान या प्रकरणाचा येथील पोलिसांनी तपास सुरू ठेवून या प्रकरणातील दोन जणांना अटक केली आहे. त्यामुळे सहाजिकच सराफ व्यापाऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

## पुरवठा विभागाच्या वतीने आज जागतिक ग्राहक दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या संकल्पनेनुसार जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात जागतिक ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमात विविध शासकीय यंत्रणांचे माहितीपर स्टॉल लावण्यात येणार असून नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी सोलापूर भूषविणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली आहे. पुरवठा विभागाच्या वतीने जास्तीत जास्त नागरिकांनी या स्टॉलला भेट देऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पंढरपूरच्या कॉरिडॉर प्रकल्पासाठी तीन महिन्यात भूसंपादन होणार

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

राज्य शासनाने दिलेल्या सुचनेनुसार पंढरपूर कॉरिडॉरचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मध्यंतरी निवडणुकामुळे हे काम रखडले होते. सुमारे चार हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी तीन महिन्यात अपेक्षित गती येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी आज (दि. १६) माध्यमांशी बोलताना दिली.

पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पासाठी यापूर्वीच भूसंपादन करण्यात येणार होते. मात्र निवडणुकीमुळे ही प्रक्रिया लांबणीवर पडली. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी सुमारे १८०० कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. यात तीस टक्के म्हणजे सुमारे ७०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यानंतर भुसंपादनास गती येणार आहे. पंढरपूर शहरातील पालखी स्थळांच्या विकासाकरीताही शंभर कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आहे.

या निधीतून आवश्यक सुविधा याठिकाणी उभारण्यात येत आहेत. पालखी स्थळावर वारी काळात वारकऱ्यांना याठिकाणी आवश्यक सुविधा पुरविण्याचा प्रयत्न होत आहे.



### समन्वयातूनच भूसंपादन करण्यात येणार

कॉरीडॉर प्रकल्पासाठी नागरिकांशी संवाद सुरु आहे. समन्वयातून या प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यात येत आहे. बहुतांश बाधितांची यासाठी कोणतीही अडचण नाही. राज्य शासनाकडूनही यासाठी निधीची तरतूद करण्यात येत असल्याने पुढील तीन महिन्यात या प्रकल्पासाठी भूसंपादन होण्याचा मार्ग मोकळा झाल्याचीही माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

### सात रस्त्यांच्या कामासाठी ४९३ कोटींचा निधी

पंढरपूर शहरालगतच्या सात रस्त्यांच्या बांधणीसाठी राज्य शासनाने बांधकाम विभागाकडे ४९३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे या निधीतूनही याठिकाणी कामे सुरु होणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# जिल्हा परिषदेत पार्किंगचा प्रश्न बनला गंभीर

## पदाधिकाऱ्यांच्या वाहनांसाठी जागा अपुरी | अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीनंतर वाहनसंख्या वाढणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आवारात दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी असलेली पार्किंग व्यवस्था अपुरी पडत आहे. आता पदाधिकारी निवडीनंतर वाहनसंख्या वाढणार असल्याने प्रशासनासमोर पार्किंगचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती तसेच नव्याने निवडून आलेल्या सदस्यांच्या वाहनांसाठी जागा उपलब्ध करून देणे ही मोठी कसरत ठरणार आहे.



जिल्हा परिषद परिसरात सुमारे पाचशेहून अधिक दुचाकी आणि ३० पेक्षा जास्त चारचाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था आहे. मात्र पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची वाहनेच या जागेत बसत नसल्याने अनेकदा वाहने रस्त्यावरच उभी करावी लागतात. विशेष बैठका, कार्यक्रम किंवा निवड प्रक्रियेच्या वेळी ही समस्या अधिकच तीव्र होते. १८ मार्च रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांची निवड होणार असून ६८ नव्या सदस्यांची वाहने यामध्ये वाढणार आहेत.

पालकमंत्री, आमदार आणि इतर मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याने त्यादिवशी वाहनांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. प्रत्येक सदस्यासोबत कार्यकर्तेही येत असल्याने परिस्थिती गुंतागुंतीची होऊ शकते.

सध्या पर्यायी पार्किंगची कोणतीही व्यवस्था नसल्याने निवडीच्या दिवशी अनेक वाहने रस्त्यांवरच उभी राहण्याची शक्यता आहे. यामुळे परिसरातील वाहतूक कोंडी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाला पर्यायी पार्किंगची व्यवस्था करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा लागणार आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम लवकरच पर्यायी जागेचा विचार करून निर्णय घेणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

### कायमस्वरुपी पार्किंग व्यवस्थेची गरज

जिल्हा परिषद आवारात पार्किंगची जागा अपुरी पडत असल्याने अनेक वाहनधारकांना बाहेरच वाहने लावावी लागतात. त्यामुळे पदाधिकारी निवड, सभा किंवा मोठ्या कार्यक्रमांच्या वेळी वाहतूक व्यवस्थेवर ताण येतो. भविष्यात ही समस्या टाळण्यासाठी कायमस्वरुपी पार्किंग व्यवस्था उभारण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# 'भीतीपोटी' गॅसची विनाकारण ॲडव्हान्स बुकिंग करु नका

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**



जिल्ह्यातील एचपीसीएल, बीपीसीएल, आयबीसीएल या गॅस कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी, प्रतिनिधींची बैठक घेवून गॅसची स्थिती जाणून घेतली. युध्द सुरू होण्यापूर्वी आपल्याला जितका गॅस लागत होता; तितका गॅस आपण आजही रोज पुरवठा करू शकतो. जिल्ह्यातील सर्व गॅस ग्राहकांना जवळपास दीड महिना पुरेल इतका घरगुती गॅस तर अती महत्वाच्या सेवा व्यवसायासाठी व्यावसायिक गॅस शिल्लक आहे. कमी पडेल अथवा लवकर मिळणार नाही, या भीतीपोटी शहर-जिल्ह्यातील ग्राहकांनी विनाकारण गॅस ॲडव्हान्स बुकिंग करू नये, एजन्सीसमोर गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

गेल्या १५ दिवसापासून आखाती देशात युद्ध सुरु असल्याने विविध प्रकारचे घरगुती, व्यावसायिक गॅस मिळणार नाही, असे समजून ग्राहक भावनिक होऊन ॲडव्हान्स बुकिंग विनाकारण करत आहेत. यामुळे गॅस वितरकांसमोर मोठी गर्दी करत असल्याने ग्राहकांत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. गॅससाठी विविध गॅस एजन्सीसमोर गर्दी करताना दिसत आहेत. गॅस पुरवठा विभागाच्या वतीने घरगुती वापरण्यात येणाऱ्या एलपीजी गॅस हा २५० मे टन तर अत्यावश्यक सेवेसाठी १० मे. टन साठा शिल्लक आहे, मागणीनुसार सोलापूर शहर व जिल्ह्यातील ग्राहकांच्या मागणीला प्रथम देवून गॅस देण्यात येईल. यामुळे गॅस पुढील महिन्यात मिळेल की नाही? अशी भीती ग्राहकांनी घेवू नये. सध्या दररोज २० हजार गॅस पुरवठा होत आहे. घरगुती गॅस संपल्यास २५ दिवसाला एक तर ग्रामीण भागात ४५ दिवसाला एक या प्रमाणे घरगुती गॅस मिळणार आहे. व्यावसायिकांचा गॅस पुरवठा व बिलिंग पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. यामुळे सध्या खाजगी व्यावसायिकांना गॅस मिळणार नाही. अत्यावश्यक सेवेत येणाऱ्या सर्व व्यावसायिकांना मात्र गॅस पुरवठा होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.




# बालसंस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांना लाडू वाटप

## ● हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१६ मार्च-**

येथील के.एल.इ. बालसंस्कार केंद्र अक्कलकोट शिशु व कन्नड विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील प्रसिद्ध छायाचित्रकार ज्ञानेश्वर भोसले यांच्या वतीने विद्यार्थ्यांना लाडू वाटप करण्यात आले.

सदरचे लाडू वाटप हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर भोसले, अर्जुन निकम, सागर पवार, स्वामीनाथ बाबर, किरण साठे यांच्यासह बालसंस्कार केंद्राच्या मुख्याध्यापिका अश्विनी वाले, खंडेराव व्हडले, दयानंद खिलारी, दीपाली कलबुर्गी, बसवराज माडजे, अमृता कळके, रत्नमाला स्वामी, रुपाली लोखंडे आदी उपस्थित होते.



सोलापूर : शिवसेना शिंदे गटाच्या राज्यसभेच्या नूतन खासदार डॉ.प्रा.ज्योती वाघमारे यांनी दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालयास सदिच्छा भेट दिली. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी नगरसेवक प्रियदर्शन साठे, शिवसेना जिल्हाप्रमुख अमर पाटील, सचिन चव्हाण, धनंजय मोरे, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, मुख्य वरिष्ठ उपसंपादक श्रीनिवास गाजूल, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसंपादिका आरती कुसेकर आदी.



# कृषी पर्यटन : पुन्हा होणार मायक्रोप्लॅनिंग

- उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांची माहिती
- थीम आधारित गावांनाही देणार उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात कृषी पर्यटनाला मोठी चालना मिळत असून, विशेषतः पुणे विभागात ३०० हून अधिक केंद्रांना शासकीय मान्यता मिळाली आहे. महिला उद्योजकांसाठी १५ लाखांपर्यंत विनातारण कर्ज, हुरडा पार्ट्या, चुलीवरचे जेवण आणि राहण्याची सोय अशा ग्रामीण अनुभवांद्वारे शेतकरी लाखो रुपयांचा नफा मिळवत आहेत. याच धर्तीवर सोलापूर जिल्ह्यात मागे पडलेल्या कृषी पर्यटन केंद्रांचा पुन्हा मायक्रोप्लॅनिंग करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील थीम आधारित गावांनाही उजाळा दिले जाणार आहे, असे नूतन उपजिल्हाधिकारी तथा कृषी पर्यटन समितीचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण कसेकर यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना सांगितले.



राज्यात कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनाकडून विशेष प्राधान्य दिले जात असून, पुणे विभागातील ३२३ कृषी पर्यटन केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. महिलांसाठी विशेष योजना: 'आई' योजनेअंतर्गत महिलांना कृषी पर्यटन केंद्र सुरू करण्यासाठी १५ लाखांपर्यंत विनातारण आणि बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे, तसेच ३० टक्के अनुदानही दिले जाते. पारंपरिक शेतीला जोडधंदा म्हणून 'कृषी पर्यटन केंद्र' एक उत्तम पर्याय बनला आहे, ज्यातून अनेक शेतकरी महिन्याला लाखांचे उत्पन्न मिळवत आहेत. सोलापूरसारख्या ठिकाणीही कृषी पर्यटन केंद्रे पर्यटकांना हुरडा, रानमेवा आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव देऊन आकर्षित करत आहेत. या केंद्रांमुळे स्थानिक पातळीवर कामगारांना, विशेषतः ग्रामीण तरुणांना आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत आहे.

या कृषी पर्यटनामुळे गावरान मेजवानीमध्ये चुलीवरचे जेवण आणि हुरडा पार्टीचा आनंद पर्यटक घेत आहेत. इतकेच नाहीतर ते निसर्गाच्या सानिध्यात येत असून, कुडाच्या घरात राहण्याची आणि ग्रामीण संस्कृती अनुभवण्याची त्यांना संधी चालून येते. याचबरोबर शेती उत्पादने ग्राहकांना थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करता येतात. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन शेतीला पर्यटन व्यवसायाची जोड दिल्यास आर्थिक स्थैर्य मिळू शकते. पुन्हा कृषी पर्यटनावर आम्ही फोकस करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### गट नंबर निश्चितीसाठी मोजणीपत्र



जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील भालेवाडी येथे मिल्क अँन्ड मिलेट व्हिलेज, सांगोल्यातील कोळे येथे मधाचे गाव, माळशिरस तालुक्यातील निमगाव मगर येथे बिनयार्ड रिसॉर्ट, सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन गाव, याच तालुक्यातील पिलीव हे रेशीमचे गाव, माढा तालुक्यातील लोंढेवाडी येथे सेंद्रीय गाव, करमाळा-कात्रज येथे पक्षाचे गाव, पंढरपूर-देगाव हे जलपर्यटनाचे गाव, मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द येथे रेलिंग युनिट अशा १० गावात थीम राबविण्यासाठी गट नंबर निश्चित करून मोजणी करण्यासाठी मोजणी कार्यालयाकडे मोजणीपत्र दिले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी कसेकर यांनी दिली.

१० वर्षांची प्रतीक्षा संपली

# जिल्हा परिषदेला मिळाले २० कोटींचे मुद्रांक शुल्क अनुदान

- नोंदणी व मुद्रांक विभागाकडून थकीत निधी जमा
- ग्रामपंचायतींच्या विकासकामांना मिळणार चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मार्च-**

राज्याच्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून एक टक्का मुद्रांक शुल्क अनुदानापोटी तब्बल २० कोटी ४७ लाख ७७ हजार ६३७ रुपये सोलापूर जिल्हा परिषदेच्या तिजोरीत जमा करण्यात आले आहेत. मागील दहा वर्षांपासून प्रलंबित असलेले हे अनुदान अखेर प्राप्त झाल्याने जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना मोठा दिलासा मिळाला आहे.

सन २०१५-१६ ते २०२५-२६ या दहा आर्थिक वर्षातील मुद्रांक शुल्क अनुदानापोटी जिल्हा परिषदेकडे एकूण ३७ कोटी ३० लाख २८ हजार ९३८ रुपये येणे बाकी होते. त्यापैकी सध्या २० कोटी ४७ लाख ७७ हजार ६३७ रुपये जिल्हा परिषदेला प्राप्त झाले असून १६ कोटी ८२ लाख ५१ हजार ३०१ रुपये अजूनही मिळणे बाकी आहे. मुद्रांक शुल्क विभागाकडून ९ फेब्रुवारी २०२६ रोजी १५ कोटी ३६ लाख १ हजार रुपये, तर १० मार्च २०२६ रोजी ५ कोटी ११ लाख ७६ हजार ६३७ रुपये अशी दोन टप्प्यांत ही रक्कम जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आली. प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषद पातळीवरुन पंचायत समितीमार्फत संबंधित ग्रामपंचायतींच्या खात्यावर वर्ग केला जाणार आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना विकासकामांसाठी आर्थिक बळ मिळणार आहे. विविध पायाभूत सुविधांच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे.

### सीईओंचा पाठपुरावा

मागील दहा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुद्रांक शुल्क अनुदानासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा निधी जिल्हा परिषदेला प्राप्त झाले आहे. उर्वरित अनुदान मिळवण्यासाठीही पाठपुरावा सुरु असल्याचे सांगण्यात आले.

### अनुदान तालुका पातळीवर वर्ग

मुद्रांक शुल्क विभागाकडून प्राप्त झालेल्या निधीचे तालुका व पंचायत समिती स्तरावर वर्गीकरण करण्याची प्रक्रिया जिल्हा परिषद मुख्यालयात सुरू आहे. संबंधित अधिकाऱ्यांमार्फत हिशोब करून हा निधी ग्राम पंचायतींच्या खात्यावर वर्ग केला जाणार आहे, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी सांगितले.

## थोडक्यात...



### 'होम लोन'बाबत विचारणा केली असता मारहाण

**सोलापूर, दि.१६ मार्च-**

'होम लोन'साठी लॉगिन केलेल्या केलेल्या फाईलसंदर्भात विचारणा केली असता मारहाण करण्यात आल्याची घटना चौपाड येथील मुथूट फायनान्स येथे घडली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संगप्पा धोंडप्पा वाघमारे (रा.धारसंग, ता. अक्कलकोट) यांचा भाऊ माळप्पा व नातेवाईक जगदेव बसगोडा कांबळे यांचे होम लोनसाठी लॉगिन केलेल्या फाईलसंदर्भात ब्रँच मॅनेंजर ओंकार कांबळे यांना विचारणा केली असता ओंकार कांबळे व गोविंद अंकुले यांनी शिवीगाळ, धक्काबुक्की व लोखंडी रॉडने मारहाण केली. राजदीप बनसोडे यांनीही मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद आहे.

### वृध्द दांपत्यांच्या मृत्यूबाबत अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा

**सोलापूर, दि.१६ मार्च-**

स्वागत नगर परिसरातील कृष्णा नगर येथील एका घरात महादेव मंचाळ व रंगम्मा मंचाळ या वृध्द दांपत्यांच्या मृतदेह आढळला होता. या दाम्पत्यांचा मृत्यु नेमकं कशामुळे झाला याबाबत तर्कवितर्क लढविले जात होते. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मंचाळ दांम्पत्यांच्या तोंडावर दाबल्याने गुदमरुन त्यांचा मृत्यू झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास खोमणे हे करत आहेत.

### मागील भांडणाचा राग; महिलेस केली मारहाण

**सोलापूर, दि.१६ मार्च-**

मागील भांडणाचा राग मनात धरून सुरेखा राजू काळे (रा.१७ हरळय्या नगर, कुमठा रोड, सोलापूर) ह्या महिलेस मारहाण करण्यात आली. याप्रकरणी विशाल हरळे, वैष्णवी हरळे, परमेश्वर हरळे, शिवप्पा हरळे यांच्या विरोधात विजापूरनाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मणुरे करत आहेत.



### गोवंश वाहतूक थांबवताना मारहाण; ७ जणांविरोधात गुन्हा

**सोलापूर, दि.१६ मार्च-**

गोवंश वाहतूक थांबविताना मारहाण झाल्याची घटना घडली. याप्रकरणी ७ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. जगदीश कोडम (वय २६, रा.गांधीनगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) हे फौजदार चावडी पोलीस स्टेशनसमोर थांबले असताना एम.एच.१३ सी.यु.९२१२ या क्रमांकाच्या चारचाकी वाहनातून गोवंश जातीचे जनावरांची वाहतूक केली असल्याचे दिसून आले. तेव्हा कोडम यांनी सुमित कदम, नागेश निंबाळकर या मित्रांसमवेत सदर वाहनाचा पाठलाग करुन थांबवण्याचा प्रयत्न केले असता त्यांना मारहाण करण्यात आली. याप्रकरणी अमित टोने, आप्पासा मुंगळे, गुंडप्पा मुंगळे, समीर कुरेशी, सैफन कुरेशी, बब्बू कुरेशी, अज्ञात वाहन चालक असे एकूण ७ जणांविरुध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास वराळे करत आहेत.



सोलापूर : कृषी बाजार समितीत मोठ्या प्रमाणात कलिंगडाची आवक झाली असून वाढत्या तापमानात कलिंगडाची मागणी वाढली आहे.

# शालेय शिक्षणात 'कृषी'चे धडे; विद्यार्थ्यांना मिळणार शेतीचे ज्ञान

तिसरी ते दहावी इयत्तेपर्यंत टप्प्याटप्प्याने समावेश




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मार्च-**

राज्यातील शालेय शिक्षणात कृषी विषयाचा समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार इयत्ता तिसरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना कृषी विषयाचे प्राथमिक तसेच सखोल ज्ञान देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

या नव्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच शेती आणि कृषीपूरक व्यवसायांचे प्रत्यक्ष आकलन होणार आहे. या संदर्भातील अभ्यासक्रम व्यवसाय शिक्षण विषयाच्या समितीसमोर सादर करण्यात आला. पुढील शैक्षणिक वर्षापासून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत दिली. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२३ आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कृषी विषयाशी संबंधित घटकांचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना शेतीविषयी प्राथमिक माहिती देण्यावर भर दिला जाणार आहे, तर उच्च प्राथमिक स्तरावर कृषी विषय अधिक सखोल पद्धतीने शिकवण्यात येणार आहे.

### लहान वयातच मिळणार शेतीचे मूलभूत ज्ञान

या नव्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना शेतीचे मूलभूत ज्ञान लहान वयातच मिळणार असून, भविष्यात कृषी क्षेत्रात नव्या संधी निर्माण होण्यासही मदत होणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शेतीशी निगडित कौशल्ये आत्मसात करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

**इयत्तानिहाय कृषी विषय याप्रमाणे**

| | |
|---|---|
| इयत्ता तिसरी | परसबागेतील कामे , पशुपक्ष्यांशी निगडित व्यवसायांची माहिती |
| इयत्ता चौथी | पिके, परसबाग, शेतीपूरक व्यवसायांची ओळख. |
| इयत्ता पाचवी | परिसरातील शेती, शेतीपूरक व्यवसाय आणि त्यांचे प्रकार. |
| इयत्ता सहावी | शालेय परसबाग आणि जैवविविधतेशी संबंधित उपक्रम. |
| इयत्ता सातवी | अधिवास उद्यान, शालेय रोपवाटिका,त्याचे संगोपन. |
| इयत्ता आठवी | सेंद्रिय शेती, पाळीव प्राण्यांचे पोषण व देखभाल |
| इयत्ता नववी | तृणधान्य उत्पादन आणि बागकामाची माहिती. |
| इयत्ता दहावी | संरक्षित शेती तंत्रज्ञान आणि कुक्कुटपालन. |



# शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी लवकरच संयुक्त बैठक

### महापौर विनायक कोंड्याल यांची सहाय्यक पोलिस आयुक्तांकडून सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मार्च-**

सोलापूर शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत व सुरक्षित करण्यासाठी महानगरपालिका आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्यावर भर देण्यात येईल. यासाठी लवकरच संयुक्त विशेष बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले आहे.


सोलापूर शहराचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर यांनी आज विनायक कोंड्याल यांची सदिच्छा भेट घेऊन महापौरपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नगरसेवक अक्षय अजिखाने, यतिराज व्हनमाने, भोजराज पवार उपस्थित होते. भेटीदरम्यान शहरातील वाहतूक व्यवस्थेच्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः शहरातील प्रमुख चौकांमध्ये वारंवार होणारी वाहतूक कोंडी, सिग्नल व्यवस्था, झेब्रा क्रॉसिंगची अंमलबजावणी तसेच वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करण्याबाबत विचारविनिमय झाला. शहरातील प्रमुख चौकांवरील सिग्नल व्यवस्था सुधारणा, झेब्रा क्रॉसिंगचे प्रभावी नियोजन, वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीपूर्वीच जि.प.चा ४५.८३ कोटींचा अर्थसंकल्प सादर

आरोग्य, शिक्षण, महिला, बालकल्याणसह विविध विभागांसाठी वाढीव तरतूद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मार्च-**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ४५ कोटी ८३ लाख रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक सोमवारी सादर केले. प्रशासकीय कारकिर्दीत जंगम यांनी सादर केलेले हे चौथे अंदाजपत्रक असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीपूर्वीच प्रशासनाने अर्थसंकल्प मांडल्याने नव्या सदस्यांना प्रक्रियेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा जिल्हा परिषद वर्तुळात सुरु झाली आहे.




या अंदाजपत्रकानुसार जिल्हा परिषद सेसच्या माध्यमातून ४५ कोटी ८३ लाख रुपयांची आवक अपेक्षित धरण्यात आली आहे. तर खर्चासाठी ४५ कोटी ७४ लाख ८ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आवक व खर्चानंतर ८ लाख ९२ हजार रुपयांची शिल्लक राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील व अमोल जाधव, कृषी अधिकारी हरिदास हावळे, महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, योजना विभागाच्या शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, नरेंद्र खराडे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी उपस्थित होते.

२०२६-२७ च्या मूळ अंदाजपत्रकात आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण, ग्रामीण पाणीपुरवठा, कृषी, पशुसंवर्धन आणि समाजकल्याण या विभागांसाठी वाढीव तरतूद करण्यात आली आहे. या अंदाजपत्रकात आरोग्य विभागासाठी ५ कोटी, शिक्षण विभागासाठी ५ कोटी ३३ लाख, महिला व बालकल्याण विभागासाठी ३ कोटी २५ लाख, ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी ३ कोटी ९६ लाख, कृषी विभागासाठी ३ कोटी ८५ लाख, पशुसंवर्धन विभागासाठी ३ कोटी २० लाख, समाजकल्याण विभागासाठी ४ कोटी ७२ लाख, लघु पाटबंधारे विभागासाठी १ कोटी ५० लाख, बांधकाम विभागासाठी ८ कोटी ५० लाख, प्रशासनासाठी ५ कोटी २५ लाख आणि ग्रामपंचायत विभागासाठी २ कोटी २५ लाख अशी एकूण ४५ कोटी ८३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### तांत्रिक कारणामुळे अर्थसंकल्प आगाऊ

जि.प.अधिनियमातील कलम ४५ (५) नुसार जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक २७ मार्चपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीनंतर पंधरा दिवसांत सभापती निवडीची सभा घेणे आवश्यक आहे. नवीन निवडून येणारे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी आणि सदस्य यांच्या अवलोकनासाठी हे अंदाजपत्रक ठेवण्यात येणार असून आवश्यक ते बदल ते करू शकतील, असेही मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी स्पष्ट केले.



# मोटार व केबल चोरी; दोन आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मार्च-**

विहिरीवरील मोटार व केबल चोरी प्रकरणी दोन आरोपींना अटक करत ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी विशाल श्याम जाधव (रा. साठे नगर, धाराशिव) याला ताब्यात घेण्यात आले.

चौकशी दरम्यान त्याने शेतकऱ्यांच्या विहिरीवरील इलेक्ट्रॉनिक पाण्याच्या मोटारी व केबल चोरी केल्याची कबुली दिली व चोरी केलेला मुद्देमाल काढून दिला. या गुन्ह्याचा पुढील तपास करत असताना आरोपीचा साथीदार समीर अल्ताफ सय्यद (रा. समर्थ नगर, धाराशिव) याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी करण्यात आली. त्यावेळी त्याने वैराग पोलीस ठाणे हद्दीतील विहीरीवरील पाण्याच्या मोटारी व केबल चोरी केल्याची कबुली दिली.

६ इलेक्ट्रॉनिक पाण्याच्या मोटारी व सुमारे ४०० केबल असा ८९,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील शेतकरी वर्गात समाधान व्यक्त करण्यात येत असून अशा प्रकारच्या चोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# एचपीव्ही लस सुरक्षित; अफवांना बळी पडू नका : सीईओ जंगम




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मार्च**

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी एचपीव्ही लसीकरण मोहिमेबाबत काही सामाज माध्यमांवर अफवा पसरत असल्या तरी पालकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन सोलापूर जिल्हा आरोग्य विभागाने केले आहे. एचपीव्ही प्रतिबंधक लस पूर्णपणे सुरक्षित असल्याचा दावा शासनाने केला असून, या मोहिमेत सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील १४ वर्ष पूर्ण पण १५ वर्षांखालील मुलींसाठी सुमारे २५ हजार ६१८ मुलींना मोफत लस देण्यात येणार आहे.

दरम्यान, आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, लसीकरणानंतर इंजेक्शनच्या ठिकाणी वेदना, लालसरपणा, सूज, सौम्य ताप, डोकेदुखी, थकवा, मळमळ किंवा चक्कर येणे यासारखे किरकोळ परिणाम जाणवू शकतात. काहीवेळा इंजेक्शनची भीती किंवा रिकाम्या पोटी आल्यामुळे बेशुद्ध पडण्याची शक्यता असते. मात्र हे परिणाम साधारणतः एक ते दोन दिवसांत आपोआप कमी होतात, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. आरोग्य विभागाने सामाजिक माध्यमांवर फिरणाऱ्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. पूर्वीप्रमाणेच विविध आजारांपासून संरक्षणासाठी मुलांना लसीकरण केले जाते, त्याच धर्तीवर ही लस भविष्यात महिलांना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.



### पालकांनी मुलींना लसीकरणासाठी पुढे आणावे

सोलापूर जिल्ह्यात १४ वर्ष पूर्ण पण ते १५ वर्षांखालील मुलींना एचपीव्ही लस देण्याची मोहीम राबविण्यात आली आहे. ही लस पूर्णतः सुरक्षित आहे. अफवांवर विश्वास न ठेवता पालकांनी मुलींना लसीकरणासाठी पुढे आणावे.
– **कुलदीप जंगम,** मुख्य कार्यकारी अधिकारी आरोग्य सोलापूर

आशा वर्कर यांनी ग्रामीण भागात केलेल्या सर्वेक्षणमधील १४ ते १५ वर्षे वयोगटातील लाभार्थी मुलींची आकडेवारी

| | |
|---|---|
| अक्कलकोट – | २,२८३, |
| मोहोळ – | २,६१० |
| माळशिरस – | ३,९५० |
| माढा – | २,२६२ |
| पंढरपूर – | ३,५८२ |
| सांगोला – | २,६२० |
| बार्शी – | १९०२ |
| उत्तर सोलापूर – | ९६९ |
| दक्षिण सोलापूर – | ३,६६० |
| करमाळा – | २,२८८ |
| आशा वर्करद्वारे सर्वेक्षण मुलींची संख्या– | २५,६१८ |
| एकूण लाभार्थी मुली – | २९,९२४ |
| एकूण लोकसंख्या – | ३०,५२,८३७ |




एचपीव्ही लसीकरण मोहीम हा केंद्र शासनाचा महत्त्वाचा आरोग्य उपक्रम आहे. आरोग्य विभाग, मंत्रालय आणि वैद्यकीय तज्ञांनी ही लस पूर्णतः सुरक्षित असल्याचे स्पष्ट केले आहे. सामाजिक माध्यमांवर काही व्यक्तींनी व्यक्त केलेल्या मतांना कोणतेही वैज्ञानिक पुरावे नसल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे. खुल्या बाजारात ही लस महागडी असली तरी शासनाकडून ती मोफत दिली जात असल्याने पात्र मुलींनी व त्यांच्या पालकांनी यामोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा.
– **डॉ. संतोष नवले,**
जिल्हा आरोग्य अधिकारी

## ज्ञानामृत आनंदलहरी - १३१९

एका सर्वस्वाचा त्याग। एका पोटासाठीं जोग॥

संसारात अडकलेल्या जीवाला खऱ्या अर्थाने स्वत:चा परिचय होत नाही. म्हणून अनेक लोक संसाराचा त्याग करुन विशिष्ट प्रकारची त्यागाचा प्रतिक असणारी वस्त्रे धारण करुन संन्याशी होतात. पण असे संन्याशी लोक खऱ्या अर्थाने संसार त्यागतातच असे नाही. कारण अशा लोकांजवळही स्वार्थ, माया, मोह, द्वेष, मत्सर अहंकार, मीपणा पहायला मिळतो. संसारात अडकलेल्या जीवाजवळ हे सर्व कांही प्रमाणात का होईना आपले वास्तव्य करतात, त्यामुळे त्या जीवाला स्वत:चा खरा परीचय होईल कसा? यावरुन असे दिसून येते की, केवळ संन्याशाचा पेहराव धारण केला म्हणजे माणूस पूर्णत: संन्याशी होतोच असे नाही. संसारात राहूनही अनेक लोक खऱ्या अर्थाने संसारापासून दूर राहतात. म्हणजेच संसाराच्या मायाजाळात अडकत नाहीत. संसार करणे हे आपले कर्तव्य समजून ते निती-नियमाला अनुसरुन आपले कर्तव्य पार पाडत असतात. आपल्या खऱ्या परिचयासाठी ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, मोह, आदीचा सर्वस्वी त्याग करणारे आहेत. त्याप्रमाणे पोट भरण्यासाठी सर्वस्व त्याग केल्याचे दाखवून जोगी, संन्याशीचा पेहराव धारण करणारेही आहेत. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**एका सर्वस्वाचा त्याग। एका पोटासाठीं जोग॥**

संन्याशाचा पेहराव धारण करणाऱ्यांना अनेक लोक साधु-संत मानून त्यांची सेवा करतात. अशा सेवेतून बरेच कांही साध्य करुन घेणारे कांही ढोंगी साधू असू शकतात. अशा ढोंगी लोकांना आपण जनसामान्यांना फसवून स्वार्थ साधत असलयाचा आनंद वाटत असला तरीही खऱ्या अर्थाने हे लोक स्वत:चीच फसवणूक करीत असतात. लोकांच्या भावनेशी खेळणे हा वेडेपणा आहे. पण स्वार्थामुळे असा वेडेपणा केल्याशिवाय लोक रहात नाहीत. मनाभावातून सर्वस्व त्याग करणे अत्यंत अवघड असते. सर्वस्व त्याग करण्याची मानसिक तयारी करुन त्याप्रमाणे वागणाऱ्याला विशिष्ट असा पेहराव धारण करण्याची गरज पडत नाही. दिखाव्यापेक्षा वर्तनाची खरी गरज असते. पोटासाठी साधु-संतांचे ढोंग करण्यापेक्षा कष्ट करुन पोट भरण्याचा आनंद कांही वेगळाच असतो. ढोंगी साधुमुळे समाजात अंधश्रध्दा पसरण्याला मदत होते. अशा लोकांमुळे समाज अधोगतीकडे वाटचाल करु लागतो. अशा लोकांवर श्रध्दा ठेवून वागणारे लोक जेव्हा फसतात तेव्हा फसलेले लोक खऱ्या, संन्याशांकडे, साधु-संतांकडेही शंकात्मक दृष्टीने पाहू लागतात. कपडयांचा त्याग म्हणजे संन्याशी नव्हे. संन्याशी होण्यासाठी स्वार्थी वृत्तीचा त्याग करावा लागतो. त्यागाची वृत्ती जोपासण्यासाठी संन्यासच घ्यावा लागतो किंवा संसार सोडावाच लागतो असे नाही. संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव आदी संतांनी संसारात राहूनही संसारापासून दूर राहता येत असल्याचे त्यांच्या वर्तनातून दाखवून दिले आहे. संन्याशी होऊन जगण्यापेक्षा संसारात राहून संन्याशी वृत्तीने जगणे अवघड असते. संसाराचा त्याग म्हणजे स्वत:च्या जीवनापासून, कर्तव्यापासून पलायन होय. त्यामुळे संसारात राहून माणसाने ईर्षा, द्वेष, मत्सर, क्रोध, काम, अहंकार आदीचा त्याग करायला हवे. हा त्याग म्हणजेच खरा संन्यास होय. समाजात अत्यंत चांगले, नि:स्वार्थी, साधू, संन्याशी आहेत हे याप्रसंगी विसरता कामा नये. आम्ही काढलेले अभंगांचे अर्थ हे आमच्या अल्प बुध्दीचे आहेत. त्यामुळे चूक भूल मोठ्या मनाने माफ करावी. आपल्या जीवनात ज्ञानामृत वाढावे ही मनोमन इच्छा असल्याने हा प्रयत्न चालू ठेवला आहे, यात कसलाही स्वार्थ नाही. जय जय राम कृष्ण हरी. संत तुकाराम महाराजांचा फोटो घ्यावा.

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## आयोध्यासम श्रीराम मंदिर साकारणार बेलाटीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी गावामध्ये आयोध्येच्या धर्तीवर प्रभु श्री रामाचे मंदिर साकारणार असून गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावरती - या मंदिराचे भूमिपूजन सोहळा होणार असल्याची माहिती बेलाटीचे श्रीराम पाटील यांनी दिली आहे.



बेलाटी गावातील श्री संत सद्गुरु बाळूमामा मंदिर परिसरातच श्रीराम मंदिर साकारले जाणार आहे. अयोध्या येथे भाविकांना दर्शनासाठी जाणे शक्य नाही त्या भाविकांना बेलाटी येथील मंदिरात दर्शन घेता येईल. भाविकांची हीच अडचण लक्षात घेऊन, सर्व श्रीराम भक्तांना प्रभू रामाच्या चरणी नतमस्तक होता यावे आणि सोबतच बाळूमाम ांच्या दर्शनाचा लाभ घेता यावा, या उदात्त हेतूने हे मंदिर उभारले जात आहे. भूमिपूजन सोहळ्यासाठी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह, स्थानिक आमदार तसेच महाराष्ट्रातील विविध नामवंत संत आणि महंतांची मांदियाळी जमणार आहे.

मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील यांनी अयोध्येच्या मंदिराच्या धर्तीवर हे नियोजित मंदिर उभारण्याचा संकल्प सोडला आहे. १९ मार्च, गुरुवार (गुढीपाडवा) रोजी सकाळी हा भूमीपूजन विधी होईल. या ऐतिहासिक आणि अध्यात्मिक सोहळ्यास पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मंदिर समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## ज्ञानेश्वरी पारायण सोहळा जूनमध्ये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

येथील श्री सिद्धेश्वर फाउंडेशनतर्फे ५ जून ते १३ जून या कालावधीत जामगुंडी लॉन्स, जुळे सोलापूर येथे ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित केला आहे, अशी माहिती फाउंडेशनचे सचिव डॉ. अनिल सर्जे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा अधिक मास येत आहे. हा महिना भगवान विष्णूला समर्पित असतो म्हणून याला पुरुषोत्तम मास म्हणतात. या काळात विष्णूची पूजा करणे अत्यंत फलदायी मानले जाते. या काळात पूजा-पाठ, व्रत-वैकल्य, अप-तप, दान-धर्म करणे आणि गोमातेची सेवा करपणे अत्यंत शुभ मानले जाते. यामुळे भगवान विष्णूंची कृपा प्राप्त होते. या मासात भगवान विष्णूंची पूजा करण्याला विशेष महत्त्व आहे. तसेच अधिक मासात रामायण, गीता यांसारख्या धार्मिक संघांचे दान करणेही अत्यंत शुभ मानले जाते.

हे संपूर्ण वर्ष ज्ञानेश्वर माउलीचे ७१० वे जयंती वर्ष आहे. भगवान श्रीकृष्णांची भगवद्गीता आपल्याला समजावी म्हणून माऊलींनी मराठी भाषेत ज्ञानेश्वरीच्या रुपात लिहिली. या पवित्र अधिक मासामध्ये माउलींच्या अमृतवाणीचे पारायण करण्याची सुवर्णसंधी आपल्याला मिळणार आहे.

या पारायणसाठी जांच्याकडे ग्रंथ उपलब्ध आहे त्यांनी स्वतःचा ग्रंथ आणावा,ज्यांच्याकडे ग्रंथ नाही त्यांना सिद्धेश्वर फाउंडेशनकडून ग्रंथ उपलब्ध करून देणार आहोत.

या पारायण सोहळ्याची नोंदणी गुढीपाडवा, गुरुवार, दि.१९ मार्चपासून ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने सुरु होत आहे. यासाठी गुरूलिंग कन्नूरकर (९४२०३३१८८४), राजेंद्र बलसुरे (९६०४४२८४७१) व नम्रता दिवाकर (९५५२८९६४८३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री सिद्धेश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ सर्जे, सतीश मालू यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस सिद्धार्थ सर्जे , विकास मरगुर, सीमा खोडके, राजेंद्र बलसुरे आदी उपस्थित होते.



## कौशल्ये विकसित केल्यास विद्यार्थ्यांना उज्ज्वल करिअर घडवता येईल

### दयानंद महाविद्यालयात चेतन गोडबोले यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

एआय इंजिनिअर, डेटा सायंटिस्ट, मशीन लर्निंग तज्ज्ञ, रोबोटिक्स इंजिनिअर अशा विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून कौशल्ये विकसित केल्यास विद्यार्थ्यांना उज्ज्वल करिअर घडवता येईल, असे प्रतिपादन निलया फाऊंडेशन पुणेचे चेतन गोडबोले यांनी केले.

डी.ए.व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालयात 'Artificial Intelligence and Career Opportunities' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. Artificial Intelligenceचे वाढते महत्त्व, विविध क्षेत्रांमध्ये होणारा त्याचा वापर तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या करिअरच्या संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करण्याचे महत्त्व सांगितले आणि विद्यार्थ्यांनी बदलत्या काळानुसार स्वतःला तयार ठेवावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पटेल उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कपिल रंगदळ यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पटेल यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात Artificial Intelligence सारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे भविष्यातील रोजगाराच्या संधी वाढणार असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करण्यावर भर दिला. डॉ. नागसेन गवळी यांनी आभार मानले.

## शिक्षण संचालनालयाने कॅशलेस योजनेचे आदेश तात्काळ पारित करावे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेसाठी (कॅशलेस योजना)१०० टक्के अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून तात्काळ आदेश पारित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य मान्य खासगी प्राथमिक शिक्षक महासंघाचे जिल्हाअध्यक्ष कल्लप्पा फुलारी यांनी केली आहे. शिक्षण संचालनालयाने ३ मार्च २०२६ रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक यांना आदेश पारित केलेला असून त्यात प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना आदेश नसल्याने प्राथमिक शिक्षकही संभ्रमात असून प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना आदेश देऊन राज्यातील प्राथमिक शिक्षकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी आयुक्त शिक्षण महाराष्ट्र राज्य यांच्यांकडे केली आहे.

## कुमठ्यातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात रामनवमी उत्सव, कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर (कुमठे) येथे ता. २६ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत श्री राम नवमी ते हनुमान जयंती, उत्सवाचे आयोजन केले आहे. दररोज हरी कीर्तन, प्रवचन, ज्ञानेश्वरी, गाथा पारायण श्रीराम कथा, हरिपाठाचे आयोजन आहे. याशिवाय नामवंत महाराजांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. पहाटे चार वाजता काकडा, सकाळी सात वाजता ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी बाराला गाथा भजन, दुपारी दोन ते पाच श्रीराम कथा निरूपण, सायंकाळी पाचला हरिपाठ, सायंकाळी सहाला प्रवचन, रात्री आठला हरी कीर्तन, रात्री दहाला हरिजागर. दररोज रामकथा अभिम न्यू पाटील महाराज यांचे निरूपण आहे.

**कीर्तनकार महाराजांची नावे याप्रमाणे -**


ता. २६ - पांडुरंग माने (रामजन्माचे कीर्तन - सकाळी दहा ते बारा), वैभव महाराज काणेगावकर (रात्री आठ वाजता), ता. २७ - संजय पाटील महाराज, ता. २८ प्रदीप माने महाराज, ता. २९- माऊली पाटील महाराज, ता. ३० सागर महाराज पवार ता. ३१ संभाजी महाराज मेहूणकर, ता. १ श्रीगुरू यशवंतबापू बोधले महाराज, ता. २ शाम जोशी महाराज (पहाटे पाच ते सात- हनुमान जन्म कीर्तन), गुरुवर्य काकासाहेब महाराज पाटील (रात्री आठ वाजता कीर्तन), ता. ३ काल्याचे कीर्तन, सुधाकर महाराज इंगळे (सकाळी दहा ते बारा). -- प्रवचनकार महाराजांची नावे - ता. २६- अरुण निळ महाराज, ता. २७- संजय पाटील महाराज, ता. २८-विजय घोडके महाराज, ता. २९-मुकुंद ताकमोगे महाराज, ता. ३० सोपान महाराज पवार, ता. ३१ महादेव वाघमारे महाराज, ता. १ चंद्रकांत गुरव महाराज, ता. २ संतोष घोडके महाराज.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. १७ मार्च २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - फाल्गुन कृ. त्रयोदशी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- शततारका (३०.०८)
योग -सिद्ध साध्य (०८.२०)
करण - विष्टी (२०.५८)
राहू काल : मंगळवार
दु. ३.०० ते ४.३०

दिनविशेष :
१९०९: भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक रामचंद्र नारायण दांडेकर यांचा जन्म.
१९६२: भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर - कल्पना चावला हिचा जन्म.
१९१०: समाजसेविका अनुताई वाघ यांचे निधन.
२०१९: गोव्याचे १०वे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर मरणोत्तर पद्म भूषण.



## नवले सिंहगड महाविद्यालयात बाल विवाह विरोधी सामूहिक शपथ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

एन.बी.नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात केगाव येथे सिंहगड-हिरकणी सेलच्या वतीने महिला दिनानिमित्त महिला सशक्तीकरण आणि सुरक्षा जनजागृती या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळेस बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी सामूहिक बालविवाह विरोधी शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमासाठी राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभाग संचलित सखी वन स्टॉप सेंटरच्या प्रशासक सुवर्णा शिवानंद गाडेकर, केस वर्कर शुभांगी दत्ता कांबळे तसेच सुरक्षा रक्षक सोनाली ताटे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. हा कार्यक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता. यावेळेस बालविवाहाचे दुष्परिणाम आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे नुकसान यावर समुपदेशन झाले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. मयुरी लटके यांनी काम पाहिले. यावेळी प्राचार्य डॉ शंकर नवले, प्रा. सुवर्णा क्षीरसागर उपस्थित होत्या. राज्य शासनाच्या सखी वन स्टॉप सेंटरच्यावतीने वूमन हेल्पलाइन १८१ तर बाल अत्याचार विरोधी चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक १०९८ यांचा प्रचार, प्रसार केला. यात गोपनीयता राखली जात असल्याचे सांगितले. कोणतीही अडचण आल्यास जवळच्या सखी वन स्टॉप सेंटरशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

## गुढीपाडव्यानिमित्त पाच ठिकाणी शोभायात्रा

### हिंदू नववर्ष महोत्सव समितीतर्फे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

हिंदू नववर्ष महोत्सव समितीतर्फे गुढीपाडवा अर्थात हिंदू नववर्ष दिनानिमित्त गुरूवार दि. १९ मार्च रोजी शहरात विविध पाच ठिकाणी शोभायात्रा काढण्यात येणार आहे, अशी माहिती समितीचे संस्थापक रंगनाथ बंग, उत्सव समितीचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, कार्यवाह ज्ञानेश्वर म्याकल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पहिली शोभायात्रा बाळीवेस येथील विजयी चौकातून दुपारी ४.३०वाजता प्रारंभ होणार आहे. या शोभायात्रेत विशेष सजीव देखावा, भारत माता प्रतिमा, एलईडी वर समाज परिवर्तन साठी पंचवर्तनची माहिती, आयोध्या श्रीराम दर्शन, छत्रपती शिवाजी महाराज, बाल संभाजी महाराज आणि मावळे सजीव देखावा असणार आहे. देवतांची वेशभूषा केलेली आणि सजवलेल्या बग्गीत बसलेली मुले असणार आहेत. महिला सक्षमीकरणासाठी लाठी काठी प्रदर्शन, काटवे यांचे भरतनाट्यम सादर करण्यात येणार आहे. स्वामी यांचे रूद्र पठण, मारवाडी महिला मंडळ, पद्मशाली महिला मंडळ, पंचमुखी हनुमान मंदीर मूर्ती देखावा, आजोबा गणपती यांचे १०० जणांचे ढोल पथक सहभागी होणार आहेत. महिला लेझीम पथक, मारवाडी युवा मंच पुरूष लेझीम पथक या शोभायात्रेत असणार आहे. या शोभायात्रेत विशेष आकर्षण म्हणजे आर्टीफिशल हत्तीवर छ. शिवाजी महाराजांची प्रतिकृती असणार आहे. सगळ्यात शेवटी भारतमाता रथ असणार आहे. नववर्ष स्वागत शोभा यात्रेत अयोध्या येथील रामलल्लाचे दर्शन यंदाच्या शोभायात्रेत सोलापूरकरांसाठी अयोध्या येथील रामलल्ला मूर्तीचे दर्शन होणार आहे.

ही शोभायात्रा बाळीवेस चौकातून प्रारंभ होऊन टिळक चौक, मधला मारुती, माणिक चौक, दत्त चौक, नवीपेठ,पारसइस्टेट मार्गे शिवस्मारक पटांगणात समारोप होईल.

दुसरी शोभायात्रा जुळे सोलापूर परिसरातून काढण्यात येणार आहे. दुपारी ४.३० वाजता किल्लेदार मंगल कार्यालय येथून प्रारंभ होणार असून ही शोभायात्रा किल्लेदार मंगल कार्यालय येथून प्रारंभ होणार आणि केएलई येथे समारोप होईल. तिसरी शोभायात्रा मल्लिकार्जूननगर लॉन, अक्कलकोट रोड येथून निघणार असून सायंकाळी ५.३० वाजता सुरूवात होणार आहे. साक्षी गणपती, वेलकम हॉल या मार्गावरून मल्लिकार्जून हॉल येथे समारोप होणार आहे. या शोभायात्रेत बाराबंदी पथक, वारकरी पथक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ घोष पथक, दुर्गामाता दौड पथक आणि महापुरूषांच्या वेशभूषा परिधान केलेले समूह सहभागी असेल.

या पत्रकार परिषदेस नितीन करवा, प्रकाश कलकोटे, चिदानंद मुस्तारे, सहप्रमुख गंगाधर गवसणे, विजय प्याटी, अॅड. शर्वरी रानडे, रवींद्र नासिककर आदी उपस्थित होते.

### सकाळच्या सत्रात दोन शोभायात्रा काढणार

तत्पूर्वी सकाळच्या सत्रात दोन शोभायात्रा अनुक्रमे सम्राट चौक येथील महेश कॉलनी तसेच अशोक चौक येथील पंचमुखी मारुती देवस्थान येथून सकाळी साडेआठ वाजता निघणार आहेत.दरवर्षीप्रमाणे शोभायात्रेत हिंदू बंधू – भगिनींनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे. शहरातील सर्व महिलांनी गुढीपाडवा या दिवसाचे महत्व लक्षात घेवून स्वागत करावे, घरासमोर छान रांगोळी काढावी, घरावर भगवा ध्वज लावावे आणि गुढी उभा करून गुढी पाडवा दिवसाचे स्वागत करावे,असे आवाहन संस्थापक रंगनाथ बंग यांनी केले आहे.

## महत्वाचे...



### वेळापूर पंचशीलनगर डॉ. आंबेडकर जयंती समिती अध्यक्षपदी सतीश कांबळे

**वेळापूर, दि. १६ मार्च-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वेळापूर येथे भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती पंचशीलनगर २०२६ ची बैठक नुकतीच पार पडली. ही बैठक वेळापूर ग्रामपंचायतीचे सरपंच रजनीश बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. बैठकीत जयंती समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी सतीश कांबळे, उपाध्यक्षपदी जिवा लोंढे, खजिनदारपदी रणजित सरवदे, कार्याध्यक्षपदी विश्वजीत बनसोडे, सचिवपदी अजित लोंढे, संपर्क प्रमुखपदी अण्णा बनसोडे, तर प्रसिद्धी प्रमुखपदी हर्षद बनसोडे व शंकर लोंढे यांची निवड करण्यात आली. समिती सदस्य म्हणून आदेश मोरे, गणेश धांडोरे, शुभम बनसोडे यांची निवड करण्यात आली असून मार्गदर्शक म्हणून दिलीप बनसोडे, विजयभाऊ बनसोडे, रविराज गायकवाड, भैया बाबर हे कार्य पाहणार आहेत. तसेच मिरवणूक प्रमुख म्हणून नितीन लोंढे, राजकुमार बनसोडे, विलसन बनसोडे, रणजीत बनसोडे, सचिन उबाळे, हेमंत बनसोडे, शशिकांत लोंढे, अनिल कांबळे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दिनांक २६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या या मिरवणुकीस सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.



### माने-देशमुख परिवारास सोनिया गोरे यांची सदिच्छा भेट

**वेळापूर, दि. १६ मार्च-**

माने देशमुख परिवाराच्या मार्गदर्शिका सोनिया गोरे यांनी वेळापूर (ता. माळशिरस) येथील वेळापूर येथे भाजपाचे कार्यकर्ते मदनसिंह माने-देशमुख यांच्या निवासस्थानी महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पत्नी सोनिया गोरे यांनी सदिच्छा भेट दिली.यावेळी मदनसिंह माने-देशमुख, सोमनाथ सावंत, पृथ्वीराज माने देशमुख, सौजन्य टिंगरे, कृष्णा लोहार, माऊली पवार, बाळासाहेब पिसे, आदित्य चिंचकर उपस्थित होते. यावेळी बोलताना सोनिया गोरे म्हणाल्या की, मदनसिंह माने देशमुख आणि त्यांच्या परिवाराने सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य कौतुकास्पद आहे. त्यांनी भाजप पक्षासाठी निष्ठेने व जोमाने काम सुरू ठेवावे. तसेच त्यांनी सुरू केलेल्या विविध व्यवसायातही जिद्द, प्रामाणिकपणा आणि कष्ट यांच्या बळावर आणखी मोठी प्रगती साधावी, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.



### शिवाजी महाराज स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**वैराग, दि. १६ मार्च-**

तालुक्यातील कारी येथील जयभवानी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित, छत्रपती शिवाजी महाराज इंग्लिश स्कूलचा सन २०२५-२६ चा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा वातावरणात पार पडला. बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड यांच्या हस्ते या सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी पांगरी गटाच्या नूतन जिल्हा परिषद सदस्या डॉ. रेश्मा डोके यांचा संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय गरड होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्याध्यापक महावीर भुसारे आणि आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त मोहम्मद शेख उपस्थित होते. व्यासपीठावर बाजार समितीचे माजी संचालक शिवाजी गायकवाड, उपसरपंच खासेराव विधाते, सरपंच नीलम कदम, एकता महिला मंच प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, राजेश पवार, अनिल चौधरी, बालाजी विधाते, आसिफ मुलाणी, अतुल चालखोर, बालाजी येडवे, अमृता माळी, चंद्रकांत करळे, हरिश्चंद्र कावळे, दिलीपकुमार शिंदे, बापू कावळे, प्रमिला जाधव उपस्थित होता. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी ३० विविध गाण्यांवर बहारदार सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन बापू कावळे आणि शिवराज वाघे यांनी केले. संस्थेचे संचालक संतोष जगदाळे व संचालिका प्रतिभा जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### डोक्यात, डोळ्यावर लोखंडी सळइने मारहाण

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

हाताने लाथा बुक्क्याने दि. १४ मार्च रोजी सुमित घोडके रा. कुमठे गाव व इतर तीन इसम यांनी सर्वेश लक्ष्मण शास्त्रे वय २९, रा. कुमठे गाव ता. दक्षिण सोलापूर याला मारहाण करून शिवीगाळ करून सुमित घोडके यांनी डोक्यात, डोळ्यावर लोखंडी सळीने मारले. त्यामुळे सर्वेशला जखम झाली. याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात दि. १५ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सांगळे करत आहेत.

# समाजहिताची वाचन चळवळ अधिक समृध्द व्हावी : गाडेकर

## पंढरीत ग्रंथोत्सवाचा समारोप; उत्कृष्ठ ग्रंथपाल, वाचक, प्रकाशकांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मार्च-**

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ग्रंथोत्सव सुरू आहेत. परंतु, पंढरीच्या या पावन नगरीतील ग्रंथोत्सव वाचन आणि ग्रंथालय चळवळीचा उद्देश खरोखर सफल करणारा ठरला आहे. ग्रंथ आणि वाचन ही पवित्र, समाज हिताची चळवळ वाढली पाहिजे, समृद्ध झाली पाहिजे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. ग्रंथालयांनी वाचकांची वाट न पाहता आपणच वाचकांपर्यंत जाण्याचा संकल्प नवीन वर्षात करावा, असे आवाहन राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरणांतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, राज्य ग्रंथालय संचालनालय, सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि सोलापूर ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचा समारोप झाला. याप्रसंगी गाडेकर यांनी चळवळीत काम करीत असलेल्या




कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी ग्रंथमित्र कुंडलिक मोरे होते. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष जोतिराम गायकवाड, मराठी भाषा अधिकारी प्रमोद पाटील, ग्रंथालय निरीक्षक संजय ढेरे, प्रदीप गाडे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी जिल्ह्यातील उत्कृष्ठ ग्रंथपाल, वाचक तसेच पुस्तक प्रकाशकांचा प्रातिनिधीक सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी तानाजी जाधव, प्रशांत जाधव, विनोद गायकवाड, फुलचंद नागटिळक, अन्सर शेख, कृष्णदेव म दने, रवी गाजरे, सुभाष सुडके, राजेश पवार, रामदास नागटिळक, हणमंत शिंदे, विनायक गुरव आदींनी परिश्रम घेतले. जिल्ह्यातील पदाधिकारी, वाचक, कार्यकर्ते उपस्थित होते. जोतिराम गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.

सकाळच्या सत्रात साहित्यिक राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन झाले.कथाकार जयवंत आवटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यानंतर दुपारी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे अष्टपैलू व्यक्तीमत्व या विषयावर परिसंवाद झाला.प्रा.डॉ. चंद्रकांत चव्हाण, लेखक गोविंद काळे, प्रा. डॉ. सुशिला पिंजारी या मान्यवरांनी सहभागी होत विचार मांडले.

### ग्रंथोत्सवात पुस्तकांची मोठी विक्री

ग्रंथोत्सवाचे औचित्य साधून अनेक प्रकाशकांनी पुस्तक प्रदर्शन व विक्रीचे स्टॉल उभारले होते. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहाय्यक संचालक सुनील हुसे यांनी अधिकाधिक ग्रंथ खरेदीचे आवाहन केले. त्यानुसार दोन दिवसांत प्रत्येक ठिकाणी शेकडो पुस्तकांची विक्री झाली. वाचन चळवळीसाठी ही बाब अतिशय सुखद असल्याचे हुसे यांनी नमूद केले.

## मोडनिंब येथील स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १६ मार्च-**



श्री स्वामी समर्थ प्रकट दिनाचे औचित्य साधून मोडनिंब (ता. माढा) येथील विद्यानगरी सोसायटी शिवाजीनगर परिसरातील स्वामी समर्थ मंदिरात प्रकटदिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार (दि. १७ मार्च) रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्री स्वामी सारामृत पारायण होणार आहे. बुधवार (दि. १८ मार्च) रोजी सायं. ६.१५ वाजता ज्येष्ठ प्रवचनकार डॉ. जयंत करंदीकर यांचे प्रवचन होणार आहे. गुरुवार (दि. १९ मार्च) रोजी सायं. ६.१५ वाजता ज्येष्ठ प्रवचनकार व शेतीतज्ज्ञ मनोज शहा यांचे प्रवचन होणार आहे.शुक्रवार (दि. २० मार्च) रोजी सायंकाळी ५ वाजता कीर्तनकार किरण महाराज सुरवसे यांचे प्रकटदिनानिमित्त कीर्तन होईल. त्यानंतर सायं. ७ वाजता उपासना व तारकमंत्र, तर सायं. ७.२० वाजता पुष्पवृष्टी, आरती, पालखी प्रदक्षिणा व महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमासाठी मंदिर परिसराची आकर्षक सजावट करण्यात येत असून विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत.

## गरजूंसाठी शिरखुर्मा साहित्याच्या १६० किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ मार्च-**

पवित्र रमजान महिन्यात दान, सहकार्य आणि समाजसेवेची भावना जपत अकलूज परिसरात मानवतेचा सुंदर संदेश देणारा उपक्रम पार पडला. फतेह मोहम्मद फाउंडेशन यांच्या वतीने गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना शिरखुर्मा साहित्याच्या १६० किटचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना ईद सण आनंदात साजरा करण्यासाठी मदतीचा हात मिळाला आहे. या उपक्रमाबाबत संस्थेचे अध्यक्ष प्रा. अबुबकर शेख यांनी सांगितले की, प्रेषित हजरत मोहम्मद (स्व) यांच्या शिकवणीनुसार समाजातील गरजू व वंचित घटकांना मदत करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. कार्यक्रमात संस्थेचे उपाध्यक्ष मोहम्मद रफीक मुल्ला, सचिव जिब्राईल नदाफ, नगरसेवक मोहसीन शेख, ॲड.वजीर शेख , नगरसेवक अजहर शेख, संग्रामनगरचे माजी सरपंच कमाल



रहमान शेख यांच्या हस्ते गरजू नागरिकांना शिरखुर्मा साहित्य किटचे वाटप करण्यात आले.

या वेळी उपस्थितांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देणे ही खरी सामाजिक जबाबदारी असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला इस्माईल मुजावर, महमूद काजी, शमशुद्दीन मुल्लानी, मौलाना अब्दुल्लागणी शेख, बंडू शेख, बशीर मुल्लानी, संजयकुमार कांबळे, भास्कर काळे, आलम शेख, असलम सय्यद, इरफान बागवान, रुबाब मौलाना उपस्थित होते.

## मिनाक्षी सरतापे यांनी घेतली केंद्रीय मंत्री आठवले यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १६ मार्च-**

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत वेळापूर जिल्हा परिषद गटातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या सौभाग्यवती मिनाक्षी मिलिंद सरतापे यांनी प्रचंड मताधिक्याने विजय संपादन करत जिल्हा परिषद सदस्यपद मिळवले आहे.

विजयानंतर मिनाक्षी सरतापे यांनी मुंबई येथील संविधान बंगला येथे जाऊन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची भेट घेतली. यावेळी डॉ. आठवले यांनी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या मिनाक्षी सरतापे यांचा सत्कार करण्यात आला. समाजातील वंचित, दुर्बल घटकांच्या विकासासाठी आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांवर ठामपणे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त करत आपल्या कार्यातून समाजसेवा घडो, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.



यावेळी रिपाइंचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष एन. के. साळवे, युवा आघाडी प्रदेश उपाध्यक्ष किरण धाईंजे, शामराव भोसले, भारत आठवले, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, धनाजी पवार, ज्येष्ठ नेते दत्तात्रय कांबळे पाटील, वेळापूरचे विद्यमान सरपंच रजनीश बनसोडे, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, झुल्कर शेख, अण्णासाहेब भोसले, तुषार केंगार, युवराज सातपुते, पप्पू गायकवाड, प्रेमसिंह कांबळे पाटील, समाधान हनुमंत भोसले, युवक कार्याध्यक्ष मिलिंद गायकवाड, अतिश आठवले, शरद साबळे, रणजीत सरवदे, गौतम वाघंबरे, नवनाथ वाघंबरे, संजय इंगळे, संतोष जाधव, फळवणी अध्यक्ष महेंद्र धांडोरे ,गणेश साठे, एस. के. लोखंडे, मिनाक्षी साठे, कोमल वायदंडे, ओंकार सरतापे, विराज वायदंडे उपस्थित होते.

## निरोगी आयुष्यासाठी आहार महत्त्वाचा

### आहारज्ज्ञ कविता अंधारे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ मार्च-**

सर्वांनाच निरोगी, उत्साही आणि आनंदी जीवन जगण्यासाठी व्यायामाबरोबरच संतुलित आणि योग्य आहाराची अत्यंत गरज आहे, असे प्रतिपादन आहारतज्ञ कविता अंधारे यांनी केले.

त्या लोकसेवा विद्यालय आगळगाव व सागर गरड यांच्या जनता न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशालेत आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने गावातील महिला, शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांना मार्गदर्शन करताना बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य विजयकुमार चौधरी होते. प्रास्ताविक जाधवर यू.एस. यांनी केले.

यावेळी विजयश्री पाटील यांनी सर्वच क्षेत्रातील विकासात महिलांची भूमिका याविषयी सर्वांना मार्गदर्शन करुन तिचे महत्व पटवून दिले. यानंतर आगळगाव, उंबरगे, भोयरे, बेलगांव, धनगरवाडी, खडकोणी, भानसाळे येथील महिलांसाठी विद्यालयाच्यावतीने मनोरंजक खेळांचे आयोजन केले होते. या खेळातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या महिलांना पैठणी, मनगटी घड्याळ आणि हँड पर्स ही बक्षिसे देण्यात आली.



**मनोरंजक खेळातील विजेते-** पैठणी विजेत्या- कोमल डमरे, मनीषा थिटे, दैवशाला शेटे,

**मनगटी घड्याळ विजेत्या-** प्राजक्ता माने, सोनाली विधाते, भाग्यश्री लंगोटे. पर्सच्या विजेत्या धनश्री नलवडे, अश्विनी उकिरडे, सारिका डमरे. सरप्राइज खेळातील विजेत्या सोनाली गरड व वर्षा कदम. बक्षीसे बबन गडदे, बन गायकवाड, मुकेश डमरे यांनी दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील एस. डी. मोरे, डॉ. वंदना यादव, यू. एस.,जाधवर, एस.एम. अवतार, एम.ए. लोखंडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. वंदना यादव व आभार मोरे एस.डी. यांनी मानले.

## भक्तांच्या सोयीसाठी कमर्शियल गॅस पुरवा

### पंढरपूर हॉटेल असोसिएशनचे तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मार्च-**

युध्दजन्य परिस्थितीमुळे सध्या येथील स्विटस्, बेकर्स अॅड हॉटेल्स व्यवसाय अडचणीत आला आहे. त्यामुळे येथील व्यवसायिकांना कमर्शियल गॅस पुरवठा करण्याबाबतचे निवेदन येथील श्री विठ्ठल स्विटस्, बेकर्स अॅड हॉटेल्स असोसिएशनच्या वतीने सोमवारी (ता.१६) तहसीलदारांना देण्यात आल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष अमोल गंगाखेडकर यांनी दिली.

दरम्यान या निवेदनातील मागणी संदर्भात माहिती देताना असोसिएशनचे अध्यक्ष गंगाखेडकर यांनी सांगितले की, पंढरपूर ही महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असून अनेक भाविक श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी श्री क्षेत्र पंढरपूर येथे असतात. त्यांची गैरसोय होऊ नये व आमचा हॉटेल्स, स्विटस् व बेकरीचा उद्योग बंद होऊ नये. (असोशिएनमधील ३० फर्मला महिन्याला १२०० कमर्शियल सिलेंडर लागत असून त्यापैकी कमीत-कमी ७०० सिलेंडरची तरतूद करावी, ही विनंती) आमच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी शासनाकडून नियमानुसार आम्हाला कमर्शियल गॅसचा पुरवठा करावा. पंढरपूरातील ३० हॉटेल, बेकर्स, स्विटस् यांची पुर्ण नियमाने चालणारी (अन्नभेसळ, कमर्शियल गॅस, शॉप ॲक्ट टॅक्स रिटर्न) ही सर्व कागदपत्रे उपलब्ध असून नियमाप्रमाणे चालणारी असोसिएशन असून कृपया आम्हाला कमर्शियल गॅस उपलब्ध व्हावेत अशी विनंती देखील असोसिएसनच्या वतीने तहसीलदारांना करण्यात आलेली आहे.



दरम्यान असोसिएशनचे अध्यक्ष अमोल गंगाखेडकर, उपाध्यक्ष सागर तारापुरकर यांच्या मार्गदर्शनाखालील असोसिएशनच्या ३० ते ४० सदस्यांनी येथील तहसीलदार सचिन लंगुटे यांची आज तहसील कार्यालयात भेट घेवून त्यांच्याशी चर्चा करुन शासनाकडे मागणी पाठविण्याची विनंती केली. त्या नंतर तहसिलदारांनी असोसिएशनच्या वतीने करण्यात आलेल्या मागणीचा निश्चित विचार केला जाईल असे आश्वासन दिल्याची माहिती देखील असोसिएशनचे अध्यक्ष अमोल गंगाखेडकर यांनी दिली.

## पंचायतराज अभियानात सीईओ जंगम यांनी केली भाळवणीची पाहणी

**मंगळवेढा, दि.१६ मार्च**

महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत तालुक्यातील भाळवणी ग्रामपंचायतीला सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी प्रत्यक्ष भेट देत कामकाजाची पाहणी केली. यावेळी ग्रामपंचायतीच्या प्रशासनिक कामकाजाचा आढावा घेत गुणांकन प्रक्रियेबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या पाहणीवेळी गटविकास अधिकारी डॉ. जस्मिन शेख, गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता, बालविकास प्रकल्प अधिकारी, विस्तार अधिकारी अशोक नलवडे, सरपंच लक्ष्मण गायकवाड, ग्रामविकास अधिकारी सानिया तांबोळी, ग्रामपंचायत सदस्य कांचन आवळेकर, शिवाजी दोडके, विश्वंभर मोरे उपस्थित होते. कुलदीप जंगम यांनी ग्रामपंचायतीने राबविलेल्या विविध उपक्रमांची तसेच दप्तरांची तपासणी करून विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. समृद्ध पंचायतराज अभियानात अधिकाधिक गुणांकन मिळवून ग्रामपंचायत आदर्श कशी ठरेल, यासाठी प्रशासकीय कामकाजात आवश्यक सुधारणा करण्याबाबत त्यांनी सूचना केल्या.गटविकास अधिकारी डॉ. जस्मिन शेख यांनी पंचायत समिती स्तरावरून ग्रामपंचायत विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देत अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन केले. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी पाहणी दौऱ्यात भाळेवाडी, लवंगी, भाळवणी आणि शिरशी या गावांनाही भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या भेटीमुळे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना नवी दिशा मिळणार असल्याची भावना ग्रामस्थ आणि प्रशासनाने व्यक्त केली.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 'मन की बात'चे लाईव्ह प्रक्षेपण




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ मार्च-**

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा मन की बात हा कार्यक्रम म्हणजे लोकाभिमुखतेचा उत्तुंग जागर आहे. मार्च महिन्यातील मन की बात कार्यक्रम संपन्न झाला.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे येथे मन की बात कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण आयोजित करण्यात आले होते. यावेळी सभापती विजय गरड यांनी उपस्थित राहून भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या समवेत मोदीजींचे विचार ऐकले, यावेळी संचालक रामेश्वर पाटील, रविकांत साळुंखे, सतिश हनुमंते, सचिव तुकाराम जगदाळे, आशिष काळे, दिपक जुगदार, आनंद चौधरी, बाबा मिरगणे, अजय देशमुख, राजाभाऊ खंबाळे, जगन्नाथ गाढवे, नवनाथ गिराम, गोकुळ मांजरे, विशाल खलसे, ज्ञानेश्वर जामदार तसेच शेतकरी उपस्थित होते.

या कार्यक्रम प्रसंगी रेल्वे, विद्युत, गॅस, परिवहन, रस्ते, व्यापार, उद्योग, सौर ऊर्जा, जलविद्युत, शेती, गरीबांना घरे, भूमीपट्टा अभियान इत्यादी क्षेत्रात होत असलेल्या प्रगती बद्दल माहिती देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत २२ व्या हप्त्याचे ९ कोटी ३२ लाख शेतकऱ्यांना १८ हजार ६४० कोटींचे वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रम ज्योती विष्णू आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्र खानापारा, गुवाहाटी (आसाम) येथे पार पडला.



## महत्त्वाचे



### ब्रिजधाम आश्रममध्ये काव्यप्रेमींची मांदियाळी

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

येथील ब्रिजधाम वृध्दाश्रममध्ये काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या सोलापूर शहर, जिल्हा शाखेच्या वतीने आयोजित केलेल्या कवी संमेलनात काव्यप्रेमींची मांदियाळी जमली होती. गझलकार नवनाथ खरात हे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर बदीउज्ज्मा बिराजदार, ब्रिजमोहन पोफलिया, जीवन धेंडे, प्रा.नरेंद्र गुंडेली, आनंद घोडके, कालिदास चवडेकर, कृष्णा शिंदे, श्रीमंत कोळी आदींची उपस्थिती होती.

प्रा.नरेंद्र गुंडेली यांनी गजानना गणराया, सुरेश निकंबे यांनी सत्य, चंद्रप्रकाश यनगुंडी यांनी हल्लीची तरुणाई, दत्तात्रय इंगळे यांनी जुने ते सोने, विठ्ठल टाक यांनी युद्धाची आग, विजयकुमार सोनवणे यांनी आई-वडील, प्रतिभा दंदे-गडेकर यांनी माझा बा, मयुरेश कुलकर्णी यांनी आजही, विजय खाडे यांनी मी जरासा बोललो की जाळ होतो, प्रा.मुक्तेश्वर मुळे यांनी नक्षत्राचं दान, मदन जवळगे यांनी रेंगाळणे, राम प्रभू माने यांनी माझा तुझा दुरावा, कालिदास चवडेकर यांनी पाहिली तू एक बाजू नाण्याची, आनंद घोडके यांनी आज अचानक रूसून आई, नागेंद्र माणेकरी यांनी सखे तूच माझी, बदीउज्जमा बिराजदार यांनी माझे बाबा, शैलेश उकरंडे यांनी स्त्री,, प्रभाकर मालगते यांनी कवितेचे मनोगत, नवनाथ खरात यांनी खरं झालं हद्दपार , जीवन धेंडे यांनी बेगाळली माती, श्रीमंत कोळी यांनी आई, महेश रायखेलकर यांनी सरळ मार्ग या कविता सादर केल्या.



**सोलापूर :** व्हाईस ऑफ मिडिया इंटरनॅशनल फोरम व महाराष्ट्र शासन आयुष्यमान भारत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने समाजाभिमुख उत्कृप्रशासकीय कार्याबद्दल सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे व सौ. काकडे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२५ या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मंत्री मंगलप्रभात लोढा, ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### प्रा.संतोष लोंढे यांना राज्यस्तरीय शिक्षणरत्न पुरस्कार जाहीर

**सांगोला, दि. १६ मार्च-**



सांगोला महाविद्यालयातील मराठी विभागातील सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा.संतोष मारूती लोंढे यांना प्रतिष्ठा फौडेशन महाराष्ट्र यांच्यावतीने दिला जाणारा राज्यस्तरीय शिक्षणरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. तासगाव ( जि.सांगली) येथे २१ मार्च रोजी होणाऱ्या दशक महोत्सवी प्रतिष्ठा साहित्य संमेलनामध्ये विचारवंत प्रा.डॉ.बाबूराव गुरव, यशदा पुणेचे उपसंचालक मल्लीनाथ कलशेट्टी, माजी खा.संजयकाका पाटील यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.





### डॉ. आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी अभिराज उबाळे

**पंढरपूर, दि.१६ मार्च -**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. यात अध्यक्षपदी पत्रकार अभिराज उबाळे, स्वागताध्यक्षपदी परवेज मुजावर यांची तर सचिवपदी कृष्णा सर्वगोड यांची निवड केली गेली.

अन्य पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्ष विशाल मांदळे, कार्याध्यक्ष महेश मोटे, कोषाध्यक्ष योगेश जाधव, सहसचिव अजिंक्य होवाळ, प्रसिद्धीप्रमुख सूरज साखरे, रूपेश वाघमारे, सहकोषाध्यक्ष स्वप्निल कांबळे, तर कार्यकारिणी सदस्य संजय सातपुते आणि राहुल भोरकडे यांचा समावेश आहे. अध्यक्षस्थानी समितीचे मावळते अध्यक्ष शैलेश आगावणे होते. या बैठकीला जितेंद्र बनसोडे, संतोष पवार, डी.राज सर्वगोड, संतोष सर्वगोड, रिपब्लिकन सेनेचे सागर गायकवाड, उमेश सर्वगोड, कीर्तिपाल सर्वगोड, रवी सर्वगोड, योगेश जाधव, अमित कसबे, अनिल ननवरे, विशाल मांदळे, अजिंक्य होवाळ, कनिष्क सर्वगोड, सतीश सर्वगोड उपस्थित होते.

# युद्धाचा तडाखा: पंढरपुरात रिक्षाचालकांवर उपासमारीची वेळ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ मार्च-**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आत्ताकडून सर्वसामान्य नागरिक सावरत असतानाच सध्या अमेरिका आणि इराण मधील युध्द सुरु होवून एक, नाही, दोन नाही तर तब्बल सतरा दिवस होता आहेत. मात्र तरी सुध्दा युध्द थांबविण्याची सध्या तरी दोन्ही राष्ट्रांकडून परिस्थिती दिसत नाही. या युध्दजन्य परिस्थितीमुळे तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याचा परिणाम आता थेट सर्वसामान्य नागरिकांवर दिसू लागला आहे. शहरात एलपीजी गॅस सहज उपलब्ध होत नसल्याने रिक्षा चालक अडचणीत आले असून, त्याचा फटका प्रवाशांनाही बसत आहे. अनेक ठिकाणी रिक्षा भाड्यात मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

पंढरपूर शहरात सुमारे बारा हजार रिक्षा आहेत. मात्र, गॅसचा पुरवठा कमी झाल्याने अनेक रिक्षा रस्त्यावर धावण्याऐवजी स्टँडवरच उभ्या राहत आहेत. गॅस सहज मिळत नसल्यामुळे चालकांना तासन तास रांगा लावाव्या लागत आहेत. याशिवाय एलपीजी गॅसचा दरही मोठ्या प्रमाणात वाढल्याचे रिक्षा चालक सांगत आहेत. चार दिवसांपूर्वी ४५ रुपयांत मिळणारा गॅस आता ८५ रुपयांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे खर्च वाढल्याने अनेक चालकांनी रिक्षाभाडे जवळपास दुप्पट केल्याचे प्रवाशांकडून ऐकावयास मिळत आहे. भाडेवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचा रोजचा प्रवास महाग झाला आहे.



पंढरपूरमध्ये सावरकर चौक, सरगंम चौक आणि बसस्टँडशेजारी तसेच क्रांतिवीर लहुजी वस्ताद चौकाशेजारी असलेल्या पंपावर गॅस मिळतो. परंतु शुक्रवारी सकाळी तीनही ठिकाणी गॅस मिळत नव्हता. तीन दिवसांपासून ४२ रुपये लीटर मिळणारा गॅस ८५ रुपये मिळत आहे. पेट्रोलवर रिक्षा अॅवरेज देत नाहीत. त्यामुळे भाडेही वाढले आहे. प्रशासनाने तातडीने गॅस उपलब्ध होईल, यादृष्टीने कार्यवाही करावी.

**मंगेश कांबळे,** शहरातील रिक्षा चालक

### रिक्षाची झाली दुप्पट भाडेवाड

गेल्या तीन दिवसांपासून रिक्षांना लागणाऱ्या एलपीजी गॅससाठी आता दुप्पट पैसे मोजावे लागत आहेत. तीन दिवसापूर्वी गॅस ४५ रुपये लीटर मिळत होता. आता त्यासाठी तब्बल ८५ रुपये द्यावे लागत आहेत. अगोदर बसस्टँडपासून मंदिरापर्यंत जाण्यासाठी ५० रुपये द्यावे लागत होते. आता ७० रुपये द्यावे लागत आहेत. मंदिरा पासून बसस्टँडला जाण्यासाठी ८० रुपये द्यावे लागत आहेत. उपजिल्हा रुग्णालयला जाण्यासाठी आता ६० रुपये तर येथील रेल्वेस्थानकावर जाण्यासाठी १०० रुपये द्यावे लागत आहेत.

### प्रशासनाने मार्ग काढावा

युद्धजन्य परिस्थितीमुळे सर्वच क्षेत्रांत परिणाम दिसू लागले आहेत. शहरात बारा हजारपेक्षा अधिक रिक्षा असून ते नागरिकांना सेवा देत आहेत. युद्धामुळे रिक्षांना लागणाऱ्या एलपीजी गॅससाठी पेट्रोलपंपांवर रांगा लागत आहेत. पंढरपूर शहरातील नागरिकांना त्रास होऊ नये, रिक्षा चालकांना सहजरित्या गॅस उपलब्ध व्हावा यासाठी प्रशासनाने योग्य ते नियोजन करणे अपेक्षित आहे. गॅसचा काळाबाजार होऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी यांना भेटणार असल्याची प्रतिक्रिया रिक्षा संघटनेचे अध्यक्ष महेश थिटे यांनी दैनिक सोलापूर तरुणभारतशी बोलतांना सांगितले.

## नॅशनल आयडियल पर्सनालिटी अवॉर्डने डॉ. शरद गोरे सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**



उपळाई बुद्रूकचे सुपुत्र अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.शरद गोरे यांना पुणे येथे नॅशनल आयडियल पर्सनालिटी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले राष्ट्रभक्ती संस्थेच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला.

गेली ३३ वर्षे गोरे हे साहित्य संवर्धनाचे कार्य करीत आहेत आजवर विविध १९३ साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन त्यांनी केले आहे.

छत्रपती संभाजी महाराज यांनी संस्कृत भाषेत लिहिलेल्या बुधभूषण या ऐतिहासिक ग्रंथाचा त्यांनी मराठी काव्य अनुवाद केला आहे.

ते प्रकाशक संपादक असलेल्या युंगधर प्रकाशन संस्थेच्या वतीने १४८ दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन आजवर झाले आहे. त्यांनी लेखक आणि दिग्दर्शक अभिनेता व संगीतकार म्हणून केलेल्या एक प्रेरणादायी प्रवास सूर्या या मराठी चित्रपटाने काना बर्लिन सारख्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पारितोषिकावर आपली मोहोर उमटवली आहे




## डांबून ठेवलेली ८५ गोवंश ताब्यात

### अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल; सांगोला पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ मार्च-**

मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी यांना गोपनीय बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहितीनुसार सांगोला पोलिसांनी केलेल्या कारवाईत ८५ गोवंश ताब्यात घेतले असून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवार दि. १६ मार्च रोजी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास सांगोल्यातील भिमनगर येथील गायरान जमिनीवर देशी खिलार गायी, खोंडे, कालवडी व जर्सी कालवडी बांधुन ठेवली आहेत अशी माहिती मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळाली. सदर ठिकाणी जावून पुढील कारवाई करण्याचे आदेश त्यांनी सांगोला पोलिसांना दिले होते. त्याप्रमाणे सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी पोलीस स्टाफ यांना सोबत घेवुन भीमनगर (ता. सांगोला) येथील गायरान जमीनी असलेल्या ठिकाणी पाळीव प्राणी खिलार गाई, गिर गाई, जर्शी कालवडी यांना चारा पाण्याची कोणतीही सोय न करता दाटीवाटीने चिलारीचे झुडुपामध्ये ८५ जनावरे अज्ञात इसमाने अज्ञात कारणास्तव बांधुन ठेवलेली रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास दिसली.

सदर जनावराच्या मालकाबाबत त्यांनी आजुबाजुला चौकशी केली असता काही माहिती मिळुन आली नाही. सदर जनावरे सपोनि भारत वाघे यांनी जप्ती पंचनाम्याप्रमाणे ताब्यात घेतली आहेत. याबाबत पोहेकॉ. अनिल येडगे यांनी अज्ञात इसमाविरुध्द सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे यांचे मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, सपोनि वाघे, पोसई. पुजारी, पाटील, नपोसई उबाळे, मपोसई चव्हाण, ग्रे.पोसई.बगाडे, कदम, पोहेकॉ. कोष्टी, वाघमोडे, क्षीरसागर, जाधव, पोना.लेंगरे, वाकीटोळ, पोकॉ.डोबळे, पाटील, वाघमोडे, राऊत, दरदरे, कुंभार तसेच मंगळेवढा पोलीस ठाणेकडील सपोनि.लातुरकर, पोकॉ. सुतार, केरनर, जोजारे, पोहेकॉ. यादव व पंढरपुर शहर पोलीस ठाणेकडील पोसई. जगताप, पोहेकॉ. बिचुकले, बडे, लोखंडे, सर्जे, मदने, पोना. पकाले यांनी केली.

सदर कारवाईमध्ये ४१ खिलार गायी, ८ खिलार कालवडी, २० खिलार खोंडे, ३ गीर गायी, २ गीर गायीची कालवडी, ७ गीर गायाची खोंडे व ४ जर्शी गायी अशी ७ लाख ६३ हजार रुपयाची ८५ जनावरे मिळून आली आहेत.

## शंभू महादेवच्या यात्रेसाठी कावडी सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १६ मार्च-**

अखिल महाराष्ट्राचे कुलदैवत असलेले शिखर शंभू महादेवाची यात्रा २३ मार्च पासून सुरु होत असून या यात्रे मधील मुख्य आकर्षण असलेल्या मुंगी घाटातील कावडी सोहळा सोमवार ३० मार्च रोजी संपन्न होत असून या यात्रेसाठी माळशिरस शहर व परिसरातील कावडी सज्ज झाल्या आहेत.

शिखर शिंगणापूरच्या यात्रेसाठी माळशिरस शहरातून नारायण थोरात, महादेव थोरात, गंगाधर सुतार, तानाजी सुतार, नामदेव कुंभार, विजय बोकफोडे, सुभाष कोळी, गोविंद कोळी, रखमाजी जंगले, महादेव शिंदे, शिवाजी शिंदे, प्रकाश पिसे, सोनवणे, बोराटे यांच्या कावडी यात्रेसाठी जाण्याची शकडो वर्षांची परंपरा आज ही सुरु आहे. पाडव्या दिवशी या शंभू महादेवाच्या कावडीला वस्त्र नेसवली जातात त्यानंतर ग्राम दैवतास धार घालून या कावडी उत्सवाची सुरवात होते. त्यानंतर शहरातील अनेक भक्त आपल्या घरी कावडीना बोलवून त्याची पूजा करून कावड्याना चहा, अल्पोपहार,जेवण देतात. एकादशी दिवशी या पैकी काही कावडी कोथळ्याला मुक्कामाला जातात व दुस-या दिवशी द्ववदशीला मुंगी घाटातून शिंगणापूर येथे प्रवेश करून महादेवास धार घालतात व तेरशीला महादेवाला धार घालून परतीला निघतात तर काही कावडी माळशिरसवरून वाहनातून शिंगणापूरला जातात तर यापैकी काही कावडीना नातेपुते येथील पर्वतेशेवर मंदिरातील शंकर पार्वती विवाह सोहळ्यास वऱ्हाडाचा मान आहे तर माळशिरस येथील पोलीस पाटील यांना या विवाह सोहळ्यात वर होण्याचा मान आहे तर नातेपुते येथील पोलीस पाटलांना वधूचा मान आहे. त्यानंतर कवडींची माळशिरस शहरामध्ये ठिकठिकाणी पूजा केली जाते व हनुमान जयंती दिवशी मोठ्या भक्तीभावात फटाक्याच्या आतिश बाजीत मिरवणुकीने या कावडी उत्सवाची सांगता होती.



## बार्शी-सोलापूर रोडवर द्राक्षांचा गोडवा; गोरमाळ्याच्या तरुणाची भरघोस कमाई



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ मार्च-**

कष्ट करण्याची तयारी आणि जिद्दीची जोड असेल तर मातीतूनही सोनं पिकवता येतं, हे सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील गुळपोळी येथील नाना श्रीमंत शिंदे या तरुणाने सिद्ध करुन दाखवले आहे. गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने द्राक्ष विक्रीचा व्यवसाय करुन नाना यांनी केवळ स्वतःची प्रगती केली नाही, तर अनेक बेरोजगार तरुणांना रोजगाराची नवी दिशा दाखवली आहे.

दैनंदिन संघर्ष आणि जिद्द नाना शिंदे यांचा दिवस पहाटेच सुरु होतो. दररोज सकाळी लवकर उठून ते आपल्या दुचाकीवरुन परिसरातील द्राक्ष बागेत जातात. तिथून थेट बागेतून ताजी द्राक्षे खरेदी करुन ती विक्रीसाठी १६ किलोमीटरचा प्रवास करुन बार्शी शहरात येतात. रखरखत्या उन्हाची तमा न बाळगता, रस्त्याच्या कडेला बसून ते द्राक्षे विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्या या प्रामाणिक कष्टाचे फळ म्हणजे आज त्यांचा हा व्यवसाय चांगल्या प्रगतीपथावर आहे.

### हंगामी व्यवसायातून लाखोंची कमाई

द्राक्षाच्या ३ ते ४ महिन्यांच्या हंगामात नाना शिंदे योग्य नियोजन आणि कष्टाच्या जोरावर लाखों रुपयांची उलाढाल करतात. केवळ स्वतःपुरता विचार न करता, त्यांनी आपल्या कुटुंबालाही या कष्टाची गोडी लावली आहे. त्यांचे बंधू सचिन शिंदे हे देखील अशाच प्रकारे मेहनत करुन पुढे आले आहेत. तरुणांसाठी ठरले रोलमॉडेल आजच्या काळात नोकरीच्या मागे न धावता आपला छोटा का होईना पण हक्काचा व्यवसाय असावा, ही नाना यांची धारणा आहे. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन बार्शी शहरातील विविध भागात आज अनेक तरुण रस्त्याच्या कडेला बसून द्राक्ष विक्रीचा व्यवसाय करत आहेत. अनेक तरुणांसाठी नाना शिंदे आज एक आदर्श बनले असून, त्यांच्या यशस्वी प्रवासाची चर्चा संपूर्ण तालुक्यात होत आहे. आपले काम आपण भले, या वृत्तीने कष्ट केले तर यश नक्कीच मिळते. ग्रामीण भागातील तरुणांनी जिद्दीने काम केल्यास उदरनिर्वाहासाठी कोणावरही अवलंबून राहण्याची गरज पडत नाही, असे नान शिंदे यांनी सांगितले.

## अरण तीर्थक्षेत्राच्या विकासाचा श्रीगणेशा लवकरच

### ८९ कोटींच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**मोडनिंब, दि. १६ मार्च-**

श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या तीर्थक्षेत्र अरणच्या विकासाचा श्रीगणेशा लवकरच होणार आहे. मंजूर असणाऱ्या १५० कोटीपैकी पहिल्या टप्प्यात ८९.०७ कोटी रुपयांच्या विकास कामांना १६ मार्चच्या शासन आदेशान्वये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

लवकरच कामाची निविदा प्रसिद्ध होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. वारकरी संप्रदायाची पहिली संजीवन समाधी असलेले. ज्यांना संत साहित्याचे जनक म्हणून ओळखले जाते, असे कर्मनिष्ठ संत, संत शिरोमणी सावता महाराज यांची जन्मभूमी असलेले देवस्थान गेली अनेक वर्ष दुर्लक्षित होते. परंतु संत शिरोमणी सावता महाराज भक्त परिवाराची अरण विकासाची इच्छा आज या निविदा निघाल्यानंतर लवकरच पूर्ण होणार आहे. याचा आनंद सर्व वारकरी भाविक भक्तांना आहे.

अरण विकासाचा शब्द देऊन पूर्ण करणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यासाठी प्रयत्न करणारे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, अरण विकासासाठी योगदान देणारे अतुल सावे, त्यासोबतच भाविकांच्या आस्थेच्या पाठीशी उभे राहणारे मंत्री छगनराव भुजबळ, संत शिरोमणी सावता महाराजांच्या तीर्थक्षेत्राचे प्रश्न महाराष्ट्राच्या सर्वोच्च सभागृहात मांडणारे आ. योगेश टिळेकर, सावता महाराज वसेकर, प्रभु महाराज माळी, रविकांत महाराज वसेकर साखरचंद महाराज लोखंडे अमर हजारे यांच्यासह परिवारासोबत काम करणारे संजीवन समाधी मंदिराचे निष्ठावंत सेवेकरी, वारकरी यांच्या मागणीला आणि कष्टाला आलेले हे मोठे यश आहे.